


शब्द
# रुची

एप्रिल २०१८
मूल्य १० रुपये
पृष्ठे ४४


डॉ. गंगाधर पानतावणे


वसंत नरहर फेणे



# पुस्तकप्रकाशन क्षणचित्रे




'डॉ. नेहा वैद्य लिखित 'Happy 24/7 चोवीस आंनदयात्री' या पुस्तकप्रकाशन समयी धनश्री धारप, लेखिका डॉ. नेहा वैद्य, डॉ. अनिल काकोडकर, डॉ. विजया वाड आणि सुदेश हिंगलासपूरकर



पत्रास कारण की लेखक अरविंद जगताप सोबत योगेश व माधुरी नेरकर




डॉ. उत्कर्षा बिर्जे लिखित 'इवल्या इवल्या गोष्टी' पुस्तक प्रकाशनसमयी अस्मिता पांडे श्रीनिवास नार्वेकर राजन खान उषा मेहता चिन्मयी सुमित अरुण शेवते अंजली आंबेकर आणि शुभदा पटवर्धन

सरोज बावडेकर लिखित 'बिमल रॉय यांची मधुमती' या पुस्तकाचे प्रकाशनसमयी प्रभात चित्रमंडळाचे संतोष पाठारे मूळ इंग्रजी लेखिका रिंकी भट्टाचार्य सुधीर नांदगावकर लेखिका सरोज बावडेकर चित्रपट दिग्दर्शक अमित राय आणि ग्रंथाली कार्यक्रम संयोजिका धनश्री धारप



विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म
जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्दरुची

४३ ॥ग्रंथाली॥

ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

**एप्रिल २०१८, वर्ष पाचवे**
**अंक बारावा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **डॉ. वीणा सानेकर**
मुखपृष्ठ : **सतीश भावसार**

---

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
granthaliruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल**

---

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी २५० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

---

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, तळमजला,
यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६ ☎ २४२१६०५०
granthaliruchee@gmail.com
www.granthali.com

---

**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

---

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

## अनुक्रम

**अक्षरमुद्रा**
- आठवणी स्ट्रँडच्या! / ६
  **शशिकांत सावंत**
- दोन कवयित्री / १०
  **सुरेश वाघे**

**कविता**
**लखनसिंह कटरे, साधना गोरे / १७**

**स्मृतिशेष**
- वसंत नरहर फेणे : सेलिब्रेशन ऑफ हिज लाइफ / १८
  **दिनकर गांगल**
- आंबेडकरी विचारांच्या पाऊलखुणा दमदार करणारा द्रष्टा विचारवंत / २३
  **अर्जुन डांगळे**

**निमित्त**
- दीपमाळ / २७
  **अरुण मळेकर**

**प्रतिभेचे चांदणे**
- कालातीत 'डेथ ऑफ अ सेल्समन' / २९
  **धनंजय गांगल**
- पुस्तकप्रकाशन वृत्तांत / ३१
- ग्रंथाली ग्रंथपाने – **चांगदेव काळे** / ३९

## संपादकीय...

**मा**णूस पिढी, दरपिढी पुढे-पुढे जात राहिला. बुद्धी, भावना, चातुर्य, शहाणपणा, हुशारी, प्रतिभा, प्रज्ञा सगळ्या गुणांच्या आधारे त्याने आपली प्रगती करून घेतली. हा पिढ्यान्‌पिढ्यांचा प्रवास मानवजातीकरता सोपा नव्हता. या प्रवासात अनेकांनी आपापल्या क्षमतेनुसार भर टाकली. शास्त्रज्ञांचे शोध, कलावंतांचे सृजन, लेखक-कवींची रचना, तत्त्वज्ञांचे चिंतन अनेक अंगांनी माणसाने समाजाची जडणघडण केली. मानवी इतिहासाच्या प्रत्येक पानावर ज्यांचं-ज्यांचं नाव कोरलं गेलं ती माणसं मोठी होती. अशा माणसांचं संचित लाभणं हे एकेका प्रदेशाचं, तिथल्या मातीचं भाग्यच म्हणायला हवं. याबाबतीत महाराष्ट्र तसा खूपच श्रीमंत!

काळाच्या या टप्प्यावर मात्र एकदम पोकळी जाणवायला लागली आहे. रिक्त झालेल्या अनेक जागा मन अस्वस्थ करतात. नुकतेच अभ्यासक-समीक्षक के.रं. शिरवाडकर यांचे निधन झाले. समाज, संस्कृती आणि साहित्य हे त्यांच्या आस्थेचे विषय होते. 'आपले विचारविश्‍व' हे त्यांनी लिहिलेले पुस्तक अतिशय महत्त्वाचे आहे. भारतीय विचार, चिनी, युरोपियन आणि ग्रीक तत्त्वज्ञान, इस्लामचे योगदान, समाजशास्त्र, उत्तर आधुनिक समाज, विज्ञान व धर्म यांचा संबंध अशा विविध विभागांसह आपल्या जगण्याला आधार देणाऱ्या अनेक ज्ञानशाखांचा परिचय या पुस्तकात त्यांनी करून दिला आहे. महाराष्ट्रातील विचारवंतांची परंपरा क्षीण होत असल्याविषयीचे निरीक्षण त्यांनी नेमकेपणाने पुस्तकाच्या प्रस्तावनेत नोंदवले आहे.

ते म्हणतात, ''महाराष्ट्रात टिळक, राजवाडे यांच्यासारख्या श्रेष्ठ विचारवंतांची परंपरा नाहीशी का झाली हे एक कोडेच आहे. आज या परंपरेला शोभणारे आणि परिस्थितीला अनुरूप असे प्रगल्भ विचार देणाऱ्यांची किती नावे घेता येतील? हा प्रश्न सविस्तर संशोधनाचा आहे. त्यात अनेक कारणे समाविष्ट असू शकतील, पण एक कारण सहज जाणवते. महाराष्ट्रातील शिक्षणसंस्था, विशेषकरून महाविद्यालये आणि विद्यापीठे यांना आपली जबाबदारी पेलता आली नाही. १९५० नंतर जागतिक ज्ञान ज्या गतीने पुढे जात होते त्याचा महाराष्ट्रातील उच्च शिक्षणक्षेत्राला पत्ताही नव्हता. इतरांविषयी तुच्छता, आत्मतुष्टी आणि संकुचित दृष्टी यांनी उच्च शिक्षण ग्रासले गेले. परिणामी मराठी विद्यार्थी म्हणजेच मराठी मन सामान्य गुणवत्तेकडे ढकलले जात होते. सामान्यत: संपादन (Achievement of mediocrity) हा महाराष्ट्रातील उच्च शिक्षणाचा आदर्श बनला.

के. रं. शिरवाडकर यांनी उच्च शिक्षणाच्या झालेल्या वाताहातीचे जे सूचन केले आहे, त्याच्यात आजमितीला दुप्पटीने वाढच झाली आहे. याची साक्ष पटवणारे लाखोंच्या घरातले, सामान्य दर्जाचे सेमिनार व चर्चासत्रे. केवळ गुणांच्या आशेने त्यांतून सादर होणारे सर्वाधिक निबंध, पदव्या देणारे सामान्य गुणवत्तेचे वाढते कारखाने, असा आजच्या उच्च शिक्षणाचा पोकळ डामडौल पाहिला की या सर्वातून काय उभे राहणार आहे? हा प्रश्न उपस्थित होतो. अवतीभवती वाढत्या नीतिनिरपेक्ष स्पर्धेला खतपाणी घालणारे वातावरणच आज शाळा-महाविद्यालयांमधून तयार होते. सवंग काय आणि गुणवत्तापूर्ण काय, सपक काय आणि नावीन्यपूर्ण काय यातला फरक समजून घेण्याची गरज ना पालकांना वाटते, ना विद्यार्थ्यांना. 'माणसाचे उन्नयन' हे खरे तर शिक्षणाचे उद्दिष्ट असायला हवे. शिक्षणातून सद्‌विचारांच्या वसाहती वसवू शकतील अशी माणसं तयार व्हायला हवीत. ही विचारांची बीजे इतकी चांगली पेरली गेली पाहिजेत की ती उखडून टाकणाऱ्या शक्तींचा बीमोड करण्याची ताकद माणसाला मिळाली पाहिजे; पण एकूणच आजच्या शिक्षणव्यवस्थेत इतक्या तकलादू गोष्टींना महत्त्व आले आहे की अस्सल सत्त्वपूर्ण गोष्टींपासून विद्यार्थी दूरदूरच फेकले जाऊ लागले आहेत.

एकेकाळी शिक्षणाचा वसा घेतलेली माणसे महाराष्ट्रात मने घडवण्याकरता सिद्ध झालेली होती. त्याकरता तथाकथित सुखांवर पाणी सोडून एका विशिष्ट ध्येयाने या क्षेत्रात झोकून देऊन काम करत होती. महाविद्यालये ही चळवळीची केंद्रे होती. इथूनच नव्या विचारांना धुमारे फुटत होते. समाजातल्या सकारात्मक परिवर्तनाला इथून दिशा मिळत होती. आज हे चित्र हळूहळू धूसर होत चालले आहे.

संपादकीय लिहीत असताना केरळमधील असंख्य पालक-विद्यार्थ्यांनी शाळेच्या नोंदींवर जातीचा उल्लेख न करण्याचा निर्णय घेतला ही बातमी ऐकली. जातीअंताच्या ज्या एका मुद्द्याची चर्चा आपण सातत्याने करतो आहोत त्याच्या पार्श्वभूमीवर केरळमधील पालकांनी उचललेले हे पाऊल अतिशय आश्वासक आहे. शालेय जीवनाच्या टप्प्यावर जातीच्या भिंतींच्या पलीकडे जर मुलं जाऊ शकली तर ती अनेक संकुचित चौकटींतून मुक्त होऊ शकतील. महाराष्ट्रात असे चित्र केव्हा दिसणार? अनेक गोष्टींत आपण मूक होऊन बघ्याच्या भूमिकेत का शिरतो? जिथे निर्णय घ्यायला हवेत आणि जिथे बोलायला हवे तिथे जेव्हा माणसे गप्प राहतात तेव्हा त्या समाजाचे काय होते याचे अत्यंत बोलके चित्र केदारनाथ सिंह यांनी त्यांच्या कवितेत रेखाटले आहे.

त्या कवितेच्या काही ओळी देते आहे.

चुप्पियाँ बढती जा रही है
उन सारी जगहोंपर जहाँ बोलना जरुरी था
मैंने एक बुजुर्गसे सुना था
कि चुप्पियाँ जब भी बढती हैं अंधेरे में नदी की तरह
चुप हो जाता है एक पूरा समाज...

माणसांचे मौन एका सबंध समाजाला मुके करते. त्याचा आवाज गाडून टाकते हिंदी भाषेतील प्रख्यात कवी केदारनाथ सिंह यांचे नुकतेच देहावसान झाले. 'स्मृतिशेष' माणसांच्या स्मृती कायम शेष राहतात. लेखनातून ठाम विचार मांडणारे डॉ. गंगाधर पानतावणे आणि कथाकार-कादंबकरीकार वसंत नरहर फेणे यांच्या आठवणी जागवणारे अर्जुन डांगळे आणि दिनकर गांगल यांचे लेख या महिन्याच्या अंकात समाविष्ट करत आहोत. वसंत नरहर फेणे यांच्याशी 'ग्रंथाली'चे जिव्हाळ्याचे नाते होते. 'कारवारी माती' या त्यांच्या कादंबरीनिमित्ताने 'ग्रंथाली'ने गेल्याच महिन्यात आयोजित केलेल्या चर्चासत्रातला त्यांचा उत्साह कौतुकास्पद होता. नुकत्याच 'ग्रंथाली'ला मिळालेल्या हक्काच्या जागेतील 'ग्रंथाली' परिवाराच्या प्रवेशाच्या क्षणाचेही ते साक्षीदार होते. अशा माणसांना आठवणे म्हणजे 'जगण्याची सळसळ' पुन्हा-पुन्हा अनुभवणे!

'अस्मितादर्श' नियतकालिकाविषयी एके ठिकाणी वाचलेले आठवते, 'अस्मितादर्श' म्हणजे अस्मितेतून अस्मितेसाठी चालवलेले नियतकालिक! 'अस्मितादर्श'चे मराठी साहित्य-सांस्कृतिक विश्वातले स्थान एका जागल्याचे आहे. तसेच दीर्घकाळ त्याच्या संपादनाची धुरा सांभाळणाऱ्या डॉ. गंगाधर पानतावणे सरांचे योगदानही मोठे आहे.

आपल्या कामांतून-लेखनातून समाजाचं अंतरंग उभं करणाऱ्या आणि समाजपरिवर्तनाचे अग्रदूत होणाऱ्या या व्यक्तिमत्त्वांना मन:पूर्वक भावांजली! ही माणसं शेवटच्या श्वासापर्यंत कार्यरत राहिली. दुर्गाबाई भागवतांच्या ओळी आहेत...

आयुष्याची झाली रात
मनी तेवे अंतर्ज्योत
भय गेले मरणाचे
कोंभ फुटले सुखाचे...

'भय गेले मरणाचे' असं त्यांनाच म्हणता येतं जी निर्भयपणे जगतात.

**– डॉ. वीणा सानेकर**
सी-१२, सुयोग सोसायटी,
संत ज्ञानेश्वर मार्ग, मुलुंड (पूर्व),
मुंबई-४०० ०८१
भ्रमणध्वनी : ९८१९३५८४५६
veenasanekar2018@gmail.com

**'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेले 'अस्मितादर्श'मधील निवडक वैचारिक लेखन, कथा आणि कविता यांचे खंड**



शशिकांत सावंत


# आठवणी स्ट्रँडच्या!

**पुस्तकांच्या जगात 'आयकॉनिक' ठरलेले 'स्ट्रँड' हे दुकान नुकतेच बंद झाले, अनेक प्रश्नचिन्ह समोर ठेवून! त्यांची चिकित्सा करणे हा एक स्वतंत्र विषय ठरेल पण 'स्ट्रँडच्या आठवणी' हा अनेक वाचनवेड्यांच्या, जिज्ञासू, अभ्यासकांच्या भावविश्वाचा अविभाज्य घटक होता. दुर्मीळ पुस्तकांचा शोधयात्री शशिकांत सावंत यांनी जागवलेल्या या स्ट्रँडच्या आठवणी...**

स्ट्रँडचे नाव अनेकदा वाचले/ऐकले होते. गोविंदराव तळवलकरांनी बरेचदा स्ट्रँडचा उल्लेख केला होता. त्यांच्याच 'विकली'च्या मुखपत्रातील एका लेखातही ''महाराष्ट्रात पुस्तकांची दुकाने नाहीत, स्ट्रँडसारखा एखादाच अपवाद आहे'', असे लिहिले होते. प्रत्यक्षात जेव्हा कॉलेजमध्ये जायला लागलो तेव्हा पुस्तके वाचायला लागलो. कधी-कधी रद्दीत न्यूयॉर्कर घ्यायचो, इतरही पुस्तकं घ्यायचो, पण नवी कोरी पुस्तकं शंभर-दीडशे रुपयांपेक्षा जास्त किंमतीची असायची. ती परवडणं शक्यच नसायचं. त्यामुळे स्ट्रँडमध्ये फक्त 'विंडो शॉपिंग'च व्हायचं. कॉलेज पूर्ण झाल्यावर शिकवण्या घेऊन महिन्याला तीस रुपये मिळत. कधी-कधी पन्नास, फार तर शंभर रुपये! महिन्याला शंभर रुपये कमावून शंभर-दीडशे रुपयांची पुस्तकं कशी घेणार?

एकदा मला चक्क नवं-कोरं पुस्तक मिळालं. ते होतं आर्टबुकवार्डचं. माझ्या डोक्यात एक कल्पना आली. स्ट्रँडसारख्या नव्या पुस्तकांच्या दुकानात जाऊन हे विकावं. मी ते पुस्तक घेऊन स्ट्रँडच्या शानभागांना ते पुस्तक दाखवलं. म्हणालो, ''हे तुम्ही विकत घेणार का?'' माझ्या पाठीवर थोपटल्यासारखं करत ते म्हणाले, अशी पुस्तकं आम्ही घेत नाही. त्यांनी 'कोकीळ' किंवा 'न्यू अँड सेकंड'चं नाव सुचवलं होतं. नंतर जेव्हा 'महानगर'मध्ये काम करू लागलो आणि महिन्याला नियमित पगार मिळू लागला तेव्हा कधी-कधी स्ट्रँडमध्ये जाऊन लिहिण्यासाठी लागणारी पुस्तकं विकत घ्यायचो. उदा. हर्षद मेहतावर एक पुस्तक आलं होतं. मला ताबडतोब त्यावर लेख लिहायचा होता.

यानंतर नवी कोरी पुस्तकं आयुष्यात येऊ लागली. स्ट्रँडमध्ये तेव्हा प्रामुख्याने तीन प्रकार होते. एक होता क्लासिक्स, ती स्वस्तात मिळायची. स्ट्रँडमध्ये नेहमी समोरच टेबलावर काही पुस्तकं मांडलेली असायची. ती पुस्तकं चिक्कार स्वस्तात मिळायची. म्हणेज अगदी अर्ध्या किंमतीत किंवा चाळीस टक्के सवलतीत. तसंही स्ट्रँडमध्ये सर्वच पुस्तकांवर वीस टक्के सवलत मिळायचीच. दुसरा प्रकार म्हणजे स्ट्रँडच्या काउंटरवर जो माणूस बसायचा त्याच्या डाव्या हाताला अनेक लोकांनी निवडलेली पुस्तकं ठेवलेली असायची. ही पुस्तकं नेहमीच खुणवायची. म्हणजे, माझ्या मित्रांनीच निवडलेली पुस्तकं पाहण्यात आणि ती मागण्यात अधिक मजा असते हे माझ्या लक्षात आलं. स्ट्रँड आणि किताबखान्यात गेल्यावर लोकांनी निवडून बाजूला काढलेली पुस्तकं जास्त बघावीशी वाटतात. स्ट्रँडमध्ये पुस्तकांमध्ये वैविध्य होतं याबाबत काही शंकाच नव्हती. मुख्य म्हणजे 'हार्डबाउंड' पुस्तकं हा एक महागडा प्रकार! आजही एखादं 'हार्डबाउंड' पुस्तक नऊशे ते हजार रुपयांना असतं. स्ट्रँड अशी पुस्तकं स्वस्तात देत असे. त्यामुळे विशेषतः विज्ञानावर लिहिलेली किंवा समीक्षेसंदर्भातील पुस्तकं ही स्ट्रँडमधून घेतली जायची. अगदी अलीकडे मी स्ट्रँडमधून घेतलेलं शेवटचं पुस्तक म्हणजे चार खंडांचा जगात घडलेल्या घटनांच्या सूचींचा कोश! त्याबद्दल मी लेखही लिहिला होता. याचे मिळतील तेवढे संच मी घेतले. त्यातील एक सदानंद मोरेंनी घेतला, दुसरा पुण्याच्या एका कॉलेजने आणि तिसरा विश्वकोशासाठी करंबेळकरांनी! याप्रकारे मी जवळपास पाचही सेट विकत घेतले कारण ते स्वस्तात होते. त्यांची छापील किंमत होती जवळपास तेरा-चौदा हजार रुपये. पण स्ट्रँडने ते अगदीच एकतृतीयांश किंमतीपेक्षाही कमी किंमतीत देऊ केले होते. हीच तर स्ट्रँडची गंमत होती. चित्रकलेवरची अनेक पुस्तके स्ट्रँडमधून विकत घेतली. अर्नासनचं पहिलं पुस्तक घेतलं ते जवळपास सव्वा दोन हजारांचं आणि सवलतीत अठराशे रुपये! आज किताबखानाचं काम पाहणारा जगत तेव्हा स्ट्रँडमध्ये नोकरी करायचा. मी दिलेला अठराशे रुपयांचा चेक बाउन्स झाला. मला हे कळल्यावर मी अठराशे रुपये घेऊन गेलो आणि जगतला फोन केला. चेक बाउन्स झाला की हल्ली पैसे कापतात तसे ते पूर्वी कापले जात नसत. त्यामुळे खिशात पैसे नसताना देखील खुशाल स्ट्रँडला चेक द्यायचो आणि मग आरामात पैशांचा शोध करायचो. याप्रकारे बऱ्याचदा स्ट्रँडमधून पुस्तकं खरेदी केली.




स्ट्रँडमध्ये काही जबरदस्त 'ऑम्नीबस' मिळायचे. ऑम्नीबस म्हणजे एकाच लेखकाचे बहुतेक किंवा सर्व साहित्य एकाच खंडात असणे. यातून मी रे रॅडबरीच्या कथांचा संच फक्त तीनशे रुपयांना खरेदी केला. जे. ऑस्टीन, चार्ल्स डिकन्स याचे संच मिळायचे. आयरिस मेडॉकच्या तीन पुस्तकांचा संच, यात 'द-सी, द-सी' ही बुकर विजेती कादंबरी होती. तो संच देखील असाच स्वस्तात तीनशे-साडेतीनशे रुपयांना मिळायचा. थोडक्यात स्ट्रँडमध्ये पाचशेची नोट खिशात असली तर भरपूर खरेदी करता यायची. हजार रुपये म्हणजे खूपच! मात्र, वरती जो आर्किटेक्चर आणि पेंटिंगचा विभाग होता तो खूप महागडा होता. तिथून 'अंडरस्टँडिंग आर्ट' हे अफलातून पुस्तक घेतलं. 'थेम्स अँड हडसन' प्रकाशनाचे पिकासो, 'मॉडर्न आर्ट', 'आर्ट आफ्टर 1940' अशी अनेक पुस्तकं घेतली. हेन्री मातीसचा भला मोठा ग्रंथ विकत घेतला. असं बरंच काही विकत घेतलं आणि विकलं सुद्धा!! इथेही स्ट्रँड वीस ते पंचवीस टक्के सवलत द्यायचं. इथला फोटोग्राफी विभाग फारच समृद्ध होता.

स्ट्रँडच्या शानभागांच्या अनेक गोष्टी सांगण्यासारख्या आहेत. ते नेहमी निळा, राखाडी किंवा काळ्या रंगाचा थ्री-पीस सूट घालून उभे असत. त्यांचा खालचा ओठ किंचित सुजल्यासारखा वाटायचा. सुरुवातीला त्यांचे केस काळे होते. नंतर त्यांना टक्कल पडलं. नोकरवर्गाशी ते नेहमी कारवारी भाषेत बोलायचे. 'किते रे?', 'हांगा पळय'...हे शब्द नेहमी कानावर पडायचे. शेणॉय म्हणजे त्यांचा जणू उजवा हातच! कुमार केतकर किंवा अशी मंडळी आली की ते शेणॉय, शानभागांशी खूप गप्पा मारत. तळवलकर तर शानभागांचे जवळचे मित्रच होते. एकदा शानभाग मला म्हणाले, ''तळवलकरांनी एखाद्या पुस्तकावर लेख लिहिला की त्याचा खप वाढतो.'' असं एखाद्या मराठी संपादकाबद्दल मी पहिल्यांदाच ऐकलं. तळवलकारांनीच आम्हाला इंग्रजी पुस्तकांच्या जगाचा परिचय करून दिला. त्यांच्यामुळेच आर्थर कोसलर, स्टीवन्स, जॉर्ज मिकॉश असे कितीतरी लेखक मला कळले आणि मग स्ट्रँडमधून त्यांची पुस्तकं विकत घेतली. अगदी अलीकडे 'जेजुरी'च्या बऱ्याच प्रती स्ट्रँडमधून घेतल्या.

स्ट्रँडमध्ये एका-एका पुस्तकाचा मौसम असायचा. म्हणजे मध्येच एकदा रंगीत सचित्र अशी किट्स वगैरे अभिजात पुस्तके यायची किंवा एखादे वेळेस सायन्स फिक्शन यायचं. मला बुद्धिबळाची खूप आवड होती. स्ट्रँडमध्ये बुद्धिबळाची खूप छान छान पुस्तके होती. पण सगळीच महाग! जवळपास आठशे ते हजार रुपयांची. तरीही मी एक-दोन पुस्तकं विकत घेतली होती. स्ट्रँडच्या माझ्या व्यक्तिगत कितीतरी आठवणी आहेत. उदाहरणार्थ, एके दिवशी 'औदुंबर-पुस्तकांच्या सहवासात' या पुस्तकाच्या संदर्भात मी स्ट्रँडच्या टी. एन. शानभागांची मुलाखत घ्यायला गेलो. दोन-तीनदा फोन केले, पण मुलाखत मिळाली नाही. मग मी जेव्हा त्यांना छापून आलेलं पुस्तक दाखवलं तेव्हा त्यांना हळहळ वाटली. त्यादिवशी मला भलं मोठं 'केम्ब्रिज हिस्ट्री ऑफ थिएटर' हे पुस्तक खुणावत होतं. हजाराच्या वर किंमत होती त्याची. स्ट्रँडने त्याची किंमत सातशे रुपये लावली होती. तीही महागच होती, पण मी ते मागितल्यावर शानभागांनी त्वरित ते पुस्तक मला तीनशे रुपयांना

दिलं. मी म्हटलं, 'सातशेच घ्या', तर ते म्हणाले, 'तीनशे.' मी म्हणालो, 'सातशे.' ते म्हणाले, 'तीनशे'....पुस्तक विक्री त्यांना अशा प्रकारे उत्तेजित करत असे. निळा किंवा राखाडी रंगांचा थ्री- पीस सूट घालून, टाय लावून ते दुकानात नेहमी हजर असत. काउंटरवरच्या आणि इतर कर्मचाऱ्यांशी कारवारी भाषेत आणि वाचकांशी इंग्रजीत बोलत.

स्ट्रँडचे दार उघडल्यावर समोरच सवलतीतील पुस्तकं असायची. त्याच्या बरोबर मागच्या बाजूला डिक्शनऱ्यांचा संग्रह आणि त्यासमोर शेवटची भिंत भारतीय पुस्तकांना वाहिलेली होती. यांत दोन प्रकारची पुस्तके असत- पेंग्विनने प्रसिद्ध केलेली स्वस्त पुस्तके आणि ऑक्सफर्ड किंवा तत्सम प्रकाशनांनी प्रसिद्ध केलेली अभ्यासपूर्ण महाग पुस्तके. स्ट्रँडमध्ये आणखी दोन विलक्षण विभाग होते. एक होता पंधरा रुपयांच्या पुस्तकांचा! यांत जपानी हायकूचे तीन-चार संग्रह होते, शेक्सपिअरची स्वगतं होती. ती न्यूयॉर्कमधल्या कोणत्याही प्रकाशनगृहाने प्रसिद्ध केलेली पुस्तकं होती. शानभागांनी ती अगदी स्वस्तात आणली होती. त्यांत सगळी छोटी छोटी पुस्तकं होती- अर्ध्या तासात वाचून होणारी हार्डबाउंड पुस्तकं. या सर्वांमध्ये सुंदर लीथोग्राफ्स वापरले होते. दुसरा विभाग होता तो फिरत्या स्ट्रँडचा! यात एकाच पुस्तकाची मालिका म्हणजे एकसारखं बायडिंग, सगळी आर्ट पेपरवर छापलेली पुस्तकं. त्यात गोगॅवरचं पुस्तकं होतं, शेक्सपिअरवरचं होतं. ते मी विशाल भारद्वाजला दिलं. ही सगळी पुस्तकं दोनशे-अडीचशे रुपयांना मिळायची. त्यात अगदीच वेगळी आणि कोणालाही नको असलेली बायझेंटीयन आर्ट अशीही पुस्तकं होती, पण सगळी पुस्तकं विलक्षण सचित्र, खूप सुंदर फोटोग्राफ्स, सुंदर रेखाटनं आणि मॅन्युस्क्रिप्ट असलेली! ही मालिका हेही स्ट्रँडचं वैशिष्ट्य होतं.

स्ट्रँडबद्दल असं खूप काही सांगता येईल. स्ट्रँडचं वार्षिक प्रदर्शन हा एक सोहळाच असायचा. सुंदराबाई हॉलमध्ये कधीकधी हे प्रदर्शन भरवले जायचे आणि अगदी आठ वाजेपर्यंत लोक पुस्तक खरेदीसाठी थांबून रहायचे. शेवटी दिवे मालवले जायचे. एकदा तर मी माझे मित्र प्रकाश जोशी यांच्यासाठी पन्नास हजारांपेक्षा जास्त किंमतीची पुस्तकं घेतली. यांत आर्किटेक्चरवरचं एक्सेल म्हणजे अतिशय मोठ्या आकाराचे दोन खंड होते. आर्किटेक्चर, पेंटिंगवरची बरीच पुस्तकं होती, मॉडर्न आर्टचा इतिहास होता.

अशाच प्रदर्शनातून मी एकदा विलियम शॉनचं 'रिमेंबरिंग मिस्टर शॉन्स न्यूयॉर्कर' या वेद मेहताने लिहिलेल्या पुस्तकाच्या पाच-सहा प्रती घेतल्या. एक टिनाझ (tinaz) नुशिआन, मोनिका गजेंद्रगडकरांना, एक कुमार केतकरांना, एक आकार पटेलला दिलं. आता यापैकी माझ्याकडे एकच पुस्तक शिल्लक आहे. स्टीफन जे गोल्ड पासून हॉफसेंडरपर्यंतची अनेक पुस्तकं इथेच स्वस्तात मिळाली.मुंबईतील स्ट्रँड बंद पडलं त्याबाबत सर्वच मराठी/ इंग्रजी वर्तमानपत्रांनी लिहिलं, पण याचबरोबर, मुंबईतील वाचन संस्कृती आणि मुंबईतील इतर पुस्तकांची दुकाने याबद्दलही लिहायला हवं. हे खरं आहे की, मोठ्या शहरांमधून अनेक दुकाने बंद पडत आहेत. उदाहरणार्थ, पुण्यातील एक प्रसिद्ध दुकान असंच बंद पडलं- मॅनीझ! स्ट्रँड बंद पडतानाच 'वेवार्ड अँड वाईज'सारखं दुकान अपोलो बंदर सारख्या ठिकाणी सुरू झालं आहे याचा उल्लेख करायला हवा आणि त्याचबरोबर किताबखानाचाही!

स्ट्रँडमधील बरेच कर्मचारी, जगत आणि त्याचे सहकारी स्ट्रँड सोडून बाहेर पडले आणि त्यांनी किताबखाना हे दुकान सुरू केलं. हे जवळपास दोन-तीन हजार चौ.मी.वर पसरलेलं सुंदर दुकान आहे. त्याला एक मॅझनीन फ्लोअर देखील आहे. अत्यंत विस्तीर्ण अशा दुकानात स्ट्रँडचाच अनुभवी असा कर्मचारी वर्ग आहे. अनेक पुस्तकं विभागानुसार लावलेली असतात. पहिला विभाग भारतीय पुस्तकांचा, नंतर आकर्षक इंग्रजी पुस्तकांचा - यामध्ये इसाय बर्लीन आणि इलियटच्या पत्रांचा संग्रह आहे. स्ट्रँडप्रमाणेच इथेही सवलतीत अनेक पुस्तके विकत मिळतात. जॉन शिव्हर किंवा मागे मी ज्यांच्याबद्दल लिहिलं होतं ते जॉन अपडाइकचं चरित्रं इत्यादी. पुस्तकं इथे सवलतीत म्हणजे चारशे-पाचशे रुपयांत मिळतात. अनेक अमेरिकन निबंधांची, कवितांची पुस्तकं देखील सवलतीत मिळतात. त्यांचा कलाविषयक विभाग खूप समृद्ध आहे आणि आर्किटेक्चरवरची पुस्तकं देखील मोठ्या प्रमाणात आहेतच, पण मुलांच्या पुस्तकांचा विभाग हा सर्वात जास्त गंमतीदार आहे. मुलांची ही पुस्तके महाग आहेतच पण ती अत्यंत कल्पकतेने तयार केली गेली आहेत. उदाहरणार्थ, तारा बुक्स या संस्थेचं पुस्तक मला पहिल्यांदा सुनील महाडिक यांनी दाखवलं. यातील प्रत्येक पुस्तकाचं प्रत्येक पान हे मधुबनी किंवा कोणत्यातरी भारतीय चित्रकलेच्या शैलीतील असतंच पण अनेकदा पानांसाठी डाय तयार केलेला असतो. म्हणजेच पानांना छेद दिलेले असतात किंवा मुलांना आकर्षक वाटेल अशा रीतीने वरची पाने कापलेली असतात. यामुळे आतील पान दिसू शकते. सुंदर कागद, रंगीत छपाई यामुळे लहान मुलांची पुस्तकं पाहताना मन हरखून जातं.

'किताबखाना'त तासन् तास पुस्तकं/मासिक चाळता-वाचता येतात हे याचं वैशिष्ट्य! 'वेवार्ड अँड वाईज' हे पुस्तकाचं दुकान तसं 'हायफाय' आहे. इथली पुस्तकं खूप महाग आहेत. वॉलेस्टीवनच्या कवितांच्या संग्रहाची किंमत तेवीसशे रुपये आहे. आवडणारी बरीच पुस्तके इथे दीड-दोन हजार रुपयांच्या वरच असतात, पण विराट चांडोक जो याचा प्रमुख आहे, तो अनेक वर्षे पुस्तकांच्या दुकानात आहे. 'लोटस' नावाचं पुस्तकांचं एक अफलातून दुकान त्याने बांद्र्याला सुरू केलं होतं. या दुकानाबद्दल अरुण कोलटकर म्हणाले होते, 'लोटस इज द रिअल बुक शॉप.' अमित चौधरींच्या कवितेमध्ये ही ओळ सापडते. तर असं 'रिअल बुक शॉप' चालवणारा चांडोक नंतर काही काळ 'शॉपर्स स्टॉप' मधल्या क्रॉसवर्डमध्ये नोकरीला होता. आता त्याच्या इन्व्हेस्टमेंट बँकर मित्राने हे सुंदर दुकान सुरू केलं आहे. जवळपास ७-८ हजार नवी पुस्तकं इथे उपलब्ध आहेत. अनेक नवे लेखक - टी. वॉयल किंवा डब्ल्यू. जी. सेबॉल्ड, मिशेल वेल्वेक, पॉलीन्कील



सारख्या समीक्षिकेचे खंड, जॉन अपडाईकच्या कविता, जॉन बर्जरच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झालेला त्याचा चित्रकलेवरचा निबंध संग्रह असं बरंच काही इथे सापडतं. इथे वाईन आणि खाण्याची सेवा देखील देण्यात येणार होती, परंतु काही कारणांमुळे त्याला परवानगी मिळाली नाही, पण तसेच खास लोक आल्यावर, दुकान बंद झाल्यावर किंचित वारुणी-पानाचा आस्वाद त्यांना घेता येतो. अलीकडे निखिलेश चित्रे आणि किशोर कदम ही मित्रमंडळी खरेदीसाठी तिथे गेली असताना त्यांना हा अनुभव आला. अर्थात, या पुस्तकाच्या दुकानाला हळू-हळू चांगला प्रतिसाद मिळत आहे. लोटसचे जुने खरेदीदार आणि चांडोकला ओळखणारे अनेक ग्राहक इथे भेटतात.

मुंबईतील जुन्या पुस्तकांची दुकाने आजही अनेक ठिकाणी चालू आहेत. त्यांचे मोठे अड्डे 'न्यू अँड सेकंड हँड' आणि 'कोकीळ' बंद पडले. अरुण टिकेकरांनी त्यावर भरभरून लिहलं आहे, पण मासिक आणि नियतकालिकांसाठी किताबखानाच्या पुढच्याच कोपऱ्यावर मंडल नावाचा एक बंगाली विक्रेता दुर्मीळ मासिकं मिळवून देतो. दुर्मीळ म्हणजे नवीच पण इतरत्र न मिळणारी. अगदी कालच मी त्याच्याकडून न्यूयॉर्करचे जानेवारी- फेब्रुवारीचे चार अंक घेतले. प्रत्येक अंक दीडशे रुपयांना! पण जर न्यूयॉर्कर वेवार्डवर विकत घ्यायला गेलात तर एका अंकाची किंमत साडेबाराशे रुपये पडते, त्यामानाने दीडशे रुपये स्वस्तच! फॉरेन अभ्यासाचे अंकही त्याच्याकडे मिळतात. हे द्वैमासिक आहे आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्राचा अभ्यास करणारी मंडळी हा अंक आवर्जून वाचतात. अनेक अभ्यासकांचे लेख यामध्ये असतात. त्यातला पुतीनवरील लेख मी बाजूला काढून ठेवला आहे. बीबीसी म्युझिक नावाचं एक मासिक आहे. यामध्ये एक सीडी मासिकासोबत मोफत मिळते. हे मासिक देखील इथेच मिळतं. या मंडलला मी अनेक वर्षं ओळखतो. सर्वात पूर्वी तो इरॉस सिनेमासमोर मासिकांचा स्टॉल लावायचा. मी त्याच्याकडून काही अंक घ्यायला सुरुवात केली. आता फ्लोरा फाउंटनकडून रिगलकडे जाण्यासाठी डावीकडे वळलं की त्याचं दुकान आहे. इतक्या वर्षांच्या मैत्रीमुळे अनेकदा माझ्या खिशात पैसे नसतानाही तो मला अंक विकत देतो.

स्ट्रँडच्या निमित्ताने 'अक्षरनिष्ठांची मांदियाळी' हे अरुण टिकेकरांनी लिहिलेलं पुस्तक वाचलं. त्याच्यात 'कोकीळ', 'स्ट्रँड' या सर्वांवरच लिहिलं आहे, पण अनेक जुने दुर्मीळ विक्रेते, विशेषतः दिल्लीमधील आणि खरेदीदार यांच्याबद्दलही लिहिले आहे.

आता या पुस्तकांच्या केवळ आठवणी आणि अर्थातच पुस्तकंही उरली आहेतच.

**– शशिकांत सावंत**
भ्रमणध्वनी : ९८२१७८५६१८
shashibooks@gmail.com

सुरेश वाघे

# दोन कवयित्री

**ऐन इंग्रजी राजवटीत लोक इंग्रजी शिकू लागले. इंग्रजी वाङ्मयाचा मराठीवरही परिणाम झाला. अनेक इंग्रजी ग्रंथ विशेषत: नाटके, काव्य व कादंबऱ्या ह्यांचा मराठीत अनुवाद झाला किंवा त्यांची मराठीवर छाया पडली. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात एक कवयित्री तिच्या मृत्यूनंतर अमेरिकेत प्रसिद्धीस आली. तर विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात एक मराठी अशिक्षित स्त्री सहजगत्या गाणी म्हणत होती. तीसुद्धा मृत्यूनंतर प्रसिद्ध पावली. दोघींचा तसा कसलाही संबंध आला नाही, तरी दोघींच्या काव्यात, भावना व्यत करण्यात विलक्षण साम्य आहे! त्याचाच घेतलेला हा धावता आढावा...**

एमिली डिकिन्सन ही अमेरिकेतील मॅसॅच्युसेटस ह्या राज्यातील ॲमहर्स्ट नावाच्या एका खेडेगावात मरेपर्यंत राहिली होती. आपल्या म्हाताऱ्या आईवडिलांची देखभाल करीत ती तिच्या घरात राहिली. आयुष्यभर आसपासचा परिसर सोडून ती क्वचित कुठे बाहेर गेली असेल. अखेरच्या दिवसांत तिने मित्रमैत्रिणींना पाठविलेल्या पत्रांत कविता लिहिल्या होत्या. त्या काहीशा गूढ होत्या. त्यामुळे त्यांनी कवितांकडे गंभीरपणे पाहिले नाही.

ती वयाच्या छप्पन्नाव्या वर्षी. १५ मे १८८६ रोजी मरण पावली. तिच्या मृत्यूनंतर तिच्या बहिणीला लॅव्हिनीयाला, एक खोक्यात एमिलीच्या शेकडो कविता सापडल्या. चार-पाच-सहा कागदांची घडी करून ती व्यवस्थित ठेवलेली. लॅव्हिनीया कविता वाचत गेली आणि एमिलीच्या प्रतिभेने दिपून गेली. तिने एमिलीच्या कविता प्रसिद्ध करण्याचे ठरविले. 'ॲमहर्स्ट कॉलेजा'तील (Amherst college) एका प्राध्यापकाच्या पत्नीशी तिने संपर्क साधला. तिचे नाव मेबल लूमीस टॉड. टॉडने कविता व्यवस्थित लिहून काढल्या आणि थॉम्स हिगीन्सन ह्यांच्याकडे त्या संपादन करण्यासाठी सोपवल्या. हिगीन्सन हा तत्कालीन प्रसिद्ध लेखक होता. गंमत म्हणजे जिवंतपणी एमिलीचा त्याच्याशीही पत्रव्यवहार होता.

खरे तर एमिलीने त्याला १५ एप्रिल १८६२ रोजी पहिले पत्र पाठवले होते. पत्रासोबत तिने आपल्या अनेक कविता जोडल्या होत्या. तिच्या कवितांमधली नवनिर्मितिक्षमता पाहून तो आश्चर्यचकित झाला होता.

त्या काळात प्रचलित असलेल्या काव्यविषयक कल्पनांपेक्षा तिच्या कविता एकदम वेगळ्या होत्या. खुद्द हिगीन्सनला त्यांना कविता म्हणावे की नाही ह्याबद्दल शंका होती. अखेरीस त्याने निष्कर्ष काढला की तिच्या कविता, मुळे उखडलेल्या, पावसात व दंवात भिजलेल्या आणि मातीचा सुगंध असलेल्या, ताज्या टवटवीत अशा आहेत. त्याने त्या कविता एवढ्यात प्रसिद्ध न करण्याचा सल्ला दिला, पण तिने कविता लिहिणे थांबविले नाही.

तिच्या मृत्यूनंतर तिच्या कविता प्रसिद्ध झाल्या आणि त्या अतिशय लोकप्रिय झाल्या.


बहिणाबाई चौधरी कवी सोपानदेव चौधरी यांची आई, बहिणाबाई ह्यादेखील कवयित्री. त्या कधीही शाळेत गेल्या नाहीत. अगदी सहजगत्या त्यांच्या मुखातून ओव्या, गाणी बाहेर पडत असत. त्यांच्या मुलाने, सोपानदेवांनी, जमेल तशा त्या कागदावर उतरवून ठेवल्या. तरीपण बराच खजिना हवेतच विरून गेला.

पतिनिधनाचे दु:ख बाजूला सारून त्या हिंमतीने उभ्या राहिल्या होत्या. जळगावात राहणारी ही अशिक्षित गृहिणी जात्यावर दळता दळता, शेतात काम करता-करता सहज आपल्या अहिराणी बोलीत गीते रचत होती. वयाच्या बावन्न वर्षांपर्यंत त्या कधीही आगगाडीत बसल्या नव्हत्या. त्यांच्या मृत्यूनंतर गाणी प्रसिद्ध झाली आणि आचार्य अत्रे ह्यांनीदेखील ती डोक्यावर घेतली.

एमिली डिकिन्सन आणि बहिणाबाई चौधरी!
दोन कवयित्री, दोन खंडांतील, दोन कालखंडांतील!
पण दोघींमध्ये साम्य तरी किती!

दोघी क्वचित् आपले गाव सोडून दुसरीकडे गेल्या असतील. एमिलीवर संस्कार होते बायबल, शेक्सपिअर आणि चर्चमधील संगीत ह्यांचे तर बहिणीबाईंवर संस्कार होते ऐकलेल्या पुराणातील, रामायण-महाभारतातील कथांचे आणि जन्मजात निसर्गसौंदर्य टिपण्याचे. दोघींच्या कविता उत्स्फूर्त आणि प्रचलित काव्याच्या व्याख्येत न बसणाऱ्या. एमिलीला साहित्यिक हिगीन्सनने रोखले, तरी तिने कविता लिहिणे थांबवले नाही. ह्याउलट बहिणाबाईंनी सांगितले, ''माझी माय सरसोती, माले शिकवते बोली.'' दोघींच्या कविता त्यांच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झाल्या आणि दोघींनाही साहित्यजगताने उचलून धरले.

बरे, हे साम्य वरवरचे होते का? मुळीच नाही. एकीची कविता वाचायला जावे तर दुसरीची आठवते. शब्द तसेच नसतील; पण





आशय मात्र सारखाच वाटतो.

वैधव्याचे दु:ख सहन करताना बहिणाबाई म्हणतात–

लपे करमाची रेखा
माझ्या कुंकवाच्या खाली
पुसोनिया गेले कुंकू
रेखा उघडी पडली
(लपे करमाची रेखा)

एमिली आयुष्यभर अविवाहित राहिली. तिचा स्वभाव विक्षिप्त. फारसे कुठे येणेजाणे नाही. तरीपण मनात दु:ख होतेच.

I can wade grief,
Whole pools of it,---
I'm used to that
(Life, XVI)

(१) एमिली डिकिन्सनने शेकडो कागदांवर लिहिलेल्या कवितांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात आले:–

Life, Love, Nature, Time and Eternity and The Single Hound

तिच्या कवितांना शीर्षके नव्हती म्हणून त्यांना रोमन आकडे देण्यात आले.

बहिणाबाई सांत्वन करायला आलेल्या आयाबायांना विनवितात :

नका नका आयाबाया
नका करू माझी कीव
झालं माझं समाधान
आता माझा माले जीव
(आता माझा माले जीव)

(२) एमिलीला असाच अनुभव आला होता–

The Soul's superior instants
Occur to Her alone
When friend and earth's occasion
Have infinite withdrawn
(The Single Hound, XXXIII)

अरे, संसार संसार
जसा तवा चुल्ह्यावर
आधी हाताले चटके
तव्हा मियते भाकर!
(संसार)

त्या पुढे जात निष्कर्ष काढतात :

ऐका, संसार संसार
दोन्ही जीवाचा इचार
देतो दु:खाले होकार
अन् सुखाले नकार
(संसार)

एमिलीदेखील वेगळ्या शब्दांत असेच काहीसे सांगते–

Hope is the thing with feathers
That perches in the soul,
And sings the tuned without the words
And never stops at all
And sweetest in the gale is heard;
And sore must be the storm
(Life, XIX)

दु:खाने पिचून न जाता बहिणाई सांगतात :

हास हास माझ्या जीवा
असा संसारात हास
इडा पीडा संकटाच्या
तोंडावऱ्हे काय फास
(माझ्या जीवा)

एमिलीचे म्हणणे तरी काय वेगळे असते?


The heart asks pleasure first
And then, excuse from pain
And then, those little anodynes
That deaden suffering
( Life, XXII)

बहिणाबाईने किती सूक्ष्म निरीक्षण केले ते पाहा :
तिची उलूशीच पोच
तेच दात, तेच ओठ
तुले देले रे देवानं
दोन हात, दहा बोटं?
(खोप्यामधी खोपा)

आणि एमिली म्हणते :
Write me how many notes there be
In the new robin's ecstasy
(Nature II)
A bird came down the walk;
How did not know I saw;
He bit an angleworm in halves
And ate the fellow, raw
...
And then hopped sidewise ti the wall
To let a beatle pass
(Nature, XIX)

'धरित्रीले दंडवत' घालत बहिणाबाई सांगतात–
अशी धरत्रीची माया
अरे, तिले नाही सीमा
दुनियाचे सर्वे पोटं
तिच्यामधी झाले जमा
एमिलीचे निसर्गप्रेमदेखील तसेच वाखाणण्याजोगे–
Nature rare uses yellow
Than another hue;
Saves she all of that for sunsets,
Prodigal of blue
(Nature, XXXIX)

वाऱ्याची मोहिनी दोघींवर सारखीच होती. वारा वाहू लागला नि झाडांची पाने हलू लागली की त्या साध्या दृश्यातूनही बहिणाबाईला भक्तांची आठवण येते–
ऊन वाऱ्याशी खेयता
एका एका कोंबातून
पर्गटले दोन पानं




जसे हात जोडीसन
टाया वाजवती पानं
दंग देवाच्या भजनी
जसे करती कारोन्या
होऊ दे रे आबादानी
...
कसे वाऱ्यानं डोलती
दाने अले गाडी गाडी
दैव गेलं रे उघडी
देव अजब गारोडी
(देव अजब गारोडी)

एमिलीला वाऱ्याची बोटे आकाशाला स्पर्श करताना दिसतात.
The wind does, working like a hand
Whose finger brush the sky
(Nature XVIII)

बहिणाबाईंना वारा मारुतीचा बाप वाटतो. त्या त्याला साद घालतात :
चल ये रे ये रे वाऱ्या,
ये रे मारोतीच्या बापा
नको देऊ रे गुंगारा

पुऱ्या झाल्या तुझ्या थापा!
(उपननी)

पण एमिलीला वारा हा दमला-भागलेला माणूस वाटतो-

The wind tapped like a tired man,
And like a host, "Come in",
I boldly answered, entered then
My residence within
(Nature, XXIII)

बहिणाबाईला वाऱ्याची अनेक रूपे दिसतात :

ये रे वाऱ्या घोंगावत
ये रे खयाकडे आधी
आज कुठे रे शिरला
वासराच्या कानामध्यी
भिन भिन आला वारा
कोन कोनाशी बोलली?
मन माझं हारखलं
पानं झाडाची हालली
वारा आला रे सन्नाट्या
झाडं झुडपं डोलली
धरा मदनाच्या पाट्या
खाले पोखरी चालली
(उपननी)

एमिलीला कधी वारा हा गवताला जोरजोराने हलवताना दिसतो.

The wind begun to rock the grass
With threatening tunes and low,
He flung a menance at the earth,
A menance at the sky.
(Nature XXXIV)

पण तोच वारा बिगुल वाजवत येतानाही तिला दिसतो.

There came a wind like bugle;
It quivered through the grass,
And a green chill upon the heat

बहिणाबाईंना वारा आला की झोका आठवतो आणि वाऱ्यानं त्यांचा जीव झुलतो :

आला वारा आला वारा
वाऱ्यानं जीव झुले जी
जीव झुले जीव झुले
झाडाची डांग हाले जी
(आखजी (अक्षय तृतीया))

सूर्य उगवला की बहिणाबाईंना 'सासुरवाशिणीची' कामे आठवतात-

उठ सासुरवाशिन बाई
उठ राम पहारी डोईवर घे घडा
उठ बांग फुके कोंबडा
उठ सासुरवाशिन बाई
उठ सयपाकाले पेटव पेटव चुल्हा
वर सूर्यबापा आला
(सासुरवाशिन)

एमिली त्यामानाने भाग्यवान्! सूर्योदय डोळेभरून बघण्याचे तिला भाग्य लाभले होते-

I'll tell you how the sun rose,...
A ribbon at a time,
The steeples swarm in amethyst,
The news like squirrels ran
The hills untied their bonnets,
The bobolinks begun.
The I said softly to myself,
"That must have been the sun!"
(Nature, VII)

मात्र बहिणीबाई सूर्यास्त पाहण्याएवढी भाग्यवान् नव्हती. सूर्यास्त राहोच, रात्री झोपायचंही सुख नशिबी नव्हतं.

उठ सासुरवाशिन बाई
उठ मघ्घम राती मांड दयन तू नीट
अन् चालव बाई घरोटं
(सासुरवाशिन)

एमिली सूर्यास्ताची शोभादेखील शांतपणे न्याहाळते-

How the old mountains drip with sunset
And the break of dun!
How the hemlocks are tipped in tinset
By the wizard sun!
(Nature, XVI)

आश्चर्याची गोष्ट अशी की, सूर्यास्त पाहतानादेखील एमिलीला बहिणाबाईप्रमाणे गृहिणीची आठवण येते :

This is the land the sunset washes,
There are the banks of the yellow Sea;
Where it rose, or whither it rushes
These are the western mystery!
(Nature IX)

She sweeps with many-colored brooms,
And leaves the shreds behind;
Oh, housewife in the evening west
Come back, and dust the pond!
And still she plies her spotted brooms,
And still the aprons fly,
Till brooms fade softly into stars-
And then I come away
(Nature, X)

मन 'वढाय वढाय' असे सांगून बहिणाबाई देवालाच प्रश्न विचारतात :

देवा, कसं देलं मन
आसं नाही दुनियात
आसा कसा रे तू योगी
काय तुझी करामत!

देवा आसं कसं मन?
आसं कसं रे घडलं
कुठे जागेपनी तुले
असं सपन पडलं!
(मन)

पण एमिली नि:शंक आहे देवाबद्दल! ती ठामपणे सांगते :

Doubt me, my dim companion!
Why, God would be content
With but a fraction of the love
(Love, X)

देवाबद्दल अनेक कथा पुराणांत आहेत. पण बहिणाबाईचा देवाच्या रूपाविषयी स्वतंत्र दृष्टिकोन आहे.

सदा जगाच्या कारनी
चंदनापरी घसला
अरे सोतामधी त्याले
देव दिसला दिसला!
सोता झाला रे दगड
घाव टाकीचा सोसला
अरे दगडात त्याले
देव दिसला दिसला!
(देव दिसला, देव कुठे?)

एमिली मात्र प्रेमातच देव पाहते.

Love is anterior to life,
Posterior to death,
Initial of creation, and
The exponent of breath
(Love XXXV)

वैधव्याची कुऱ्हाड पडूनही बहिणाबाई धैर्याने हसतमुख राहून संकटांना तोंड देत होती आणि स्वत:लाच समजावत होती :

हास हास माझ्या जीवा
असा संसारात हास
इडा पीडा संकटाच्या
तोंडावऱ्हे कायं फास
जग जग माझ्या जीवा
असं जगनं तोलाचं
उच्च गगनासारखं
धरित्रीच्या रे मोलाचं
(माझ्या जीवा)

एमिलीने तितक्याच ठामपणे सांगितले–

*It was not death, for I stood up,*
*And all the dead lie down;*
*It was not night, for all the bells*
*Put out their tongues, for noon*
*( Time and Eterning XXXIV)*

बहिणाबाई शेतकरी कुटुंबातल्या. उभे आयुष्य शेतात राबण्यात गेले. त्यामुळे त्यांनी असे म्हणणे स्वाभाविकच होते :

बीय टरारे भुईत
सर्वे कोंब आले वऱ्हे
गह्यरलं शेत जसं
आंगावरती शहारे
(देव अजब गारोडी)

आणि अर्धशतकापूर्वी, एमिलीदेखील असे म्हणाली होती :

Seed, had I, my purple sowing
Should endow the Day
Not a tropic of twight
Show itself away
(The Single Hound, XLVII)

बहिणाबाई आई झाली; ते भाग्य एमिलीला लाभले नाही. परंतु दोघींचे अंत:करण आईइतकेच मृदू होते. बहिणाबाई एके ठिकाणी म्हणतात :

धरित्रीच्या कुशीमधी
बीयनियानं निजली
वऱ्हे पसरली माटी

जशी शाल पांघरली
(देव अजब गारोडी)

एमिली तितक्याच हळुवारपणे उद्‌गारते :
Nature, the gentlest mother,
Impatient of no child
The feeblest or the waywardest,
Her admonition mild
(Nature, XXXI)

मी कोण? या प्रश्नाचा शोध घेताना बहिणाबाई माणसाचा अहंकार अधोरेखित करते.

अरे मी कोन, मी कोन?
आला मानसाले ताठा
सर्व्या दुनियात आहे
माझ्याहून कोन मोठा?

आणि एमिलीही वेगळे सांगत नाही. ती म्हणते :
I took my power in my hand
And went against the world
(Life XL)

दोघींनी घेतलेला 'मी कोण?' या प्रश्नाचा हा काव्यमय शोध :
अरे मी कोन, मी कोन?
बोले भुकेलं मीपन
तेव्हा तोंडातला घास
म्हने, "तू कोन, तू कोन?"

I had been hungry all the years
My noon had come, to dine
....
I did not know the ample bread,
It was so unlike the crumb
(Life XXX)

अरे मी कोन, मी कोन?
मीपनाची मरीमाय
देखा इची कशी तऱ्हा
सोता सोतालाच खाय!

I shall know why, when time is over,
That scalds me now, that scalds me now.
(Time and Eternity, IX)

बहिणाबाईंचं उभे आयुष्य भाकऱ्या भाजण्यात गेले.

खूप रांधल्या भाकरी
दुहळी गेली भरीसनी
मंग हात धोईसनी
रस्त्यावर पडे पानी
(चुल्हा पेटता पेटेना!)

एमिली भाकरी नाही तर ब्रेड खात असे. तरी तिची तक्रार होती :
God gave a loaf to every bird
But just a crumb to me.
(Life XLVI)

थोडक्यात जीवनाचे सार सांगणारी सुभाषिते दोघीजणी किती सहजतेने लिहून जातात!

दया नाही, मया नाही, डोयाले पानी
गोगलगायच्या दुधाचं काढा वो लोनी

जल्मदात्या मायजागी सावतर माय आल्या
जशा खिरनीच्या झाडाले निंबोया आल्या

वडगन्याले ठान नही,
घरकोंबड्याले ग्यान नही
घरजावायाले मान नही

एमिलीदेखील असंच काहीसं सांगून जाते.
To lose one's faith surpasses
The loss of an estate
Because estates can be
Replenished-- faith cannot
(Life XXXIII)
The body grows outside, --
The more convenient way, --
That if the spirit like to hide,
Its temple stands always
(Life XXXIV)
A word is dead
When it is said
some say.
I say it just
Begins to live
That day.
(Life III)

Forbidden fruit a flavor has
That lawful orchards mocks;
(Life VIII)

Love is anterior to life
Posteriar to death,
Initial of creation, and
The exponent of breath
(Lofe XXXV)

बहिणाबाई आणि एमिली, दोन कवयित्री! तसं पाहू जाता दोघींत कुठलेच साम्य नाही आणि भावना व्यक्त करण्यात कुठलाच भेद नाही! एकीची कविता वाचायला जावे तरी दुसरीची साद ऐकू येते.

खरं तर दोघींच्या काव्यप्रेमाबद्दल भरभरून बोलायला हवं; तो तर एखाद्या प्रबंधाचा विषय होऊ शकेल. माझ्यापुरते म्हणायचं तर कधीमधी मन उदास झालं तर दोघींच्या कवितांचं पुस्तक उचलतो, येईल ते पान उघडतो नि वाचायला सुरुवात करतो. उदासीनता कुठच्या कुठं पळून जाते.

**संदर्भग्रंथ**



(१) चौधरी, बहिणाबाई, बहिणाबाईंची गाणी, बारावी आवृत्ती, सुचित्रा प्रकाशन, २००६

(२) Emily Dickinson : Selected Poems, Gramercy Books, N.Y., 2001


**– सुरेश वाघे**

दूरध्वनी : (०२२) २८७५२६७५

**॥ग्रंथाली॥**




# परीघ

**सचिन जगदाळे**

**मूल्य १५० रुपये**
**सवलतीत ९० रुपये**


बरेच दिवस एखादं चांगलं मराठी पुस्तक माझ्या वाचनात आलं नव्हतं पण माझ्या मिस्टरांनी मला 'परीघ' अगदी सहज म्हणून वाचायला दिलं आणि मी पुस्तक पूर्ण वाचून झाल्यावरच जागेवरून उठले. पुस्तकातली कथा ही अतिशय वेगाने पुढे जाते आणि त्यामुळे एकदा वाचायला सुरुवात केल्यावर त्यात खंड पडावा असे वाटत नाही. वेग असला तरी लेखकाची कथेवरची पकड कुठेच निसटत नाही. कथेत प्रेम, संघर्ष, राजकारण अशा पारंपरिक लिखाणात दिसून येणाऱ्या गोष्टी जरी असल्या तरी लेखकाची कथा मांडण्याची पद्धत ही मला इतर लेखकांपेक्षा वेगळी वाटली. या वेगळेपणामुळे आपण काहीतरी नवीन वाचतोय याचा आनंद पुस्तकाच्या प्रत्येक पानावर मिळत राहतो. वास्तववादी लिखाण हे मला या पुस्तकाचं आणखी एक वैशिष्ट्य जाणवलं. शरीर आणि स्वभावातले बारकावे अगदी सूक्ष्म पातळीवर जाऊन रेखाटले असल्याने सरू, सुमन, अनिरुद्ध, दादासाहेब, आप्पा इत्यादि व्यक्तिरेखा अक्षरशः डोळ्यांसमोर उभ्या राहतात. माझ्यासारख्या शहरी व्यक्तीला बसल्या जागेवरून गाव दिसू लागतं. पुस्तकाचा शेवट हा तर अगदीच अनपेक्षित आहे. लिहिण्यासारखं खूप असलं तरी एवढंच सांगेन की या 'परीघात' वाचकाने बिनधास्त गुंतून जावं.

**– ज्योत्स्ना पटवर्धन**

हेड, डेव्हलपमेंट, क्वालिटी अशुरन्स, नोव्हार्टीस इंडिया

# दिवस आलापल्लीचे

**नीलिमा क्षत्रिय**




**मूल्य २०० रु.**
**सवलतीत १२० रु.**

प्रत्येक ऋतूमध्ये आलापल्लीचं वेगळंच रूप दिसायचं. उन्हाळ्यात कोरडंठाक पडलेलं गाव, ओढ्यापलीकडचं जंगल, एका पावसातच, जादूची कांडी फिरल्यासारखे, हिरवंगार दिसू लागायचं. आठ-आठ दिवस पावसाची झड लागायची. जंगलातलाच पाऊस तो. त्याचं कोसळणं पण जंगलीच असायचं. पाणी पिऊन पिऊन, जमीन-झाडे तृप्त होऊन जात. मृद्‌गंध पसरवीत हिरवा रंग, कानाकोपऱ्यात जाऊन पोहचायचा. आणि मग निसर्गाची जादू, नजरेला भुरळ टाकू लागायची. पायवाटा आणि सडक सोडली तर हिरव्या रंगाचे विभ्रम डोळ्यांचे पारणे फेडत. पोपटी, लिंबोणी, शेवाळी, हिरवा, पारवा अशा सर्व छटांचे मिश्रण असलेला, रानफुलांचे नाजूक बुट्टे असलेला, सुंदर शालू नेसलेली आलापल्ली, एकदम श्रीमंत झाल्यासारखी वाटायची. रस्त्यांच्या बाजूला ज्या उतरणी असत, तिथे पाणी साचून मोठमोठी तळी तयार होत. त्यामधून, दोन्ही हातात मावणार नाहीत असे मोठाले बेडूक, गळ्याखालच्या पिशव्या फुगवून, कर्कश्श आवाजात डराव डराव सुरू करीत. पावसाळी पाकोळ्यांच्या झुंडीच्या झुंडी जागोजागी फेर धरताना दिसायच्या. त्यांना फडक्याने पाडून गोळा करण्यासाठी आदिवासींची मुले गर्दी करायची, पंख झाडून त्यांची चटणी करण्यासाठी. श्रावणात जमिनीतल्या बिळांमधून लालचुटूक रंगाचे मखमली किडे निघायचे. काळ्याभोर जमिनीवर कुंकू सांडल्यासारखे ते दिसायचे.

# कविता



## इतिहास आढळत नाही

...तर्काचा छेदबिंदू विशाल
बुद्धीच्या आवाक्याला ग्रासतो,
विचारांच्या पोरकेपणाला
अविचार भ्रमित करतो.

वृक्षाची अनिवार पालवी
ग्रीष्मालाही जुमानत नाही,
चिमण्या-कावळ्यांच्या 'घरात'
इतिहास आढळत नाही.

'तृष्णामुक्त' कावळा वदतो
दगड आता मिळत नाही,
चिमणीच्या घरट्यात मात्र
'ओलेते' दगड त्राही-त्राही.

कवितेच्या प्रांगणात उभी
अभिव्यक्ती अपंग होतांना,
आव 'भावण्या'चा सख्त होतो
मुखवटे खोटे ओढतांना.

नामशेष झालेला माणूस
परवा विक्रीसाठी ठेवला,
त्रिविध विचारांचा पसारा
ग्रंथांमध्ये शब्दमुक्त झाला.

– लखनसिंह कटरे
(९४०३५८३२३८)

## समुद्रमनाची असतात ती माणसं

समुद्रमनाची असतात ती माणसं
ज्यांना देता येतात फक्त आशीर्वाद
वेदना देणाऱ्यांनाही
करून टाकता येतं माफ
सर्वस्व नष्ट करणाऱ्यांनाही
ती नाहीत तुटत तीळतीळ
त्यांना देऊन दुःख
सुखात लोळणाऱ्यांकडे पाहून
बदल्याची आग नाही जाळत
त्यांच्या आतड्याला
ती नाहीत देत तळतळाट
त्यांना मरणवेदना देणाऱ्यांना
जणू त्यांना असते खात्री
निसर्गचक्र अव्याहत चालण्याची...
ती शांत पाहत असतात वाट
कडकडीत उन्हानं
समुद्राचंबाष्प होऊनबरसण्याची...

अंतराला माझ्याही लाभू दे ती धग
बाष्पीकरणाची...

**– साधना गोरे**
भ्रमणध्वनी : ९९८७७७३८०२




**रेखाटने : ईशा सानेकर**


दिनकर गांगल

# वसंत नरहर फेणे :

## सेलिब्रेशन ऑफ हिज लाइफ!

**वसंत नरहर फेणे यांनी लेखनाची आवेगी ओढ आयुष्यभर जपली. असा अखंड लेखनव्रत घेतलेला लेखक दुर्मीळ! त्यांच्या लेखनाचे सार जिच्यात उतरले आहे अशी 'कारवारी माती' ही त्यांची शेवटची साहित्यकृती 'ग्रंथाली'ने प्रकाशित केली होती. मानाने जगलेल्या या सत्त्वशील लेखकाच्या जगण्याचा दिनकर गांगल यांनी साकारलेला हा उत्सव!**






वसंत नरहर फेणे यांचा मृत्यू ६ मार्च २०१८ रोजी, एक दिवसाच्या आजाराने झाला. फेणे एक्याण्णव वर्षांचे होते. ते त्या दिवसभरात सतरा तास 'आयसीयु'त जरी होते तरी त्यांनी खाल्ले-प्यायले-क्रिकेटची मॅच पाहिली, ते दुसऱ्या दिवशी सकाळी चहा प्यायले; आणि त्यानंतर त्यांचे हृदय अचानक थांबले! डॉक्टरांच्या टिमने त्यात चैतन्य आणण्याचा प्रयत्न केला, तथापि तो निष्फळ ठरला. त्यांच्या स्मरणार्थ, गुढी पाडव्याच्या दिवशी, १८ मार्चला छोटेखानी सभा झाली. सभा त्यांच्या कुटुंबीयांनी योजली होती. साठ-सत्तर लोक हजर असतील. सभेच्या आरंभीच, फेणे यांचा मुलगा श्रीहर्ष म्हणाला, ''बाकी, बाबा कृतार्थ जीवन जगले, त्यांच्या मनाप्रमाणे जगले, शेवटच्या क्षणापर्यंत आनंदात होते. त्यांच्या मुला-नातवंडांचा परिवार मोठा आहे. ते सगळे एकमेकांना घट्ट बांधून आहेत. त्यामुळे बाबांच्या मृत्यूचा शोक करावा असे काही नाही. आपण ही सभा त्यांचा जीवनोत्सव (सेलिब्रेशन ऑफ हिज लाइफ!) अशा ढंगाने साजरी करूया. त्यांच्या छान छान आठवणी सांगुया.''

फेणे यांचे त्यांच्या वयाच्या एक्याण्णव्या वर्षीदेखील मृत्यूआधीचे तीन महिने धामधुमीचे होते. त्यांची 'कारवारी माती' ही पाचशे पानांची भलीमोठी कादंबरी डिसेंबरमध्ये प्रकाशित झाली. त्या समारंभात सुरेखा सबनीस, प्र.ना. परांजपे अशा जाणकार समीक्षक-प्राध्यापकांनी, 'ती कादंबरी म्हणजे साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळू शकेल असा ऐवज आहे' असा निर्वाळा नि:संदिग्ध शब्दांत दिला. कादंबरी १९०३ ते १९४७ या काळात घडते. व्हिक्टोरिया राणीच्या मृत्यूची बातमी कारवारच्या एका खेड्यात पोचते. त्या खेड्यातील कुटुंबाची कहाणी कादंबरीत आहे. एकीकडे देशात घडणाऱ्या मोठमोठ्या घटना आणि दुसरीकडे, त्यानुसार हेलपाटणारी त्या कुटुंबातील माणसे... वास्तव, नाट्यपूर्ण आणि हृदयस्पर्शी असे सारे चित्रण आहे. काय योग पाहा! फेणे यांची 'कारवारी माती' आणि त्या आधी सात-आठ महिने प्रसिद्ध झालेली प्रकाश लोथे यांची 'धर्मधुरीण' ही कादंबरी या दोन्ही कृतींमधील घटना स्वातंत्र्यपूर्व साधारण एकाच काळात घडतात. फेणे यांची कादंबरी 'कारवार ते मुंबई' या टापूत प्रवास करते. त्यामुळे त्यातील मुख्य पात्रावर प्रभाव आहे तो समाजवादाचा, साम्यवादाचा, कामगार आंदोलनांचा. उलट, लोथे यांची कादंबरी विदर्भात घडते. त्या नायकाचा संबंध परिस्थितीवश पुण्याशी येतो. त्यामुळे लोथे यांचा नायक सामाजिक-सांस्कृतिक प्रवाहांमध्ये हेलकावे खातो आणि ख्रिश्चन धर्मांतर करावे या स्थितीपर्यंत पोचतो. दोन्ही कादंबऱ्यांतील समान धागे पकडून 'मुंबई मराठी साहित्य संघा'त निवडक उपस्थितांच्या सभेत फेब्रुवारीच्या २७ तारखेला गोलमेज चर्चा करण्यात आली. अरुणा पेंडसे, मीना वैशंपायन, सुरेखा सबनीस, अवधूत परळकर, उषा तांबे, सुहासिनी कीर्तिकर, अनंत देशमुख, श्रीपाद हळबे अशी मातब्बर मंडळी तेथे उपस्थित होती. जवळ-जवळ सर्वांनी नि:शंकपणे सांगितले, की फेणे यांची कादंबरी वाचून श्री.ना. पेंडसे यांच्या कादंबऱ्यांची आठवण झाली. ती तितकी सघन आहे आणि मनुष्यजीवनाच्या गुंतागुंतीचा तसाच सखोल वेध घेते. फेणे तेथे चर्चा ऐकत दोन-अडीच तास निवांत बसले होते. नंतर ते मुलगा, श्रीहर्षला म्हणाले, 'मलबार हिलवर हँगिंग गार्डनची पुनर्रचना केली आहे असे ऐकले, ती पाहू आणि मग घरी जाऊ.' ते बागेत फिरलेदेखील. त्यानंतर, बरोबर सातव्या दिवशी ते 'स्वर्ग'वासी झाले! ते मधील सहाही दिवस असेच कोठे ना कोठे गेल्याचे, त्यांनी ते दिवस आनंदाने मौज-मजेत काढल्याचे कुटुंबीय सांगतात. माणसाला आयुष्य असे शेवटपर्यंत 'इव्हेंटफुल'

जगण्यास मिळणे हे दुर्मीळच!

माझा- त्यांचा संबंध 'ग्रंथाली'ने त्यांची 'सेंट्रल बस स्टेशन' ही कादंबरी १९८० साली प्रसिद्ध केली, तेव्हा प्रथम आला. त्यावेळी 'जागतिक वाङ्मयात एअरपोर्ट' वगैरेसारख्या कादंबऱ्यांमधून 'फॅक्शन' नावाचा वाङ्मयप्रकार प्रचलित होत होता. फॅक्ट्सवर आधारित अशी फिक्शन! आमच्यापुढे फेणे यांची जी कादंबरी आली होती ती म्हणजे त्या प्रकारातील उत्तम कलाकृती! एस्टीचा ड्रायव्हर हृदयविकाराचा झटका येऊन मरण पावतो. गाडी थांबते. सर्व प्रवासी सुखरूप असतात. परंतु फेणे यांनी नाशिकला मुख्य सीबीएस स्टेशनच्या ठिकाणी त्यामुळे जे नाट्य घडते, त्याचे वास्तववादी व मनोवेधक चित्रण केले आहे. ती कादंबरी त्या काळात बऱ्यापैकी चर्चिली गेली, पण फेणे यांचा व आमचा संबंध खूप वाढला नाही. माणूस एककल्ली असा, पण सिगारेट तल्लीनतेने ओढे. ते लक्षात राहिले. फेणे यांची दोन पुस्तके – 'पहिला अध्याय' व 'हे झाड जगावेगळे' पुण्याच्या प्रकाशकाने प्रसिद्ध केली होती. त्यांचे वितरण 'ग्रंथाली'ने करावे अशी इच्छा प्रकाशकाने व्यक्त केली. व्यक्तिगत वाचकापर्यंत पोचण्याचा 'ग्रंथाली' हा हमखास मार्ग त्या काळी प्रकाशकांना वाटे. आम्ही त्या कादंबऱ्यांच्या प्रत्येकी तीनेकशे प्रती संच स्वरूपात विकल्या. त्या काळातसुद्धा फेणे यांच्याशी संपर्क येईल असे वाटत होते, परंतु तसे घडले नाही. फेणे मानीपणाने वागत



आणि व्यवहारांपासून दूर राहत.

त्यांचे लेखन नेटके होते. त्यातील कथनकौशल्य सुबकपणे व्यक्त झालेले जाणवे, पण आम्हाला त्या काळी अनघड साहित्याचा मोह जास्त वाटत होता. मात्र आता, सहा महिन्यांपूर्वी फेणे यांचे काही अनुभव, विचार 'डॉक्युमेंट' करावे म्हणून 'थिंक महाराष्ट्र डॉट कॉम'साठी कॅमेरा घेऊन त्यांच्या खारच्या घरी गेलो. तेव्हा फेणे यांचे वय नव्वदी ओलांडून गेलेलेच होते. त्यांची आस्था कोकणी ढंगाची होती. त्यांचे अगत्य खूप जाणवले. त्यांनी गप्पा भरपूर मारल्या. त्यांना त्यांची मायभूमी कारवारची फार आठवण येई. ते वारंवार त्या गोष्टी बोलत. त्याच वेळी त्यांच्या बोलण्यात ते 'कारवारी माती' या नावाची कादंबरी गेली आठ-दहा वर्षे लिहीत आहेत असे आले. 'डॉक्युमेंटेशन'साठी हवे तसे बोलणे त्यांच्याकडून मिळत नव्हते. परंतु ते घरंगळत-घरंगळत असे बरेच काही बोलत होते. त्यामुळे आम्ही आपल्याला हवे ते साहित्य, त्यांच्या वारंवार भेटी घेऊन मिळवावे असा विचार करून, त्या दिवसापुरते थांबलो. पण दरम्यान, 'ग्रंथाली'ने त्यांची 'कारवारी माती' प्रसिद्ध करण्यास घेतली. ती प्र.ना. परांजपे व मनोज आचार्य यांच्या सहकार्याने दोन महिन्यांत सिद्धदेखील केली आणि कादंबरीचा प्रकाशन समारंभ २ डिसेंबर २०१७ ला ठरला. आम्ही त्यांचे शूट केलेले काही चित्रण असल्यामुळे त्या समारंभात फेणे यांच्यावर आठ-दहा मिनिटांची फिल्म दाखवावी असा फंडा निघाला. मग त्यासाठी फेणे यांच्या मुलाकडूनच त्यांची जवळ-जवळ तीस पुस्तके मिळवली, ती चाळली-वाचली आणि आठ मिनिटांचे निवेदन तयार केले. तेव्हा मात्र त्यांच्या वैविध्यपूर्ण व विविधगुणी लेखनाने स्तंभित होऊन गेलो. वाटले, एवढा मोठा सखोल, संवेदनाशील, बुद्धिप्रगल्भ आणि तरल लेखक दुर्लक्षित कसा झाला? मराठी साहित्यविश्वाने त्यांची उपेक्षा का केली?

मी ज्या फेणे यांना गेले सहा महिने पाहत होतो ते त्यांच्या स्वत:च्या जीवनात मस्त खूष होते. खारच्या घरात एकटे राहत होते. रोज जेवणाचा डबा 'शिवाजी पार्क'च्या मुलाकडून येत होता. त्यांचा रोजचा वेळ कसा जात होता ते त्यांचे त्यांनाही सांगता येत नसे. पण भेटी, समारंभ मुख्यत: कौटुंबिक असत. त्यांच्या वयाच्या ऐंशीव्या वर्षी त्यांच्या निवडक कथांचा 'ध्वजा' नावाचा संग्रह समारंभपूर्वक प्रकाशित करण्यात आला. त्यांची मुले-नातवंडे पार अमेरिकेपासून आली. पुस्तकाला त्यांची ताकद प्रकट करणारा 'लोकसत्ते'चे तत्कालीन संपादक कुमार केतकर यांचा पुरस्कार लाभला. त्यांचे जुने स्नेही प्र.ना. परांजपे सोबत होते. त्यांनी त्यांना श्रेष्ठ वाटणाऱ्या पुस्तकाच्या नावाच्याच 'ध्वजा' कथेचे आकलन मांडले व त्या निमित्ताने फेणे यांच्या एकूण कथा-साहित्याचा आढावा घेतला. परांजपे लिहितात- 'फेणे यांच्या कथांतील वैविध्य इतर लेखकांच्यात क्वचित आढळते. फेणे यांच्या कथा वाचकांना अस्वस्थ करतात, विचारप्रवृत्त करतात व त्यामुळेच उत्कृष्टही वाटतात.' तरी फेणे मराठी वाङ्मयात अग्रस्थानी आले नाही. त्यांची बोलबा झाली नाही.

वसंत नरहर यांचा जन्म मुंबईत झाला तरी त्यांचे बालपण कारवारला गेले. त्यांची वाढ त्या काळातील सुशिक्षित कुटुंबातील मुलांची होई तशीच झालेली आहे. त्यांनी छोटे मूल म्हणून वर्षे-सहा महिने वडिलांबरोबर दिल्लीलादेखील घालवले. ते कारवारला 'राष्ट्र सेवा दला'त गेले. त्यांचा एक भाऊ बेचाळीसच्या चळवळीत स्थानबद्ध होता. नंतर पुलंनी जोगेश्वरीच्या ज्या सरस्वती बागेचे वर्णन केले आहे तेथे फेणे यांच्यावर नाटक व अन्य सांस्कृतिक कार्यक्रम यांचे संस्कार झाले, त्यांचे एक काका तेथे क्रियाशील होते व पुलंच्या लेखात त्यांच्या कामाचा उल्लेख आहे. फेणे स्वत: मात्र समाजजीवनात खूप मिसळले नाहीत. ते नाशिकला एसटीत नोकरीला असताना त्यांचा व चंद्रकांत महामिने, मनोहर शहाणे, चंद्रकांत वर्तक असा गप्पांचा ग्रूप होता, तो घट्ट. त्यांचे मुंबईत मित्रवर्तुळ नव्हते, ना ते साहित्यिक वा प्रकाशन कार्यक्रमांत दिसत. त्यांचे लेखक जयवंत दळवी व संपादक उमाकांत ठोमरे यांच्याशी घनिष्ट संबंध होते. फेणे लिहितात, 'संबंध होते पण ते माझ्या बाजूने. त्यांच्याकडून ते किती जवळ-दूरचे होते हे त्यांना ठाऊक.' फेणे इतके सावध! प्र.ना. परांजपे म्हणाले, की फेणे लेखन उत्कटतेने व मन:पूर्वक करत, परंतु लेखन पूर्ण झाल्यावर ते पुढे प्रसिद्धीस देण्यासाठी फार चोखंदळ राहत नसत. ते लेखन जो प्रकाशक त्यांच्यासमोर येईल त्या प्रकाशकाच्या स्वाधीन करत. ते स्वत:ला किंवा लेखनाला प्रसिद्धी मिळावी म्हणून फार उत्सुक नसत. त्यांना लेखन करण्याची मात्र आवेगी ओढ होती. म्हणून त्यांनी वयाच्या बावन्नाव्या वर्षी स्वेच्छानिवृत्ती घेतली व फक्त लेखनास वाहून घेतले. तसे लेखनव्रत घेतलेला लेखक मराठीत नाही. ते स्वत:लाच मी लेखन का करतो?' हा प्रश्न विचारून त्याचे उत्तर देतात, 'कारण मी लेखक आहे, म्हणून!' इतकी त्यांची लेखननिष्ठा!

फेणे यांनी मुख्यत: कथा-कादंबऱ्या लिहिल्या, गरजेप्रमाणे एखाददुसरे नाटकही लिहिले. त्यांनी स्वत:विषयी, स्वत:च्या जीवनाविषयी जवळ-जवळ लिहिले नाही. त्यांच्या 'शब्द अब्द' या पुस्तकात आत्मपर लेखन येते, ते मुख्यत: त्यांना हार्ट अॅटॅक आला होता, त्यासंबंधी आणि त्यांच्या बालपणीच्या काही आठवणी. ते वर्णन 'ग्राफिक' आहे. त्यांच्या पत्नीचा मृत्यू अकाली झाला. त्यांचे नाव मंगला. फेणे यांनी 'मंगलाचरण' असा एक वेगळाच ललित लेख त्या पुस्तकात शेवटी लिहिला आहे. त्या लेखातून त्यांची मनसंपन्नता आणि स्वप्नाळू वृत्ती, दोन्ही दिसून येते. त्यांनी त्या लेखात पत्नीच्या स्त्रीत्वाचा फार मोठा सन्मान केला आहे. त्यांच्या मनी पत्नी व एकूण स्त्रिया यांच्याबद्दल मानाचे व आदराचे स्थान आहे. ते सर्वत्र तितक्याच तीव्रतेने व्यक्त होते. त्यांनी जयवंत दळवी व उमाकांत ठोमरे या साहित्य जगतातील दोनच लेखकांबद्दल लिहिले आहे, ते त्या दोघांच्या मृत्यूनंतर. ते लेखन आत्मीयतेचे झाले आहे; दळवी यांच्यावरील लेख तर सुहृद भावाचा आहे. पण तेथेही ते स्वत्व सोडून देत नाहीत. त्यातील एक परिच्छेद पाहा, बरे. फेणे सत्त्वाचे किती पक्के होते ते त्यावरून कळते. मला नावडणारा एकच प्रश्न त्याने (जयवंत दळवी यांनी) मला विचारला होता. माझ्या

पत्नीच्या निधनानंतर तो प्रश्न अनेकांनी मला विचारला होता. तो प्रश्न म्हणजे 'आता जेवणाची सोय काय केलीय?' मी काय व्यवस्था केली आहे ते त्याला सांगितले आणि म्हटले, अनेक जण हा प्रश्न करतात आणि ते मला बायकोविषयीच्या माझ्या भावनांचाच नव्हे तर बायकोचाही अधिक्षेप करतात असे मला वाटते! काय मोठे मन होते त्या माणसाचे! ते ठायी-ठायी तशाच विशालतेने प्रकट होते. किंबहुना त्यांच्या कथा आणि कादंबऱ्या यांच्यासाठी त्यांनी ज्या कथावस्तू निवडल्या आणि त्यामधून जो आशय प्रसृत केला त्यामधूनदेखील लेखकाच्या असाधारण गुणवत्तेचे मनच जाणवून जाते. त्याचा प्रत्यय मी त्यांचे जे साहित्य वाचले त्यामधून आला होताच, पण त्याहून अधिक थेटपणे त्यांच्या मृत्यूनंतरच्या सभेत आला. त्यांचे साताठ नातेवाईक सभेत बोलले असतील. प्रत्येकाने तो माणूस वेगळा होता - 'या भूतलावरील नसावा असा' अशा प्रकारचे किस्से वा हकिगती सांगितल्या.

मानवी मन व मानवी संबंध यांचा वेध प्रत्येक लेखक घेत असतो. फेणे यांनी तो फार सखोलतेने घेतला. पाणबुड्याने सागरात खोलवर जाऊन तेथील सृष्टी व्यापकतेने व सूक्ष्मतेनेही पाहावी, तशा प्रकारे. त्यांच्या कथांचा व कादंबऱ्यांचा आवाका, त्यांचे प्रकटीकरण आणि कथा-कादंबऱ्यांची पार्श्वभूमी हे सारे वेगवेगळे आहे; पण त्यामध्ये अंत:सूत्र आहे ते मानवी जीवनाची व नातेसंबंधांची गुंतागुंत जाणून घेण्याचे. काही नाती जन्माने तयार होतात, काही नाती माणूस जीवनप्रवाहात जोडतो. त्यामधून प्रेमभावनेचे व नीतिमूल्यांचे विचार प्रकट होत जातात आणि जीवनदर्शन घडते. फेणे यांनी त्यांच्या अनेक पुस्तकांतून असा जो पसारा मांडला आहे त्याचे सार त्यांच्या अखेरच्या 'कारवारी माती' या कादंबरीत येते. त्यामुळे फेणे तेथे सर्वसामर्थ्यानिशी प्रकटलेले जाणवतात. संपादक उमाकांत ठोमरे यांनी फेणे यांच्या पात्राच्या तोंडचे एक वाक्य एका ठिकाणी उद्धृत केले आहे - माणसाबद्दल ठामपणे एकच सांगता येते, की माणसाबद्दल ठामपणे काहीच सांगता येत नाही!


दळवी-तेंडुलकर-खानोलकर हे फेणे यांचे समकालीन. त्यांच्यापैकी दळवी जगन्मित्र व लोकप्रिय साहित्यिक, तेंडुलकर यांचा वेगळा साहित्यप्रवाह होता. त्यांनी आधुनिक जाणिवा व्यक्त केल्या. ते नाटक-सिनेमांच्या अंगाने अधिक प्रसिद्ध होते. खानोलकर यांची प्रतिभावान कवी-लेखक अशी एवढी मोठी ख्याती होती, की त्यांचे स्वत:चे स्वतंत्र व स्वायत्त विश्व भासे. मी त्या तिघांच्या पंक्तीत फेणे यांचे नाव घेत आहे, कारण त्यांचे लेखनसामर्थ्य त्या तोडीचे होते. पण त्यांच्या पंक्तीत फेणे यांचे नाव घेतले मात्र जात नाही. किंबहुना, फेणे विषयांची निवड व त्याची मांडणी या बाबतीत त्या तिघांइतकेच श्रेष्ठ वाटतात. सुबोध जावडेकर यांनी फेणे यांच्या मृत्यूनंतरच्या सभेत त्यांच्या साहित्याचे तीन गुण सांगितले - १. भविष्यसूचक लेखन, २. 'बोल्ड' मांडणी, ३. परकाया प्रवेश. त्यांच्या त्या गुणांची अनेक उदाहरणे त्यांच्या साहित्यात सापडतात. फेणे यांनी 'सखाराम बाईंडर'शी नाते सांगता येईल असे नाटक तेंडुलकरांच्या नाटकाआधी लिहिल्याचे नमूद केले आहे. त्यांच्या 'शतकांतिका'मध्ये ज्या पाच स्त्रियांच्या कथा आहेत त्याही गेल्या शतकातील स्थित्यंतराचा आढावा घेता-घेता भविष्याचे सूचन करतात. फेणे हा लेखक त्यांच्या बऱ्याचशा लेखनातून त्यांच्या सभोवतालच्या 'टिपिकल' मध्यमवर्गीय लेखकांपेक्षा कितीतरी वेगळा वाटतो! सामाजिक जाणिवेच्या बाबतीत तर त्यांची बुद्धी खरोखरीच वैश्विक पातळीवर चालते. महाराष्ट्रातील कथानकात ते दलित-सवर्ण संघर्ष कादंबरीतून मांडतात तर ते काही कथांमध्ये दक्षिण आफ्रिका, अमेरिका येथील व्यक्तिरेखांपर्यंत पोचतात आणि तेथील सामाजिक विद्वेष वेधक व भेदकरीत्या वर्णन करून सांगतात. 'ध्वजा' नावाच्या त्यांच्या निवडक कथांच्या संग्रहात त्या पुस्तकाच्याच नावाची कथा 'कम्युन'मधील जिण्यातील पेच वर्णन करते. फेणे यांच्या विचारात, कथनात अशी सतत प्रगती व आधुनिकता व्यक्त होत राहिली आहे. त्यांचा त्यांच्या लेखनातून सतत विकास होत गेलेला जाणवतो आणि अखेरीस 'कारवारी माती'त ते पुन्हा 'रूट्स'कडे वळलेले दिसतात. माणसाची ती ओढच विलक्षण आहे. किंबहुना, कोकणी माणसाचा चिवटपणा आणि जीवनाकडे त्रयस्थपणे पाहण्याची वृत्ती फेणे यांच्या रंध्रारंध्रात मुरलेली जाणवते. त्यांची पुतणी रंजना हिने त्यांची जीवनवृत्ती कमलपत्राप्रमाणे होती असे केले. ते जीवनात राहिले, त्यांनी जीवनरस शोषला, परंतु 'जीवन' अंगाला मात्र लागू दिले नाही.

त्यांच्या आगेमागे जगलेले श्री.दा. पानवलकर, दि. बा. मोकाशी असे कसदार लेखकही मराठी साहित्यात दुर्लक्षित झाले, पण त्यांपैकी पानवलकर अल्पप्रसवी लेखक होते. उलट, दि.बा. मोकाशी यांनी बरेच लिहिले, विविध लिहिले, त्यांची जन्मशताब्दी होऊन गेली, पण त्यांना मराठी साहित्यात योग्य स्थान मिळाले नाही. फेणे यांची जातकुळी ती म्हणता येईल, कदाचित त्याहून अधिक सघन व सखोलही. मोकाशी यांनी माजगावकर-तेंडुलकर हा आस तरी पकडून ठेवला होता. फेणे अशा सर्व सर्व साहित्यदुव्यांपासून दूर राहिलेले जाणवतात.

वसंत नरहर फेणे प्रदीर्घ जगले, सर्व काळ मानाने जगले, एकलेपणाने जगले, सत्त्वाने जगले, त्यामुळे त्यांच्या जगण्याचा महोत्सव करणे हे उचितच होय. त्यांनी त्यांच्या जगण्यातून आणि त्यांच्या साहित्यातून जी मूल्ये मांडली ती सध्याच्या अस्वस्थ काळात कशी जपली जातात व टिकतात हे पाहणे अधिक औचित्याचे होईल.

**- दिनकर गांगल**
भ्रमणध्वनी : ९८६७११८५१७
dinkargangal39@gmail.com

# अरुण साधू स्मृती : आवाहन



सप्रेम नमस्कार,

कै. अरुण साधू हे आपल्या ग्रंथाली' परिवारातील निकटचे सदस्य होते. ते ग्रंथाली' वाचक चळवळी'च्या निर्मितीपासून ग्रंथप्रसाराच्या अनेक मोहिमांमध्ये आपल्या सर्वांबरोबर हिरिरीने सामील झाले. त्यांच्या अनेक हृद्य आठवणी आपल्या सर्वांच्या मनात आहेत. त्यांना स्थायी रूप देण्याची वेळ आली आहे. ग्रंथाली'शी तुमचा एका मोठ्या पिढीतील वाचक/कार्यकर्ता म्हणून जवळचा संबंध राहिला आहे म्हणूनच काहीशा हक्काने आणि बऱ्याचशा स्नेहाने हे विशेष आवाहन तुम्हाला करत आहोत.

अरुण साधू हे मराठी समाजात खोलवर रुजलेले लोकप्रिय लेखक होते. त्यांनी मराठी साहित्यास नवे वळण दिले. त्यांनी वर्तमान काळातील संदर्भांतूनही स्थायी मूल्ये प्रकट करता येऊ शकतात हे दाखवून दिले. त्यांच्या 'मुंबई दिनांक'पासून 'मुखवटा'पर्यंतच्या कादंबऱ्या व 'चे गव्हेरा आणि क्रांती'पासून 'रशियन क्रांती'पर्यंतचे वैचारिक लेखन यांमधून त्यांची प्रज्ञा व प्रतिभा सार्थपणे व्यक्त होते. त्यांनी चरित्रात्मक लेखनही इंग्रजी-मराठीतून केले. या सर्वांमुळे त्यांची साहित्यसंमेलनाध्यक्ष म्हणून नागपूरला निवड सहज झाली. अध्यक्षीय सूत्रे योग्य साहित्यिकाच्या हाती गेल्याचे समाधान वाङ्मयीन वर्तुळातून व्यक्त झाले.

ते व्यवसायाने पत्रकार होते. त्यांनी पत्रकारितेतही उच्च स्थान मिळवले. त्यांनी पुणे विद्यापीठातील वृत्तपत्रविद्या विभागाचे (रानडे इन्स्टिट्यूट) प्रमुखपद काही वर्षे सांभाळले. त्यांच्या हाताखाली अनेक जागरूक पत्रकार तयार झाले.

अरुण साधू यांचे निधन अल्पशा आजाराने २५ सप्टेंबर २०१७ ला काहीसे अचानक झाले. पत्रकारिता व साहित्य या दोन्ही क्षेत्रांत असाधारण कामगिरी असलेले अरुण साधू स्वभावत: अबोल असले तरी त्यांनी त्यांच्या ऋजू स्वभावाने अनेकानेक माणसे जोडली होती. त्या सर्वांना साधू यांची स्मृती यथायोग्य जपली जावी असे वाटते. त्या दृष्टीने पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूंशी आणि रानडे इन्स्टिट्यूटच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून काही प्राथमिक योजना आखल्या जात आहेत. त्यांचे अंतिम स्वरूप संकलित होणाऱ्या निधीवर अवलंबून राहील. विनंती अशी, की तुम्ही तुम्हाला शक्य तितकी रक्कम 'अरुण साधू यांच्या स्मृतीसाठी' असे म्हणून ग्रंथाली'च्या खात्यामध्ये जमा करावी. स्मारक कसा आकार घेत आहे ते तुम्हाला कळवले जाईलच.

ग्रंथाली'च्या बँक खात्याचा तपशील –

Bank Name : IDBI
Branch : Dadar (E), Mumbai – 400 014
IFSC Code : IBKL0000454
Account Name : Granthali
Account No. : 0454651000000356


ता.क. धनादेशासोबत पॅन कार्ड व आधारकार्डाची झेरॉक्स प्रत जरूर पाठवावी.
या प्रती granthaliruchee@gmail.com या मेलवरही पाठवता येऊ शकतील.

चेक पोस्टाने पाठवायचा झाल्यास 'ग्रंथाली' या नावाने पुढील पत्त्यावर पाठवावा.
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ ☎ २४२१६०५०, ४३०६६२४

अर्जुन डांगळे

# आंबेडकरी विचारांच्या पाऊलखुणा दमदार करणारा द्रष्टा विचारवंत

**आंबेडकरी चळवळीला वैचारिक नेतृत्व देणारे 'अस्मितादर्श'चे ध्येयनिष्ठ संपादक, लेखक-समीक्षक आणि प्राध्यापक डॉ. गंगाधर पानतावणे यांचे नुकतेच दु:खद निधन झाले. त्यांना 'शब्द रुची'चे विनम्र अभिवादन! लेखणी एकवटून सतत कार्यरत राहिलेल्या या द्रष्ट्या-कृतिशील विचारवंताच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू रेखाटले आहेत लेखक अर्जुन डांगळे यांनी...**



१९६० नंतर मराठी साहित्यात विशेषत: 'सत्यकथा' संप्रदायाविरुद्ध, प्रस्थापित वाङ्मयीन मूल्यांविरुद्ध संतप्त पिढीने 'लिटिल मॅगझिन'ची चळवळ सुरू केली. दि. पु. चित्रे, राजा ढाले, सतीश काळसेकर, अशोक शहाणे, चंद्रकांत खोत, तुलसी परब, वसंत गुर्जर ही त्यातली काही प्रमुख नावं. 'येरू', 'असो', 'फक्त', 'टिंब', 'भारुड' ही त्यांच्या अनियतकालिकांची नावं होती. याच काळात बाबुराव बागुलांची कथा दलितांच्या व्यथा-वेदनांची कहाणी सांगत विद्रोहाच्या धडका देऊ लागली होती. नारायण सुर्वे यांची कामगारांच्या संघर्षमय जीवनाची कविता 'तळपती तलवार' होऊन मराठी 'सारस्वतांना आव्हान' देऊ लागली होती. याच काळात दलित लेखक-कवींची पिढी आकार घेऊ लागली होती. दलित साहित्य, पुरोगामी साहित्य आणि 'लिटिल मॅगझिन'ची चळवळ या जरी स्वतंत्र आणि समांतरपणे चाललेल्या चळवळी असल्या तरी त्यामध्ये परस्पराबद्दल जिव्हाळा होता. आंतरिक आणि वैचारिक नातं होतं.

मुंबई, नागपूर, औरंगाबाद ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीची मुख्य केंद्रे आहेत. औरंगाबाद हे दलितांच्या साहित्यिक-सामाजिक चळवळीचं केंद्र झालं. याचं कारण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी औरंगाबादेत केलेली मिलिंद महाविद्यालयाची स्थापना होय. येथील बहुसंख्य विद्यार्थी हे महाराष्ट्राच्या विविध ग्रामीण भागातील होते. प्राध्यापक वर्गदेखील बहुतेक दलित समाजातील होता. जे दलितेतर प्राध्यापक होते त्यांची दलित चळवळीशी जवळीक होती. दलितांच्या साहित्यिक-सांस्कृतिक चळवळीविषयी विचारांची देवाण-घेवाण होत होती. कॉलेजातील वार्षिकातून दलित वर्गीय विद्यार्थ्यांचे लिखाण प्रसिद्ध होत होतं.

१९६७ हे वर्ष दलित साहित्य चळवळीचा दृष्टीने अतिशय महत्त्वाचं होतं. औरंगाबाद येथील मिलिंद महाविद्यालयातील विद्यार्थी आणि प्राध्यापकांना आपलं साहित्यिक व्यासपीठ असावं असं वाटत होतं. याच वर्षी 'मिलिंद साहित्य परिषदे'ची स्थापना झाली. या परिषदेचं उद्‌घाटन त्या वेळी मराठवाडा विद्यापीठाचे कुलसचिव असलेले प्राचार्य म. भि. चिटणीस यांनी केलं. अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध साहित्यिक शंकरराव खरात होते. या परिषदेचे सल्लागार प्राचार्य म. ना. वानखेडे आणि प्राचार्य शिंदे होते, तर अध्यक्ष प्रा. गंगाधर पानतावणे होते. यात महत्त्वाचा मुद्दा हा की याच प्रेरणेतून याच वर्षी विद्यार्थ्यांच्या साहाय्याने फंड उभारून 'अस्मिता'नावाचं वाङ्मयीन त्रैमासिक सुरू करण्यात आलं. प्राचार्य डॉ. म. ना. वानखेडे हे संपादक तर डॉ. गंगाधर पानतावणे, प्रा. रा. ग. जाधव, प्रा. ल. बा. रायमाने, सुखराम हिवराळे आणि वामन निंबाळकर हे सहाय्यक संपादक होते. या त्रैमासिकाच्या पहिल्याच अंकातील 'महाराष्ट्रातील सांस्कृतिक संघर्ष आणि वाङ्मयीन समस्या' या विषयावरची चर्चा अतिशय महत्त्वाची ठरली. या चर्चेत डॉ. म. ना. वानखेडे, प्रा. वा. ल. कुलकर्णी, प्रा. रा. ग. जाधव, प्रा. मे. पुं. रेगे, प्रा. म. भि. चिटणीस यांनी भाग घेतला होता. एकूण त्या काळात दलितवर्गीय लेखकांची जी वैचारिक कोंडी झाली होती, ती फोडण्याचं मोठं काम या चर्चेने केलं. पुढे नव्या दमाच्या दलित साहित्यिकांच्या निर्मितीक्षमतेला आणि सर्जनशीलतेला

> औरंगाबादला नुकताच त्यांना भेटायला गेलो होतो. सरांना पद्मश्री पुरस्कार घोषित झाला होता. ‘अस्मितादर्श’ने एक मोठा कार्यक्रम करायचे योजले होते पण ते सारेच राहून गेले. माझ्या ‘निळे अधोरेखित’ या संग्रहाला त्यांनी अतिशय जिव्हाळ्याने प्रस्तावना लिहून दिली. प्रकाशकांना मलपृष्ठावर त्यांच्या हस्ताक्षरातल्या ओळी हव्या होत्या. सरांनी त्याही विनातक्रार आवडीने लिहून दिल्या. माणसांवर त्यांनी खूप प्रेम केले. ते ठामपणे भूमिका घेणारे लेखक-संपादक होते. सद्य परिस्थितीत त्यांचे असणे खूप गरजेचे होते. आंबेडकरी साहित्याची किंबहुना एकूण मराठी साहित्याचीच आज खूप मोठी हानी झाली आहे.

आकार देऊन तिला प्रकाशात आणण्याचं काम ‘अस्मितादर्श’ने केलं. या त्रैमासिकामुळे तरुण दलित साहित्यिकांमध्ये जो आत्मविश्वास निर्माण झाला तो चळवळीला पुढे नेणारा ठरला. बाबुराव बागूल, शंकरराव खरात, केशव मेश्राम हे सामाजिक जाणिवेचे लेखक लिहीतच होते. परंतु त्या प्रवाहात अनेक नवीन समृद्ध चेहरे येऊन मिळाले. पुढे १९६८ पासून आजतागायत डॉ. पानतावणे यांनी ‘अस्मितादर्श’च्या संपादकपदाची जबाबदारी निभावली.

दया पवार, वामन निंबाळकर, मी, उमाकांत रणधीर, ज. वि. पवार, त्र्यंबक सपकाळे, सुधाकर गायकवाड, फ. मुं. शिंदे, राम दोतोंडे यासारखे कवी आणि ताराचंद खांडेकर, योगीराज वाघमारे, अविनाश डोळस, योगेंद्र मेश्राम, भीमराव शिरवाळे ही सुरुवातीच्या काळातील काही नावं होती. नंतरही ‘अस्मितादर्श’मधून घडलेल्या लेखक-कवींची लांबलचक यादी आहे.

‘अस्मितादर्श’ने वाङ्मयीन क्षेत्रात जो दबदबा निर्माण केला त्याला संपादक म्हणून डॉ. गंगाधर पानतावणे यांची वाङ्मयीन जाण, त्यांची कल्पकता आणि निष्ठा कारणीभूत आहे. विशेषत: नव्या ‘टॅलेण्ट’ला वाव देण्याची त्यांची शोधक नजर लक्षणीय होती. याचं उत्तम उदाहरण म्हणजे सुधाकर गायकवाडसारखा शांतपणे लिहिणारा लेखक, कवी, विचारवंत होय.

डॉ. पानतावणे यांनी एका वैचारिक पातळीवर मार्क्सवादाला विरोध व्यक्त केला. किंबहुना दलित साहित्याचं वैचारिक अधिष्ठान मार्क्सवाद, आंबेडकरवाद की दोहोंचा समन्वय, यावर त्या काळी बरेच जंगी सामने रंगले होते. एकीकडे प्रा. गंगाधर पानतावणे यांचा संघ तर दुसरीकडे बाबुराव बागूल यांचा संघ होता. डॉ. रावसाहेब कसबे, दया पवार, मी, नामदेव ढसाळ, डॉ. यशवंत मनोहर, डॉ. भाऊ लोखंडे, प्रा. अविनाश डोळस हे बाबुराव बागूल यांच्या संघाचे खेळाडू होते. वामन निंबाळकर पूर्वी पानतावणे यांच्या संघात होते. नंतर ते आमच्या संघाला येऊन मिळाले. या दोन्ही संघांविरुद्ध म्हणजे ‘दलित साहित्य’ या संकल्पनेविरुद्ध लढणारा आणखी एक संघ ‘बौद्ध साहित्य’ या नावाने उतरायचा. त्याचे कॅप्टन भाऊसाहेब अडसूळ असायचे. विजय सोनावणे हा त्यांच्या संघातला चांगला दिलदार खेळाडू. केशव मेश्राम आणि वामन होवाळ हे मैदानात प्रत्यक्ष उतरत नसत, पण ते पानतावणे यांच्या संघाचे ‘मॅनेजर्स’ होते. राजा ढाले हे गरज पडेल तसे भाऊसाहेब अडसूळ किंवा गंगाधर पानतावणे यांच्या संघातून खेळायचे. अधूनमधून ते स्वत:चा संघ स्थापन करायचे. वादविवाद होते, मतभेद होते. पण कटुता नव्हती. द्वेष नव्हता. ती वैचारिक लढाई होती. चळवळीत जिवंतपणा वाटायचा. तर सांगण्याचा मुद्दा हा की ‘अस्मितादर्श’मध्ये मार्क्सवादी लेखक-समीक्षकांच्या कलाकृतींनाही सन्मानपूर्वक स्थान दिलं गेलं. प्र. श्री. नेरुरकर, डॉ. सदा कऱ्हाडे, नारायण सुर्वे, डॉ. वि. स. जोग, वामन इंगळे, शरच्चंद्र मुक्तिबोध ही नावं पहिली तरी याचा प्रत्यय येईल. दलित साहित्य चळवळीला ज्यांनी महत्त्वाचं योगदान दिलं त्या डॉ. भालचंद्र फडके यांच्या पंच्याहत्तरीनिमित्त ‘अस्मितादर्श’ने विशेषांक काढून त्यांच्या योगदानाचा आदर आणि गौरव केला आहे. थोडक्यात, वैचारिक मतभिन्नता असली तरी ‘अस्मितादर्श’ने एकारलेपणाचा मार्ग स्वीकारला नाही. ‘अस्मितादर्श’ म्हणजे डॉ. गंगाधर पानतावणे या समीकरणावर कुणी फुल्ली मारू शकत नाही.

‘अस्मितादर्श’ ही दलित नियतकालिकांच्या चळवळीतील ऐतिहासिक घटना आहे. किंबहुना इतक्या प्रदीर्घ काळापर्यंत टिकून राहिलेलं हे एकमेव नियतकालिक आहे. दलित साहित्य चळवळीचा एका अर्थाने आधारवड ठरलेल्या ‘अस्मितादर्श’ला आणि त्याचे संपादक डॉ. गंगाधर पानतावणे यांना, ज्या आमच्या पिढीने ‘अस्मितादर्श’चे बोट धरून साहित्यिक वाटचाल सुरू केली, त्या पिढीच्या वतीने विनम्र अभिवादन.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशातील समग्र शोषित दलितांसाठी जो सर्वंकष मानवमुक्तीचा लढा छेडला, नाकारल्या गेलेल्या समूहांना जे आत्मप्रत्ययाचे भान दिले, सामाजिक पुनर्रचना करण्यासाठी जे वैचारिक अधिष्ठान दिले, हे भान, हा लढा, हे वैचारिक अधिष्ठान अधिक गतिमान, कार्यान्वित करण्यासाठी महाराष्ट्रातील ज्या व्यक्तिमत्त्वांचा उल्लेख करावा लागेल त्यात डॉ. गंगाधर पानतावणे यांचे नाव अग्रभागी असेल. महाराष्ट्राच्या नव्हे, भारतीय समाजजीवनाच्या विविध क्षेत्रांमध्ये प्रामुख्याने साहित्यिक-वैचारिक-सांस्कृतिक क्षेत्रांत आंबेडकरी विचारांच्या पाऊलखुणा अधिक दमदार करण्याच्या संघर्षात ते गुंतलेले होते.

डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू होते. संपादक, प्राध्यापक, लेखक, विचारवंत, संघटक अशा अनेक भूमिकांत ते वावरत असले तरी त्यांचा मूळचा पिंड हा कार्यकर्त्याचा होता. ‘अस्मितादर्श’ची प्रुफे तपासणे, सभासदांचे पत्ते लिहिणे, अंक पोस्टात पोहोचविणे ही कामेही त्यांनी निष्ठेने केली. आंबेडकरी जाणिवेचे परिपक्व आकलन आणि ती समृद्ध करणाऱ्या, त्यांच्याजवळ असलेल्या, अव्यभिचारी निष्ठेने त्यांच्यातला ‘कार्यकर्ता’ सातत्याने जिवंत ठेवला. ‘अस्मितादर्श’ अथकपणे चालविणे, नुसते चालविणे नाही, तर सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक भान ठेवून त्याला सर्जनशील आणि समकालीन आशय







देणे आणि 'अस्मितादर्श'चे मेळावे भरवून वैचारिक सुसंवाद आणि घुसळण घडवून साचलेपणा दूर करणे ही त्यांच्या द्रष्टेपणाचीच परिणती होय. विशेष म्हणजे माणूस म्हणून त्यांच्याही व्यक्तिगत आयुष्यात अनेक चढ-उतार आले. विशेषत: त्यांच्या सहचारिणीचा मृत्यू हा त्यांच्यावर व्यक्तिगत मोठा आघात होता; पण डॉ. पानतावणे यांनी आपल्या व्यक्तिगत दु:खाचे कधी भांडवल केले नाही. त्यांनी अंगीकारलेल्या कार्यात खंड पडला नाही. दुसऱ्या बाजूला त्यांना अनेक पुरस्कार, सन्मान मिळाले, बहुमान मिळाले, गौरव झाले, पण त्यांच्या डोक्यात कधी हवा गेली नाही. त्यांच्यातील जिवंत 'कार्यकर्त्या'मुळेच त्यांचे पाय सतत जमिनीवर राहिले.

डॉ. गंगाधर पानतावणे यांच्या लेखनाचे दोन गुणविशेष म्हणजे निष्ठा आणि व्यासंग होय, हा प्रत्यय त्यांच्या सर्व ग्रंथांतून येतो. मग ते महारांच्या इतिहासावरचे लिखाण असो, संतसाहित्यावरचे लेखन असो वा मराठी समीक्षा आणि साहित्यावरचे असो. या दोन गुणांमुळेच त्यांच्या भाषेला स्वत:चा असा डौल आणि बाज लाभला. ती प्रवाही आणि आशयघन झाली. लेखनातील तार्किक सुसंगतीदेखील ही देखील ह्याच गुणांची परिणती होय.

आंबेडकरी चळवळीला वैचारिक नेतृत्व देणाऱ्यांमध्ये डॉ. गंगाधर पानतावणे यांचे नाव प्रामुख्याने आणि ठळकपणे घ्यावे लागेल. विशेष म्हणजे आंबेडकरी चळवळीच्या सर्वच पातळ्यांवर अनेक चढ-उतार आले, पण डॉ. पानतावणे ह्यांचे एकूणच लेखनाचे सूत्र म्हणजे आंबेडकरी विचारातील विजिगिषू वृत्ती सतत प्रज्ज्वलित ठेवणे हे होय. अनेक साहित्यिक-विचारवंतांच्या लेखनातून प्रगट होणारी पराभूत किंवा वैफल्यग्रस्त मानसिकता, वैचारिक प्रदूषण त्यांच्या लिखाणात आढळत नाही. उदाहरणार्थ, भंडारा येथे १९९१ मध्ये 'बौद्ध व सांस्कृतिक मेळाव्या'च्या अध्यक्षपदावरून बोलताना ते म्हणाले होते, ''विसाव्या शतकात बाबासाहेब यांचं झुंजार व झंझावाती नेतृत्व आलं आणि आम्ही मानसिक क्रांतीला सिद्ध झालो. आम्ही स्वत:ला चाचपडू लागलो, आत्मशोध घेऊ लागलो. एक आत्मविश्वास जागा झाला. आम्ही युद्धसन्मुख झालो. आम्हाला नव्या जीवनाची भाषा कळली. हक्कांचा अर्थ कळला. बाबासाहेब जन्माला आले नसते तर आम्हाला स्वाभिमानाचा निळा झेंडा कुणी दिला असता? बाबासाहेब जन्माला आले नसते तर ज्ञानाची मशाल कुणी पेटविली असती? कुणी आमच्या मनावरची लाचारीची, अगतिकतेची आणि गुलामगिरीची काजळी पुसून काढली असती? बाबासाहेब नसते तर कुणी आमच्या दिशा आणि वाटांना आकार दिला असता? बाबासाहेब जन्माला आले नसते तर प्रज्ञा करुणा आणि मैत्रीचा अन्वयार्थ कुणी सांगितला असता? बाबासाहेब म्हणजे एक धगधगता निखारा, बाबासाहेब म्हणजे एक अमर्याद शक्ती, बाबासाहेब आमचा श्वास, विश्वास आणि ध्यास. बाबासाहेब हे जिवंत वर्तमान होतं आणि आशावादी भविष्य होतं. बाबासाहेब आमच्या जीवनग्रंथाचे महान नायक होते. बाबासाहेब हे आमच्या जीवनसृष्टीचे रचनाकार होते.'' (अस्मितादर्श : ऑक्टोबर-नोव्हेंबर १९९१)

व्यासंग आणि निष्ठा यांच्या जोडीला असलेली त्यांची चिंतनात्मक प्रकृती एकूणच त्यांच्या लिखाणाला काव्यात्म पातळीवर पोहोचविणारी होती. हे फारच थोड्या विचारवंतांना शक्य झाले आहे. त्यांचे लिखाण कोसळणाऱ्या धबधब्याप्रमाणे नाही. नितळ, स्वच्छ व निरंतर गतिमान असलेल्या पाण्याच्या प्रवाहासारखं आहे ज्या पाण्यातून आपण तळ पाहू शकतो. डॉ. पानतावणे यांच्या लिखाणातून आंबेडकरी जाणिवेचा हा तळ सातत्याने जाणवतो.

ज्या काळात दलित साहित्य आकार घेत होते, चाचपडत होते, दिशा शोधत होते त्या काळात डॉ. पानतावणे यांनी केलेलं योगदान फार महत्त्वाचं आहे. 'अस्मितादर्श'ने यात फार मोठी कामगिरी केली आहे. 'अस्मितादर्श'चे दलितांच्या साहित्यिक, सांस्कृतिक चळवळीतील कर्तृत्व हे सर्वमान्य आहे, परंतु कधी कधी मला वाटते की, डॉ. पानतावणे यांना केवळ 'अस्मितादर्श'चे संपादक म्हणून गौरवणारी मंडळी आहेत. अर्थात, यात चूक काहीच नाही; पण याही पलीकडे डॉ. पानतावणे यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व हे अनोखे व अफाट आहे. वर उल्लेख केल्याप्रमाणे दलित साहित्याच्या सुरुवातीच्या काळात ज्या प्रमुख लेखक-विचारवंतांनी साहित्यिक, वाङ्मयीन चळवळीला जाणीवपूर्वक वाट दाखविली त्यात डॉ. पानतावणे यांचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल. विशेषत: त्यांच्या 'विद्रोहाचे पाणी पेटले आहे' आणि 'वादळाचे वंशज' या संशोधित ग्रंथांनी त्या काळात आंबेडकरी चळवळीत, दलित साहित्यात एक माहौल तयार केला होता. नवीन लेखकांना, कार्यकर्त्यांना 'स्व'त्व गवसल्याचा प्रत्यय आला होता. आपल्या चळवळीचे नायक आहेत, आपल्या चळवळीला इतिहास आहे, लढ्याची गौरवशाली परंपरा आहे, हे आत्मभान देण्याचे कार्य डॉ. पानतावणे यांनी केले आहे. खरे म्हणजे लेखकात, कार्यकर्त्यात ही 'स्व'त्वाची जाणीव जोपर्यंत निर्माण होत नाही तोपर्यंत आपणाला कुठल्या मार्गाने जायचे आहे याचा आत्मबोध होत तर नाहीच, पण आत्मविश्वासदेखील येत नाही. 'पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर' हा त्यांचा शोधनिबंध तर मराठी पत्रकारितेचा इतिहास बदलणारा

आहे. 'स्मृतिशेष'सारखा त्यांचा ग्रंथ त्यांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाचा चढता आलेखच होय.

एकूणच डॉ. गंगाधर पानतावणे यांची स्वत:ची ग्रंथसंपदा, त्यांनी संपादित केलेले ग्रंथ, त्या ग्रंथांच्या व इतर लेखकांच्या कलाकृतीला लिहिलेल्या प्रस्तावना, त्यांची व्याख्याने, 'अस्मितादर्श'ची संपादकीये यातून त्यांनी दलितांच्या साहित्यिक-सांस्कृतिक चळवळीला नवे आयाम दिलेले आहेत. याचे कारण त्यांनी बाबासाहेबांचे विचार आत्मसात केले होते. त्याचा अन्वयार्थ लावण्याची चिंतनशील प्रवृत्ती त्यांच्याजवळ होती. दलित साहित्य किंवा आंबेडकरी चळवळ म्हणजे केवळ अन्याय-अत्याचाराविरुद्धचा आविष्कार हे समीकरण मोडीत काढून आंबेडकरी विचारांचा वैचारिक परीघ रुंदावण्याचे कार्य त्यांच्या लेखणीने केले आहे. त्यांच्या वैचारिक लेखनातून त्यांनी मार्क्सवादाला विरोध केला. या त्यांच्या भूमिकेला काही जणांनी आकस किंवा एकारलेपण असे म्हटले; पण एकूण 'अस्मितादर्श'मधील मार्क्सवादी विचारवंतांची, लेखकांची यादी पाहिली तर हा समज खोटा ठरतो.

समग्र शोषणव्यवस्थेला उलथवून टाकण्याचे सामर्थ्य हे फक्त आंबेडकरवादातच आहे, या त्यांच्या ठायी असलेल्या आत्मविश्वासाला 'एकारलेपण' हे नाव देणे उचित नाही. डॉ. पानतावणे लिहितात, ''दलित साहित्याने व चळवळीने क्रांतीचे शस्त्र घेऊन जुनी जीर्ण समाजव्यवस्था, वर्गवाद, स्वर्ग-नरक, अंधश्रद्धा झुगारून देऊन नवा गतिमान, आधुनिक माणूस व समाज निर्मिण्यासाठी प्रतिबद्धता स्वीकारली आहे. धर्मदास्याच्या शृंखला तोडून सांस्कृतिक बधिरता झुगारून देऊन दलित साहित्याने आपला नवा, रसरशीत अनुभव आपल्या साहित्यातून मांडला. त्याने ईश्वरसिद्धीचे, परमार्थ-निरूपणाचे साहित्य अव्हेरले. मानवी जीवनातील सर्व प्रकारचे शोषण व गुलामगिरी नाकारली आणि जगण्याची, संघर्षाची आणि मनुष्यत्वाची नवी जाणीव आपल्या साहित्यातून पेरली. एक प्रकारे दलित साहित्य चळवळीने साहित्याकडे पाहण्याची, त्याचा आस्वाद घेण्याची नवी दृष्टी व नवी दिशा दिली आणि साहित्याभिरुचीचे नवे बियाणे रुजविले.'' (दलित साहित्य : चर्चा आणि चिंतन, पृ. ४६)

'एकारलेपणाचा' वैचारिक स्पर्श असलेला लेखक इतका प्रखर आणि तीव्र शब्द लिहू शकेल? डॉ. पानतावणे यांनी आपल्या वैयक्तिक जीवनातील आघात शांतपणे पचविले. तसेच सार्वजनिक जीवनातील प्रहार तितक्याच समर्थपणे व परिपक्वपणे पचविले.

कधी-कधी वाटते, डॉ. गंगाधर पानतावणेंसारखे लेखक-विचारवंत ज्यांचा व्यासंग गाढा होता, ज्यांनी विपुल ग्रंथसंपदा लिहिली, त्यांच्या एकूणच साहित्यिक कर्तृत्वाचा लेखाजोखा आपण 'चळवळी'च्या चौकटीतच तर करीत नाही ना? खरे तर डॉ. गंगाधर पानतावणे यांची 'अस्मितादर्श'ची कारकीर्द आणि विपुल लिखाण, विशेष म्हणजे शासनाच्या विविध समित्यांवर त्यांनी दिलेले बौद्धिक योगदान हे एकूणच मराठी साहित्यपरंपरेला समृद्ध करणारे आहे. एकूणच मराठी साहित्यातील साचलेपणा दूर करून ते गतिमान करण्याचे काम डॉ. गंगाधर पानतावणे यांनी केले आहे. त्याचे व्यापक स्वरूपात मूल्यमापन व्हायला हवे असे मला वाटते.

'बांधिलकी' ह्या शब्दाचा अर्थ जाणून घ्यायचा असेल तर डॉ. गंगाधर पानतावणे यांची जीवनशैली बघावी. त्यांची बांधिलकी केवळ शाब्दिक किंवा ग्रांथिक नव्हती, तर सक्रिय होती, व्यवहारात उतरणारी होती. त्यांच्या वाङ्मयीन किंवा सांस्कृतिक बांधिलकीबद्दल आपणास ज्ञात आहे, पण सामाजिक आणि राजकीय बांधिलकीसंबंधीदेखील त्यांची जाणीव स्पष्ट आणि सडेतोड आहे. 'मुखवट्याचे साहित्य', 'पान्हा चोरणारी समीक्षा' असे अनेक शब्दप्रयोग डॉ. पानतावणे यांनी रूढ केले आहेत. त्यांची बांधिलकी केवळ 'मुखवट्याची' नव्हती, 'पान्हा चोरणारी' नव्हती. म्हणूनच ते रिपब्लिकन पक्षाच्या गटातटात ऐक्य व्हावे यासाठी त्यांच्या पातळीवर प्रयत्नशील राहिले. दलित चळवळीतल्या अनेक साहित्यिक, विचारवंतांचा रिपब्लिकन पक्षातील गटातटातील नेत्यांकडे बघण्याचा जो 'तुच्छतावादी' दृष्टिकोन आहे, तो डॉ. पानतावणे यांच्याकडे नव्हता. बाबासाहेब आंबेडकरांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्ष उभा राहिला पाहिजे, याकरता त्यांची धडपड होती.

'मैत्रीला आणि माणुसकीला जागणारा माणूस' असेच त्यांचे वर्णन करावे लागते. बडेजाव नाही. प्रसिद्धीचा सोस-हव्यास नाही. आपल्याला काय मिळाले, मिळावे याची खंत नाही, खटाटोप नाही. मेळाव्यात-बैठकीत सामान्यांसारखे ते मिसळून जायचे. 'स्पेशल ट्रीटमेंट'चा त्यांचा अट्टहास नसे. महाराष्ट्रभर सभा-संमेलनासाठी-व्याख्यानांसाठी त्यांनी भरभरून प्रवास केला. कार्यक्रम छोटा आहे की मोठा आहे हे न पाहता चळवळीचा विषय आहे हे बघून निमंत्रण स्वीकारले. विशेषत: नव्या पिढीतील लेखक-कवींशी त्यांची जवळीक आणि वाङ्मयीन-सांस्कृतिक, सामाजिक चळवळींत जे प्रवाह आहेत, स्पंदने आहेत ती टिपणे ही त्यांच्या मानसिक सर्जनशीलतेची प्रक्रिया सतत सुरू होती. काही पटले नाही तर ते स्पष्टपणे बोलायचे. डॉ. गंगाधर पानतावणे यांची सगळीच मते सगळ्यांनाच पटतील असे नाही; पण दलितांच्या चळवळीला, आंबेडकरी चळवळीला, मग ती साहित्यिक-सांस्कृतिक, सामाजिक-धार्मिक असो, तिला नवे आयाम, नवा आशय देऊन भारतीय वैचारिक विश्वात आंबेडकरी चळवळीला प्रतिष्ठा मिळवून देण्यामध्ये डॉ. गंगाधर पानतावणे यांचा मोठा वाटा होता हे कोणाला नाकारणे शक्य होणार नाही.

**– अर्जुन डांगळे**
भ्रमणध्वनी : ९८२०५०३१५४

अरुण मळेकर

# दीपमाळ

मंदिरवास्तूंमधील दीपमाळ हे महाराष्ट्राचे खास वैशिष्ट्य असून या दीपमाळा हे प्राचीन वास्तुवैभव समजले जाते. १८ एप्रिल या जागतिक वारसादिनानिमित्ताने दीपमाळांच्या निर्मितीचा हा सौंदर्यपूर्ण इतिहास!

**भा**रतीय वास्तूशास्त्रातील सौंदर्यात कमानी, वारसावस्तू, स्तंभ, लेणीसमूह, प्रशासकीय इमारती यांची संख्या खूप मोठी असल्याने ते पर्यटक, अभ्यासकांचे प्रमख आकर्षणही आहे. पण देशभरातील मंदिर वास्तूंचे सौंदर्य आणि त्यांच्या निर्मितीवर त्या-त्या प्रांतांच्या संस्कृतीची मोहर उमटलेली आहे. वारसा वास्तूमधील उपरोक्त घटकांपेक्षा धार्मिक अधिष्ठानाच्या मंदिर शिल्पांची संख्या खूप मोठी आहे. त्यातील काही मंदिर वास्तूंना हजारो वर्षांचा इतिहास असून त्यांचा जागतिक पातळीवर बोलबाला झालाय. पण या अलौकिक, कलापूर्ण मंदिर वास्तूंचं दर्शन घेताना त्यांतील मूर्ती, बांधकाम, कलाकुसरीचे शिल्पकाम, प्रांगण यावरच आपले लक्ष केंद्रित होते. मंदिर वास्तू चित्ताकर्षक करून त्याच्या सौंदर्यासह, मांगल्यात भर टाकणाऱ्या मंदिराच्या दर्शनी भागात उभारलेल्या दीपमाळेकडे आपण हवे तसे लक्ष देत नाही. पण दीपमाळ हा सुद्धा मंदिर वास्तूचा एक अविभाज्य घटक असल्याने त्याला इतिहासाबरोबर सांस्कृतिक पार्श्वभूमीचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. आपल्या संस्कृतीत मंदिरदर्शन आणि दीप प्रज्ज्वलन हे सम ीकरण पूर्वापारचे आहे. मांगल्य-पावित्र्याबरोबर मानवी जीवनातील अंध:कार नाहीसा करण्याचे प्रतीक ही संकल्पना त्यापाठीमागे आहे.

याच कारणांनी दीप प्रज्ज्वलनाचे अलौकिक स्थान ओळखून त्यांना मंदिरासमोरील दीपमाळेच्या आधारे स्थान देण्याचा प्रयत्न प्राचीन काळापासून चालत आला आहे. याच उद्देशाने दिवा लावण्यासाठी उभारण्यात आलेल्या दीपमाळा मंदिर हा स्थापत्त्याचा अविभाज्य भाग होऊन बसला आहे.

मंदिर प्रांगणातील दीपमाळा जवळजवळ सर्वच प्राचीन मंदिरात आढळतात. दगडी बांधकामांनी तयार केलेल्यास सर्वच दीपमाळांचा आकार हा दंडगोलाकार असून, तळाकडील भाग रुंदीला विस्तृत तर वरती निमुळता होत गेलेला आढळतो. अशा स्वरूपाच्या बांधकामावर दिवे, पणत्या लावण्यासाठी खालपासून वरपर्यंत ठरावीक अंतरावर दगडी हस्त बसवलेले असतात.

मंदिर प्रांगणातील शांत, प्रसन्न वातावरणात दीपमाळा प्रवेशद्वारीच आपलं लक्ष वेधतात, पण त्यांचे अनोखे चित्ताकर्षक सौंदर्य नजरेत भरते ते रात्रीच्या समयी! जणू आमच्या जीवनातील अंध:कार नाहीसा करून मंगलमय वातावरणात भाविकांचे त्याद्वारे स्वागतच होत असते.



पुणे जिल्ह्यातील चास गावातील प्राचीन सोमेश्वर मंदिरा-समोरील प्रचंड मोठी दीपमाळ हे त्याचे उदाहरण आहे. पुरातन बाजाच्या या मंदिराइतकेच महत्त्वपूर्ण स्थान येथील दिपमाळेला

लाभले आहे. सुमारे अडीचशे दिवे लावण्याची व्यवस्था या दीपमाळेच्या बांधकामातून साधली आहे, यातूनच तिच्या व्याप्तीची कल्पना येते. दरवर्षी त्रिपुरा पौर्णिमेच्या रात्री ही दीपमाळ जेव्हा शेकडो दिव्यांनी उजळून निघते तेव्हा परिसरातील वातावरणात मंगलमय दिपोत्सवाचा जल्लोष साजरा होण्यासाठी निर्माण झालेल्या दीपमाळांची रचनाही तितकीच लोभस असते.

खरं तर दीपमाळ हा वास्तूप्रकार महाराष्ट्रातील मंदिर वास्तूमधील एक प्रचलित बांधकाम घटक. अनेक मंदिरांसमोरील काही दीपमाळा तर दहा फुटांपेक्षाही उंचीच्या आहेत. त्यांचा आकारही लंबगोलाकार व वरच्या भागी निमुळता होत जाणारा जरी असला तरी काही मंदिरातील दीपमाळा षट्कोनी व अष्टकोनी आहेत. त्या निर्माण करताना त्यांच्या रचनाकारांनी निश्चितच भूमितीशास्त्राचा आधार घेतल्याचे जाणवते. काही मंदिरातील दीपमाळा जमिनीच्या पृष्ठभागावर निर्माण झाल्या तशाच मंदिरद्वारी छोटेखानी चौथऱ्यावर त्यांचे बांधकाम करून उंचीचा उद्देश साधला आहे.

मंदिर दीपमाळ प्रकाराचे बांधकाम अस्तित्वात येण्याआधी प्रांगणात उंच जागी दिवे लावण्याची प्रथा अस्तित्वात होती. त्यासाठी मजबूत दगडी खांब उभारून त्यावर कापूर तसेच अन्य ज्वालाग्रही द्रव पदार्थाच्या साहाय्याने दीप प्रज्ज्वलित करून हेतू साध्य केला जात असे. अशा प्रकारचे दगडी खांब शिवालयासमोर उभारण्याचा प्रघात होता. आजही अशा प्रकारचे स्तंभ देशाच्या दक्षिण प्रदेशातील प्राचीन मंदिरातून आढळतात. या स्तंभांना 'दीपदंड' या नावाने संबोधले जाते.

दीपमाळेचे बांधकाम अस्तित्वात येण्याआधीपासून दक्षिण प्रदेशातील प्राचीन मंदिर वास्तूंमधून दीपलक्ष्मीचे अनेक प्रकार आजही पाहावयास मिळतात. त्यातील काही धातूंच्या तर काही कोरीव काम केलेल्या दगडाच्या आहेत. धातू आणि दगडांच्या समया तर सुमारे दहा फुटांपेक्षा अधिक उंचीच्या आहेत, तर काहींना वृक्षांच्या आकारात साकारण्यात आले आहे. हा दीपमाळेचा पूर्वप्रकार आहे असे जाणकारांचे मत आहे.



शिलाहार-यादव साम्राज्यकाळात निर्माण झालेल्या मंदिर वास्तूंमधून दीपमाळ हा प्रकार आढळत नाही. इ.स. तेराव्या शतकानंतर इस्लामी आक्रमणानंतर त्यांच्या



प्रार्थनास्थळांच्या 'मिनार' शिल्पाच्या प्रभावातून आपल्या मंदिरांत दीपस्तंभ, दीपवृक्ष आणि नंतर दीपमाळेचे स्वरूप प्राप्त झाले असावे असेही समजले जाते.

महाराष्ट्रातील बहुतेक मंदिरांसमोर दीपमाळेचे बांधकाम आढळणारच. विशेषत: शिवाच्या तसेच देवीच्या मंदिरांसमोर दीपमाळा आढळतात. पुणे जिल्ह्यातील पहाडावरील खंडोबाच्या मंदिराकडे दगडी पायऱ्यांवरून मार्गस्थ होताना मार्गातील दोन्ही बाजूस सुमारे साडेतीनशे दगडी दीपमाळा भाविकांचे स्वागत करताहेत. महाराष्ट्रात पेशव्यांचा अंमल सुरू होण्याआधी दगडी दीपमाळांबरोबर विटांच्याही दीपमाळा बांधल्या गेल्या. विशेष म्हणजे त्यांची रचनाही मिनारसदृशच आहे. त्या आतून पोकळ असून वर जाण्यासाठी नागमोडी प्रकारचा जिना असतो. या प्रकारच्या दीपमाळांचे बांधकाम अत्यल्प आहे. अशा प्रकारच्या दोन दीपमाळा मराठवाड्यातील बीड येथील प्राचीन खंडोबाच्या मंदिरासमोर पहावयास मिळतात.

मंदिरवास्तूचे दर्शन घेताना ह्यातील मूर्ती, बांधकाम, कलाकुसरीचे शिल्पकाम, प्रांगण यावरच आपले लक्ष केंद्रित होते. मंदिरांची वास्तू चित्ताकर्षक करून त्याच्या सौंदर्यासह मांगल्यात भर टाकणाऱ्या मंदिराच्या दर्शनी भागी उभारलेल्या दीपमाळेकडे आपण हवे तसे लक्ष देत नाही, पण दीपमाळ हा सुद्धा मंदिरवास्तूचा एक अविभाज्य घटक असल्याने त्याला इतिहासाबरोबर सांस्कृतिक पार्श्वभूमीचे अनन्यसाधारण मोल आहे!

**– अरुण मळेकर**
दूरध्वनी : ०२२-२५४३३१४७
भ्रमणध्वनी : ९८६९११८५०१
arun.malekar10@gmail.com

धनंजय गांगल

# कालातीत: 'डेथ ऑफ अ सेल्समन'

**'डेथ ऑफ अ सेल्समन' या नाटकातला संघर्ष कालातीत आहे. तो जगभरच्या नाट्यकर्मींना गेली सात दशकं खुणावतो आहे. आजही अनेक भाषांत या नाटकाचे प्रयोग होतात.**

**आ**र्थर मिलर (१९१५-२००५) हा विसाव्या शतकातील एक महत्त्वाचा नाटककार. तो ओळखला जातो ते 'ऑल माय सन्स', 'द क्रुसिबल्स', 'अ व्हवू फ्रॉम द ब्रिज' या नाटकांसाठी आणि 'द मिसफिट' या चित्रपटासाठी. शिवाय त्याच्याबद्दल कुतूहल आहे ते मेरिलिन मन्रो सोबतच्या लग्नासाठी, पण त्याहूनही त्याची कालातीत ओळख आहे ती 'डेथ ऑफ अ सेल्समन' या नाटकासाठी. विसाव्या शतकातील उत्कृष्ट तीन अमेरिकन नाटकांमध्ये टेनिसी विल्यम्स याचे 'अ स्ट्रीटकार नेम्ड डिझायर', युजीन-ओ-नील याचे 'लॉन्ग डेज जर्नी इंटू नाईट' बरोबरच आर्थर मिलरच्या 'डेथ ऑफ अ सेल्समन' या नाटकालाही मान आहे.

'डेथ ऑफ अ सेल्समन' हे आर्थर मिलर यांचं सर्वात गाजलेलं नाटक. स्थळ ब्रुकलीन, न्यूयॉर्क! काळ पन्नासच्या दशकातला. विली लोमान हा एक सामान्य सेल्समन. वय साठी पार. तो आर्थिक दृष्ट्या अडचणीत आहे. महिन्याचा खर्च भागवणेही हातातोंडाशी गाठ आहे. वाढत्या वयामुळे फिरतीची दगदग झेपत नाहीय. व्यवसायातील बदलणारे तंत्रज्ञान अंगवळणी पडत नाहीय. आणि गाठ आता आडमुठ्या तरुण बॉसशी आहे. घरी येऊनही त्याला सुख नाही. एकेकाळी मोकळं टुमदार घर आता सर्व बाजूने उंच उंच इमारतींनी वेढलंय. इथेही त्याला कोंदटल्यासारखे होते. झपाट्याने चहुबाजूने बदलत्या बाहेरच्या जगाशी जुळवून घेण्यात विली, सगळ्याच आघाड्यांवर कमी पडतोय. त्या ताणातून बाहेर पाडण्यासाठी तो वारंवार कधी भविष्यातील स्वप्नांच्या दुनियेत जातो तर कधी जुन्या स्मृतींत रमतो. दाहक वर्तमान आणि ते विसरण्यासाठी, रम्य भविष्य आणि परत न येणारं स्मृतिरंजन! संपूर्ण नाटकभर विलीचे मन या वर्तुळात फिरत राहतं. हे नाटक म्हणजे विलीच्या आयुष्यातील शेवटच्या चोवीस तासांचे चित्रण आहे. एकीकडे सुबोध स्वप्नांचं मनोराज्य, दुसरीकडे न पेलणारं अपेक्षांचं ओझं, अन् तिसरीकडे सरणारं वय. यातला ताण असह्य होऊन अपघाती आत्महत्येत त्याचा शेवट होतो.

लिंडा ही त्याची पत्नी, एक सर्वसाधारण गृहिणी, जी सतत त्याला साथ देते. बिफ आणि हॅपी ही त्याची मुलं, पंचवीस तिशीतील पण आर्थिक दृष्ट्या त्यांचं बस्तान काही बसलेलं नाही. त्यामुळेही त्याला नोकरीतून सुटका नाही. फ्रँक वॉनेर हा एकेकाळचा त्याचा बॉस जाऊन त्याच्या जागी त्याचा तरुण मुलगा हॉवर्ड वॉनेर त्याचा बॉस झाला आहे. खरं तर 'हॉवर्ड'चं हॉवर्ड हे नाव 'बॉस फ्रँक'ने विलीच्या सांगण्यावरूनच ठेवलेलं असतं, अशी विली आणि फ्रँक यांची जवळीक, पण हॉवर्डला त्याचे सोयरसुतक नाही. केवळ वडिलांचा मित्र म्हणून त्याने विलीला अजूनही कंपनीत ठेवले आहे. बाकी विलीची अजिबात गरज नाही असं त्याचे वागणे बोलणे. त्यामुळे लिंडाला कितीही वाटतं की आपल्या नवऱ्याने विलीने हॉवर्डशी बोलून या सततच्या फिरतीच्या नोकरीऐवजी इथेच न्यूयॉर्कमधे बदली घ्यावी. पण विलीला माहीत आहे हे सहज शक्य नाही. उलट हीच संधी समजून हॉवर्ड आपल्याला नोकरीतून काढून टाकायचा. दुसरीकडे आपल्याला जे जमलं नाही, ती स्वप्नं आपली मुलं विशेषतः, मोठा बिफ पूर्ण करेल असं त्याला मनापासून वाटतं, पण ते अजिबात दृष्टिपथात नाही. तरीही त्याची आशा जिवंत आहे. बिफबरोबरच्या त्याच्या नात्याला अजून एक किनार आहे. फिरतीच्या नोकरीत विलीचं एका स्त्रीसोबत एक अफेयर होतं. ते फक्त बिफलाच माहिती असते आणि तेही योगायोगाने कळलेले असते. विलीला त्याबाबत सतत अपराधी वाटत असतं.

ताणातून सुटका करण्यासाठी तो अनेकवेळा ज्या स्वप्नांच्या दुनियेत जातो, त्यातील एक स्वप्न आहे 'डेव्ह सिंगलमॅन'सारखे बनण्याचे. डेव्ह सिंगलमॅन हा वयाची ऐंशी ओलांडलेला विक्रेता-सेल्समन. तो आपल्या हॉटेलच्या खोलीत बसून केवळ फोन वरून प्रचंड विक्री करतो अशी आख्यायिका. डेव्ह सिंगलमॅनच्या मृत्ययात्रेलाही ('डेथ ऑफ अ सेल्समन') हजारोंच्या संख्येत लोकांची उपस्थिती होती, एवढी त्याची लोकप्रियता! विली, डेव्ह सिंगलमॅनच्या जागी स्वतःला बघतो, त्यात रमतो.

चार्ली हा विलीचा अगदी जवळचा मित्र. विलीला सतत हुलकावणी देणारं यश चार्लीला मिळालं आहे. चार्ली सतत विलीला मदत करण्याचा प्रयत्नं करतो पण विलीचा अहं आड येतो. विली चार्लीला सतत भासवतो की सगळं आता सुरळीत होणार आहे आणि त्याच्या मदतीची गरज नाही.

शेवटची त्याची अपघाती आत्महत्या ही याच आशेवर की त्यातून मिळणाऱ्या विम्याच्या पैशातून बीफ स्वतःचा व्यवसाय सुरू


डेथ ऑफ अ सेल्समन


सेल्समन रामलाल

करेल. 'डेव्ह सिंगलमॅन'सारखे आपल्याही मृत्ययात्रेला हजारोंच्या संख्येत लोक उपस्थित राहतील.

'नटसम्राट' नाटकातील संघर्ष हा आयुष्यात यशाच्या उच्च शिखरावर पोचलेल्या एका कलाकाराचा स्वतःशी संघर्ष आहे. आयुष्याच्या संध्याकाळी बदलत्या बाहेरच्या जगाशी जुळवून घेण्यात असमर्थ ठरतोय, आपण नकोसे झालो आहोत ही भावना बालवतेय. आणि त्या ताणातून मुक्त होण्यासाठी अप्पासाहेब पुन्हा स्मृतिरंजनात रमतात. वारंवार नाटकाच्या आभासी जगात जातात. याउलट 'डेथ ऑफ अ सेल्समन' ही आयुष्यात अयशस्वी असलेल्या सामान्य माणसाची कथा आहे. तोही अप्पासाहेबांप्रमाणे वारंवार स्मृतिरंजनात जगतो आणि स्वप्नांच्या आभासी जगाचा आश्रय घेतो.

हे नाटक ब्रॉडवेवर फेब्रुवारी ४९ साली आले आणि पुढे त्याचे जवळजवळ साडेसातशे प्रयोग झाले. पुढेही अनेक वेळेला ते नाटक परत-परत वेगवेगळ्या संचात आणि दिग्दर्शनात ब्रॉडवेवर सादर झाले. 'डेथ ऑफ अ सेल्समन' या नाटकातला संघर्ष कालातीत आहे. तो जगभरच्या नाट्यकर्मींना गेली सात दशकं खुणावतो आहे. आजही अनेक भाषांत या नाटकाचे प्रयोग होतात. पण कालानुरूप एक बदल मात्र अवश्य होतो. मूळ नाटकातील बदलत्या जगाचे संकेत संदिग्ध आहेत; आज मात्र लॅपटॉप आणि ई-कॉमर्स हमखास दाखवतात. या आधुनिक तंत्रज्ञानाने सेल्समन विली लोमानच्या अस्तित्वालाच आव्हान मिळतं आणि त्याची हतबलता अजूनच गडद होते!

हिंदीत हे नाटक इम्तेयाज हुसेन याने 'सेल्समन रामलाल' नावाने अनुवादित केले. फिरोझ अब्बास खानने दिग्दर्शित केले. रामलालची मुख्य भूमिका साकारली, बॉलिवुडचा प्रसिद्ध दिग्दर्शक आणि विनोदी नट म्हणून ओळख असलेल्या सतीश कौशिक याने! लिंडाचे काम 'सीमा बिस्वास'ने केले तर बिफ या मोठ्या मुलाच्या भूमिकेत किशोर कदमने रंग भरले. सतीश कौशिक त्याच्या शरीरयष्टीशी पूर्ण व्यस्त अशा प्रचंड ऊर्जेने रामलाल साकारायचा. हा प्रयोग अत्यंत देखणा व्हायचा.

या नाटकाला आर्थर मिलरच्या बालपणीचा संदर्भ आहे. १९२९ च्या जागतिक आणि विशेषतः अमेरिकेत आलेल्या प्रचंड मंदीत आर्थरच्या वडिलांचा चांगला चालणारा व्यवसाय डबघाईला आला आणि त्याच्या कुटुंबाला खडतर आयुष्याला सामोरं जावं लागलं. पुढे साठ वर्षाच्या त्याच्या कारकिर्दीत त्याने जवळपास पंचवीस नाटकं, 'फोकस' नावाची एक कादंबरी (१९४५), 'आय डोन्ट नीड यू एनिमोअर' हा कथासंग्रह (१९६७) आणि आत्मचरित्रात्मक कादंबरी 'टाईमबेंड : अ लाईफ' (१९८७), असं विपुल लेखन केलं. 'आर्थर मिलर'ची विचारसरणी डावीकडे झुकणारी होती. त्याचे पहिलेच नाटक 'नो व्हिलन', नंतरचे 'होनर्स एट डाऊन', 'द ग्रेट डिसओबिडीएन्स' आणि 'द गोल्डन इयर्स ही सगळीच भांडवलशाही, संप, मार्क्सचे तत्त्वज्ञान आणि त्याचे व्यक्तीवर होणारे परिणाम या संकल्पनेभोवती फिरतात. पुढेही अमेरिका रशिया शीतयुद्धात कम्युनिस्ट असल्यावरून अमेरिकेत मिलरला मॅकार्थीच्या चौकशीसमितीला सामोरे जावे लागले. त्याचे सर्वत्र पडसाद उमटले. हॉलीवुडने त्याच्याशी संबंध तोडले. त्याने आपल्या इतर कम्युनिस्ट सहकाऱ्यांची नावे सांगितली म्हणून त्याला टिकेला सामोरे जावे लागले. या सगळ्या अनुभवावर त्याने पुढे 'द क्रूसीबल' हे १६९० च्या सालेम विच ट्रायल या घटनेवर आधारित पण प्रत्यक्षात या चौकशीशी संबंध असणारे नाटक लिहिले. त्याची नाटकं सर्वसाधारणतः व्यक्ती, त्याचे स्वातंत्र्य, स्वप्ने, सभोवतालची सामाजिक कौटुंबिक परिस्थिती आणि इतरांना त्याच्याकडून असलेल्या अपेक्षा यांच्या संघर्षाभोवती फिरतात. इब्सेन आणि ब्रेख्तच्या शैलीशी मिळती-जुळती त्याची शैली होती.

मर्लिन मन्रो बरोबर त्याचे लग्नं १९५६ च्या सुमारास झाले. आणि १९६१ साली ते वेगळे झाले. लग्नाची पाच वर्ष मन्रो त्याच्याबरोबर जवळपास गृहिणीसारखे आयुष्य जगली जिची तिला खूप इच्छा होती. तिने त्याच्या कुटुंबीयांशीही जुळवून घेतले. योगायोग म्हणजे ते वेगळे झाले तेव्हा आर्थरने लिहिलेल्या आणि मन्रो काम करत असलेल्या 'द मिसफिट्स' या चित्रपट पूर्ण होऊन त्याचा शुभारंभ व्हायचा होता. या त्यांच्या सहजीवनावर बेतलेले नाटक 'आफ्टर द फॉल' त्याने १९६४ साली रंगमंचावर आणले. त्यातल्या मन्रोच्या चित्रणावरही पुढे टीकेचे बरेच वादळ उठले.

२००५ साली वयाच्या ८९व्या वर्षी त्याच्या अशा 'इव्हेंटफुल' जीवनाचा अंत झाला.

**- धनंजय गांगल**
भ्रमणध्वनी : ९८२१०३२८३०
dhananjay.gangal@gmail.com

## माया परांजपे लिखित 'सौंदययात्री'

''जीवनात यश प्राप्त करण्यासाठी अन्य अनुकूलतांपेक्षाही नात्यांची जपणूक करणे आणि हितचिंतकांचे वर्तुळ अधिकाधिक विस्तारत नेणे हीच गुरुकिल्ली आहे,'' असे मत आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या सौंदर्यतज्ज्ञ माया परांजपे यांनी व्यक्त केले.

परांजपे यांच्या 'ब्युटीक' या आयुर्वेदिक सौंदर्यप्रसाधनांच्या उत्पादक संस्थेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त त्यांनी लिहिलेल्या व 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेल्या 'सौंदर्ययात्री' या आत्मचरित्राचे प्रकाशन गिरिजा गिरीश बापट यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्राजक्ता परांजपे यांनी घेतलेल्या प्रकट मुलाखतीत माया परांजपे यांचा 'मध्यमवर्गीय कुटुंबातील मुलगी ते आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या उद्योजिका' हा प्रेरणादायी प्रवास उलगडला.




**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**

या कार्यक्रमाला गिरिजा बापट, 'ग्रंथाली'चे सुदेश हिंगलासपूरकर, कुमार नवाथे, चंद्रकांत तुळपुळे यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

''जीवनाच्या कौटुंबिक, सामाजिक, व्यावसायिक अशा कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी आपल्याबरोबर असलेल्यांना समजून घेणे, त्यांना सन्मान देणे आवश्यक आहे. केवळ स्वत:कडे मोठेपणा घेणे योग्य नाही,'' असा सल्ला माया परांजपे यांनी यावेळी दिला. यावेळी ज्येष्ठ अभिनेत्री वंदना गुप्ते, नृत्यगुरू सुचेता भिडे-चाफेकर, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. मीनल चिपळूणकर, व्यवस्थातज्ज्ञ डॉ. वैजयंती पंडित, भारताच्या 'ग्लोबल वेलनेस' सदिच्छादूत रेखा चौधरी, शिक्षणतज्ज्ञ डॉ. अरुंधती सरदेसाई, नेत्रतज्ज्ञ श्रुतिका कांकरिया, शिल्पकार रुपाली मदन यांना 'ब्युटीक कर्तृत्वशालिनी' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

यावेळी हिंगलासपूरकर, नवाथे यांच्यासह पुरस्कारार्थींनी मनोगत व्यक्त केले. विनया देसाई यांनी सूत्रसंचालन केले. प्राजक्ता परांजपे यांनी आभार मानले. मुख्य कार्यक्रमानंतर 'कलावर्धिनी ट्रस्ट'च्या विद्यार्थिनींनी अनेक नृत्याविष्कार सादर केले.

**– प्रतिनिधी**


---

## सरोज बावडेकर लिखित 'बिमल रॉय यांची मधुमती'

'प्रभात चित्र मंडळ' आणि 'ग्रंथाली' प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'बिमल रॉय यांची मधुमती - पडद्यामागील घटनांची अप्रकाशित कहाणी' या पुस्तकाचे प्रकाशन सुधीर नांदगावकर व चित्रपट दिग्दर्शक अमित राय यांच्या हस्ते 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान'च्या रंगस्वर येथे नुकतेच झाले.

'Bimal Roy's Madhumati Untold Stories from behind the scene' या रिंकी भट्टाचार्य लिखित इंग्रजी पुस्तकाचा अनुवाद डॉ. सरोज बावडेकर यांनी केला आहे.

या पुस्तक प्रकाशनाच्या प्रसंगी 'प्रभात चित्र मंडळा'चे सचिव संतोष पाठारे, 'ग्रंथाली'च्या धनश्री धारप व चित्रपट क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. नांदगावकर यांनी 'मधुमती' चित्रपटाच्या निर्मिती मागील घटनांचा उत्कंठावर्धक मागोवा घेऊन त्याचे डॉक्युमेंटेशन केल्याबद्दल रिंकी रॉय-भट्टाचार्य यांचे आभार मानले. रिंकी रॉय-भट्टाचार्य यांनी 'मधुमती'ची निर्मिती होत असतानाच्या आठवणींना उजाळा दिला.




**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**

प्रकाशनाच्या कार्यक्रमानंतर 'मधुमती'चे प्रदर्शन झाले. रसिकांनी या चित्रपटाचा 'आस्वाद' घेतला.

**– प्रतिनिधी**

## पुस्तकप्रकाशन

# डॉ. उत्कर्षा बिर्जे यांच्या स्तंभलेखनसंग्रहाचे प्रकाशन
# 'इवल्या इवल्या गोष्टी'तून माणूसपणाची दिशा शोधण्याचा सूर : राजन खान


राजन खान


आदिती सारंगधर


ज्योती आंबेकर


मिथुन पारकर


प्रसाद फणसे


सुहास कामत


श्रीनिवास नार्वेकर

स्तंभलेखन हा गंभीरपणे लिहिला जाणारा प्रकार असून शब्द-कालमर्यादा सांभाळतानाच तेवढ्याच टवटवीतपणे सातत्याने शैली आणि दर्जा सांभाळून लिहीणे, हे सोपं काम नाही. भाषा आणि निरीक्षणांच्या बाबतीत उत्कर्षाचं लेखन फार थक्क करणारं आहे. माणसां-माणसांतले बारकावे शोधत मानवीपणा आणि चांगलं माणूस होण्यासाठी दिशा शोधण्याचा सूर तिच्या लेखनातून जाणवतो, असे उद्गार ज्येष्ठ साहित्यिक राजन खान यांनी काढले.

'व्हिजन'च्या सहसंचालिका, लेखिका-निवेदिका-रंगकर्मी डॉ. उत्कर्षा बिर्जे यांचे गेल्या वर्षी मार्च महिन्यात निधन झाले. त्यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात राजन खान बोलत होते. डॉ. उत्कर्षा यांनी दैनिक लोकसत्ता व दैनिक हेराल्ड या वृत्तपत्रांमधून लिहिलेल्या 'इवल्या इवल्या गोष्टी' या स्तंभलेखनाच्या संग्रहाचे प्रकाशन अभिनेत्री चिन्मयी सुमित यांच्या हस्ते करण्यात आले. हा संग्रह ग्रंथालीने प्रकाशित केला आहे. यावेळी ज्येष्ठ लेखिका उषा मेहता, सांस्कृतिक विश्लेषक धनंजय गांगल, ज्येष्ठ लेखक-संपादक अरुण शेवते, लोकसत्ता-चतुराच्या तत्कालीन संपादिका व लेखिका शुभदा पटवर्धन, 'पु. ल. देशपांडे कला अकादमी'च्या वित्तीय सल्लागार व लेखिका अंजली आंबेकर उपस्थित होते.

''जगण्याचं काही सापडायचं असेल, तर खूप वाचायला हवं. पण ते वाचनही निवडक आणि नेमकं असायला हवं. नेमकं जगावं कसं आणि जग कसं पाहावं, हे कळण्यासाठी आजच्या तरुणाईनं 'इवल्या इवल्या गोष्टी' नक्कीच वाचायला हवं,'' असेही राजन खान म्हणाले. चिन्मयी सुमित म्हणाल्या की, 'उत्कर्षाचा एकेक लेख वाचताना ती कुठेकुठे घेऊन जाते आपल्याला, कुठले कुठले गंध जागवते, कुठले कुठले स्वर ऐकवते. ते सगळं काही सातत्याने आपल्या मनात रुंजी घालत राहतं आणि आपण खूप वेगळे बनत जातो.'

शुभदा पटवर्धन यांनी 'वळणवाटा'च्या निमित्ताने उत्कर्षाच्या आठवणी उलगडल्या. उषा मेहता, अंजली आंबेकर, अरुण शेवते, उत्कर्षाच्या मावशी व लेखिका राजश्री पोतदार यांनीही उत्कर्षाच्या आठवणी जागवत 'इवल्या इवल्या गोष्टीं'बद्दल मनोगत व्यक्त केले. यानंतरच्या सत्रामध्ये प्रसिध्द अभिनेत्री अदिती सारंगधर, निवेदिका ज्योती आंबेकर, निवेदक प्रसाद फणसे, रंगकर्मी सुहास कामत, मिथुन पारकर, श्रीनिवास नार्वेकर यांनी डॉ. उत्कर्षा यांच्या निवडक स्तंभलेखांचे अभिवाचन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अस्मिता पांडे यांनी केले.

'व्हिजन'चे संचालक श्रीनिवास नार्वेकर यांनी प्रास्ताविक तर शुभा गोडबोले, राजश्री पोतदार, अस्मिता बोरकर यांनी स्वागत केले. पु. ल. कला अकादमीच्या महिला सफाई कर्मचाऱ्यांचा यावेळी साडी देऊन गौरव करण्यात आला. माहिती व जनसंपर्क संचालक अजय अंबेकर, अभिनेते संजय मोने, कवी किरण येले यांच्यासह अनेक रंगकर्मी व मान्यवर रसिक उपस्थित होते.

**१५ एप्रिलला 'चला, वाचू या'चे २८ वे पुष्प**

व्हिजनच्या 'चला, वाचू या' या मासिक अभिवाचन उपक्रमाचा एप्रिल महिन्यातला कार्यक्रम रविवार, १५ एप्रिल रोजी, सायंकाळी ५ वाजता पु. ल. कला अकादमी येथे होणार असल्याचे आयोजकांतर्फे कळवण्यात आले आहे. रसिकांसाठी हा कार्यक्रम नि:शुल्क आहे.



**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**

# नरेंद्र प्रभू लिखित 'हे प्रवासी गीत माझे... आत्माराम परब यांचा रंजक प्रवास



रेणूताई गावस्कर



नरेंद्र प्रभू

'ग्रंथाली' प्रकाशनाचं नरेंद्र प्रभू लिखित 'हे प्रवासी गीत माझे.... आत्माराम परब यांचा रंजक प्रवास' या पुस्तकाचं प्रकाशन 'दादर माटुंगा सांस्कृतिक केंद्र' येथे थाटात झालं. दीप प्रज्ज्वलनानंतर ईशा टुर्सचे रघुवीर वैद्य यांनी खुमासदार निवेदनासह पाहुण्यांचं स्वागत केलं. ज्येष्ठ लेखिका आणि समाजसेविका रेणूताई गावस्कर, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे न्युरो-स्पायनल तज्ज्ञ, शल्य विशारद आणि लेखक डॉ. प्रेमानंद रामाणी, जगप्रसिद्ध सुलेखनकार आणि सदर पुस्तकाचं मुखपृष्ठ ज्यानी आपल्या सुलेखनाने खुलवलं असे अच्युत पालव, आमदार आणि उद्योजक क्रिस्टल ग्रुपचे प्रसाद लाड, सेंट अँजेलो व्हीएनसिटी व्हेंचरचे चेअरमन एँग्रेलो राजेश अथायडे, बीसीसीआयचे माजी अध्यक्ष रवी सावंत, 'ग्रंथाली'चे सुदेश हिंगलासपूरकर आणि ईशा टुर्सचे संस्थापक संचालक आत्माराम परब यांच्या प्रमुख उपस्थितीत हा प्रकाशन सोहळा संपन्न झाला. 'ग्रंथाली'चे विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी या वेळी आपलं मनोगत व्यक्त केलं आणि 'ग्रंथाली'च्या कामाचा परिचय उपस्थितांना करून दिला.

ज्येष्ठ लेखिका रेणूताई गावस्कर यांनी या पुस्तकाची प्रस्तावना लिहिली असून सदर पुस्तकाविषयी बोलताना त्या म्हणाल्या, ''पुढे काय? पुढे काय? पुढे काय? अशी तीव्र उत्कंठा वाचकाच्या मनात निर्माण करून त्याला पानांमागून पानांचा फडशा पाडायला प्रवृत्त करणारं हे पुस्तक आहे! पुस्तकाचं हस्तलिखित मला मिळालं आणि वाचताना मी अक्षरश: तल्लीन झाले. हे पुस्तक वाचताना वाचक रममाण होतील अशी माझी खात्री आहे.''

या पुस्तकानं कोकणापासून सुरूवात करून देशविदेशाला आत्माराम परब यांनी घातलेली गवसणी टिपली आहे. त्यातल्या अद्भुतरम्यतेसह जीवनस्पर्शी बारकाव्यांनाही अवकाश दिला आहे. आत्माराम परब नावाचा एक अवलिया प्रवासी झपाटल्यासारखा प्रवासाला निघतो काय, जगातील अनेक देशातील चित्तथरारक अनुभवांनी संपन्न होतो काय वा या अनुभवांची श्रीमंती अगणित लोकांपर्यंत पोचावी अशी मनीषा बाळगतो काय! आणि त्याच्या या लोकविलक्षण भटकंतीत अनेक वेळा सहभागी झालेले नरेंद्र प्रभू ते सारं संचित वाचकांपर्यंत जादुई शब्दांत पोचवतात काय? सगळंच विलक्षण आणि भन्नाट!

आत्माराम परब मूळचे कोकणी माणूस. हिरवीगार झाडं आणि लाल मातीशी त्यांचं जन्माचं नातं, पण हे नातं केवळ या निसर्ग वैशिष्ट्यांपुरतं सीमित रहात नाही. कोकणी माणसाची न विचारता सल्ला देण्याची सवय आणि तिरकस स्वभाव याचं फार सुंदर वर्णन पुस्तकाच्या आरंभी वाचकाच्या भेटीला येतं. नव्हे, त्यांचं एक छोटं आख्यानच प्रभूंनी वाचकाच्या भेटीला सादर केलं आहे.


आत्माराम परब यांनी भटकंतीच्या नादापायी मुंबई कस्टमची उत्तम नोकरी सोडून स्वत:च्या ईशा टुर्स या कंपनीची स्थापना केली. ईशा टुर्सची पहिली कुलू मनाली सहल जाहीर झाली. त्याचवेळी त्यांना जीवनाचं एक चिरस्थायी सत्य उमगलं, ते म्हणजे व्यवसाय आणि छंद यात महदंतर असतं. या सत्याचा आविष्कार नंतरच्या व्यवसायाच्या भटकंतीत त्यांना पावलोपावली उपयोगी पडला. या पहिल्याच सहलीत पर्यटक गोळा करण्यापासून ते पुढे ती सहल पूर्णत्वाला नेईपर्यंत ज्या काही अडचणींचा डोंगर त्यांना पार करावा लागला त्याचं वर्णन वाचता-वाचता हसू फुटतं आणि हसता-हसता डोळ्यांच्या कडा कधी पाणावतात हे समजतही नाही.

पर्यटक म्हणून आत्माराम परब अनेकदा लडाखला गेले. लडाखच्या निसर्गाशी त्यांचं अंतरीचं नातं जुळलं. लडाख म्हणजे त्यांच्यासाठी स्वर्गच. ते स्वर्गसुख त्यांनी हजारो पर्यटकांमध्ये भरभरून वाटलं, पण २०१० साली ६ ऑगस्टच्या रात्री लडाखवर ढगफुटीने प्रहार केला. या संकटसमयी आत्माराम तिथं पोचले. तिथल्या पद्मा ताशी या त्याच्या जिवाभावाच्या लडाखी मित्रासमवेत आत्मारामने तिथे लडाखींना जमेल ती मदत केली. त्या वेळचा तो प्रसंग, मृत्यूचं तांडव आणि निसर्गाचं उग्र रुप हे सारं वाचकांनी मुळातूनच वाचायला हवं.

आत्माराम यांनी पर्यटकांना सौंदर्यसंपन्न देशांची सफर करवली तसंच ग्रामीण भारताचं दर्शन घडवलं. भव्यता आणि नम्रता हातात हात घालून कशा नांदतात ते दाखवलं. 'ईशा टुर्स'चा 'हटके' दृष्टिकोन यातच स्पष्ट होतो. या प्रवासात त्यांना स्मिता रेगे, पद्मा ताशी यांच्यासारखे हे तितकेच ताकदीचे सहकारी लाभले. यांच्या शिवायही जिवाभावाने प्रेम करणारे, त्यांना या प्रवासात कळकळीनं साथ देणारे अनेक सहकारी भेटले म्हणून तर ही यात्रा सुफल संपन्न झाली. नरेंद्र प्रभूंची ओघवती भाषा, वर्णनात्मक

शैली आणि विषयाशी एकरूप होण्याची ताकद यांमुळे हे पुस्तक अत्यंत वाचनीय झाले आहे. या पुस्तकातील व्यक्तिचित्रं आणि आत्माराम यांची त्या व्यक्तींशी असलेली अपार मैत्री पाहिली की 'भारत माझा देश आहे सारे, भारतीय माझे बांधव आहेत' असा जात-पात, धर्म, पंथ याच्या पलीकडे जाणारा दृष्टिकोन आपसुकच वाचकाच्या मनात निर्माण होते.

पुस्तकाचे लेखक नरेंद्र प्रभू आपल्या मनोगतात म्हणाले, आपल्या कोषातून बाहेर पडण्यासाठी लडाखसारख्या ठिकाणी आत्माराम परब यांच्यासारख्या व्यक्तीसोबत गेलं पाहिजे. पर्यटकांच्या सहलीत रंग भरण्यासाठी हा माणूस काय काय कसरती करतो, ते या पुस्तकात लिहिलं आहे. आत्माराम परब यांचा जीवनप्रवास हा एखाद्या सुरेल गाण्यासारखा आहे. तो आपल्याला या पुस्तकातून वाचता येईल. हिमालय ते तळकोकण आणि केनिया-टांझानिया पासून स्कँडेनेव्हियापर्यंतचं प्रवासवर्णन या पुस्तकात विस्ताराने आलं आहे.



**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**

डॉ. प्रेमानंद रामाणी, सुलेखनकार अच्युत पालव, आमदार प्रसाद लाड, रवी सावंत यांनीही आत्माराम परब यांच्याबरोबर केलेल्या संस्मरणीय सफरींच्या आठवणी यावेळी कथन केल्या.

याप्रसंगी सदर पुस्तकात वर्णिलेली काही व्यक्तिमत्त्व देशभरातून मुद्दामहून उपस्थित होती त्यात म नालीच्या पहिल्या भेटीपासून आत्माराम परब यांची अनेक प्रसंगी साथ देणारे पहाडी माणूस रमेश ठाकूर हे होते. कोलकत्याहून खास आलेले मित्र म्हणजेच सौमित्र गांगुली हे एव्हरेस्ट शिखर पादाक्रांत केलेले वीर या कार्यक्रमाला उपस्थित होते. 'लडाख... प्रवास अजून सुरू आहे' या पुस्तकात त्यांच्यावर एक पूर्ण प्रकरण लिहिलेले आहे. लेह-लडाखहून पद्मा ताशी आले होते. कोणत्याही प्रसंगी पर्यटकांना मदतीचा हात देणारे पद्मा ताशी यांचा सदर पुस्तकात अनेकदा उल्लेख झाला आहे. २००३ सालच्या ईशा टुर्सच्या पहिल्या लडाख सफरीमधल्या पर्यटक विजया चौहान या प्रसंगी आवर्जून उपस्थित होत्या. या सर्वांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

पुस्तक प्रकाशन आणि 'ईशा टुर्स'च्या पंधराव्या वर्धापनदिनाचं औचित्य साधून गेली चोवीस वर्षं रायगडावर जाऊन शिवराज्याभिषेकाच्या सोहळ्याला उपस्थित राहणाऱ्या आणि महाराष्ट्रातल्या तीनशेवर गड-किल्ल्यांची भ्रमंती करणाऱ्या शिवभक्त हमिदा खान यांचा या सोहळ्यात मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

**– प्रतिनिधी**




**'ईशा टुर्स'च्या १५व्या वर्धापनदिनी 'हे प्रवासी गीत माझे' या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात पुढल्या ओळीत डावीकडून तिसऱ्या रेणूताई गावस्कर, दिनकर गांगल, नरेंद्र प्रभू, सुदेश हिंगलासपूरकर, आत्माराम परब आणि 'ईशा टुर्स'चे 'आनंदयात्री'.**

## डॉ. नेहा वैद्य लिखित 'Happy 24/7' चोवीस आनंदयात्री


डॉ. अनिल काकोडकर


डॉ. विजया वाड


डॉ. नेहा वैद्य




डॉ. नेहा वैद्य लिखित 'Happy 24/7' या 'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेल्या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच ठाण्यात डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते झाले. आयुष्याच्या संध्याकाळीही सतत कार्यरत असणाऱ्या २४ प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांची चरित्रे या पुस्तकात नेहा वैद्य यांनी रेखाटली आहेत. या पुस्तकातली सर्वांत ज्येष्ठ व्यक्ती पंच्याण्णव वर्षांची तर सर्वांत लहान व्यक्ती सत्तर वर्षांची आहे. या पुस्तकाचे प्रकाशन करताना डॉ. अनिल काकोडकर म्हणाले, ''निवृतीनंतरच माणूस खऱ्या अर्थाने काम करतो कारण वेळेचं बंधन नसल्याने या वयात मनासारखं काम करता येतं. नोकरीनंतर मुलांसाठी हवं तसं काम करण्याची संधी मलाही मिळाली आहे.''

नेहा वैद्य यांच्या पीएच्.डी.च्या मार्गदर्शक आणि लेखिका डॉ. विजया वाड (माजी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विश्वकोश) या पुस्तकाचे आणि वैद्य यांच्या परिश्रमाचे कौतुक करताना म्हणाल्या, ''चरित्रपर पुस्तके सातत्याने प्रकाशित होत असतात पण प्रसिद्ध व्यक्तींबरोबरच अप्रसिद्ध व्यक्तींचे कामही समाजासमोर आणण्याचे मोठे काम या पुस्तकाने केले आहे.''

शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, संगीतकार यशवंत देव, आदिवासींसाठी बांधिलकीच्या माध्यमातून काम करणाऱ्या स्मिता जोशी, भटक्या विमुक्तांसाठी कार्यरत गिरीश प्रभुणे, कामागर चळवळीतील कृष्णाजी म्हात्रे, रंगभूषाकार पंढरीनाथ जूकर, प्रशासकीय संपादक मृदुला प्रभुराम जोशी, भटकंतीचा छंद जोपासणारे अरुण सबनीस, स्वतःच्या गावात रस्ते तयार करणारे भापकर गुरुजी, इच्छाशक्तीच्या बळावर कर्करोगावर मात करून लेखन करणारे डॉ. वसंत चव्हाण अशा चोवीस आनंदयात्रींची चरित्रे या पुस्तकात आहेत.

**– प्रतिनिधी**

## सचिन जगदाळे लिखित 'परीघ'


गणेश नाईक


डॉ. गिरीश वालावलकर


डॉ. गिरीश महाजन


सचिन जगदाळे


नरेंद्र बावळे


मंगेश आमले


डॉ. लतिका भानुशाली


धनश्री धारप

पत्रकार आणि लेखक, सचिन जगदाळे लिखित 'परीघ' या कादंबरीचे प्रकाशन नुकतेच ठाणे येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते गणेश नाईक यांच्या हस्ते पार पडले. 'ग्रंथाली' प्रकाशनाने प्रकाशित केलेले जगदाळे यांचे हे दुसरे पुस्तक आहे. त्यांच्या 'ग्रंथाली'ने या आधी प्रकाशित केलेल्या 'गुलाबराव पारनेरकर' या विनोदी पुस्तकाला संपूर्ण महाराष्ट्रातून चांगला प्रतिसाद मिळाला होता तसेच मुंबई मराठी पत्रकार संघानेही उत्कृष्ट पुस्तकाचा पुरस्कार देऊन सदर पुस्तकाला गौरविले होते.

'परीघ'च्या प्रकाशन सोहळ्यास मुंबई, ठाण्या व्यतिरिक्त पुणे, नाशिक, अहमदनगर इथले वाचकही मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कादंबरीची कथा ही पुणे जिल्ह्यातल्या एका बागायती गावात घडते. या कथेचाच संदर्भ देऊन ग्रामीण भागातले राजकारणी किती मोठं आणि चांगलं काम करत आहेत हे गणेश नाईक यांनी श्रोत्यांना स्पष्ट करून सांगितले. पुस्तकात नमूद केलेल्या भागात आपण स्वतः कसे अनेक वर्षे फिरत आहोत आणि तेथील राजकीय आणि भौगोलिक स्थिती कशी पुस्तकात नमूद केलेल्या वर्णनाशी साम्य साधते हेही त्यांनी अतिशय सोप्या भाषेत सांगितले. आपल्या भाषणात नाईकांनी दिलेल्या संस्कृत श्लोक आणि जुन्या साहित्यिक दाखल्यांना उपस्थितांनी टाळ्यांनी प्रतिसाद दिला.

मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे, वोखार्ड फाउंडेशनचे संचालक डॉ. गिरीश वालावलकर, वेलोक्स सोल्युशनचे संचालक मंगेश आमले, प्रसिद्ध वैज्ञानिक डॉक्टर गिरीश महाजन हेही याप्रसंगी व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतिशय खुमासदार भाषेत प्राध्यापिका डॉ. लतिका भानुशाली यांनी केले.

**– प्रतिनिधी**

## अभिजित हेगशेट्ये यांचे 'रानवीचा माळ' राज्यस्तरीय प्रकाश बन साहित्य पुरस्काराने सन्मानित

राज्यस्तरावरील अत्यंत मानाचा मानला जाणारा 'प्रसाद बन वाङमयीन पुरस्कार' 'रानवीचा माळ' या अभिजित हेगश टचे यांच्या साहित्यकृतीला मिळाला. 'रानवीचा माळ'मधील भूमिपुत्रांच्या विस्थापनाची आणि मल्टिनॅशनलच्या दंडेलशाहीची कहाणी ही फक्त कोकणपुरती मर्यादित नसून ती साऱ्या देशातील शेतकऱ्यांची आहे. शेकडो शेतकरी आत्महत्या करीत आहेत.

''साहित्य म्हणजे फक्त सत्याची आराधना असते, पण आज या क्षेत्रातही प्रदूषण निर्माण होऊ पाहत आहे. हे संपवण्यास-ाठी लेखणी हातात धरणाऱ्यांनी साहित्याचं पावित्र्य अबाधित ठेवणं हे त्यांचे कर्तव्यच आहे,'' असे आग्रही प्रतिपादन अ.भा. मराठी साहित्य संमेलनाचे पूर्वाध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

आपल्या घणाघाती वैचारिक वक्तृत्वासाठी प्रसिद्ध असलेले डॉ. सबनीस पुढे म्हणाले की, 'आज शेतकऱ्याच्या दु:खाचं, त्याच्या मरणाचं वर्णन साहित्यिक आपल्या साहित्यातून करतात, त्यावर कविता, कादंबऱ्या लिहितात, पण शेतकऱ्यांवर ही वेळ का आणि कोणामुळे आली हे आता उजागर करण्यासाठी लेखन झालं पाहिजे. शेतकरीच का मरतो याच्या मुळाशी जाऊन लेखकांनी लिहिणे गरजेचे आहे.' डॉ. सबनीस पुढे म्हणाले की, 'लेख-कांनी आपल्या संवेदना जागृत ठेवून लिहिताना विशिष्ट चौकटीत आपली बुद्धी गहाण ठेवता कामा नये. तसं झालं तर साहित्याचे खरं आकलन होणार नाही.'

नांदेडच्या प्रसाद वैद्यकीय प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात येणाऱ्या वाङ्मय पुरस्कार प्रदान सोहळ्यात डॉ. सबनीस प्रमुख अतिथी म्हणून बोलत हाते. यावेळी विचारपीठावर पुरस्कार विजेते कादंबरीकार अभिजित हेगशेट्ये, ज्येष्ठ कवी-चित्रकार भ.मा. परसवाळे, लेखक प्रदीप पाटील व बाळू दुगडूमवार, प्रसाद बन वैद्यकीय प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. अच्युत बन आणि पुरस्कार समितीचे समन्वयक तथा विख्यात लेखक प्राचार्य डॉ. सुरेश सावंत यांची उपस्थिती होती.

'प्रसाद बन वाङ्मय पुरस्कार' विजेते कादंबरीकार अभिजित हेगशेट्ये यावेळी मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, 'कोकणातल्या उद्ध्वस्त होत असलेल्या भूमिपुत्रांची कथा मी रानवीचा माळ ह्या कादंबरीतून पुढे आणण्याचा प्रयत्न केला आहे. आज आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे असे डावपेच आणि षड्यंत्र सुरू आहेत, की एखाद्या समूहाची सवयच बदलून टाकून तिथे आपले अधिराज्य निर्माण करण्याचा कॉर्पोरेट फंडा सुरू झाला आहे. हे कारस्थान हाणून पाडण्याचा सर्वच स्तरावर प्रयत्न झाला पाहिजे.'

प्रसिद्ध चित्रकार व ज्येष्ठ कवी भ.मा. परसवाळे यांना यावेळी मातोश्री पद्मिनीबाई बन साधना सन्मान प्रदान करण्यात आला. यावेळी भ.मा. विचार व्यक्त करताना म्हणाले, की कुठलाही चां-गला लेखक हा त्याच्या निर्मितीशी, संहितेशी प्रामाणिक असला पाहिजे, पण आज अनेक पुरस्कारांच्या बाबतीत साशंकता निर्माण व्हावी, असे वातावरण आहे. पुरस्काराच्या मागे लागणारा हा खरा लेखक, कवी होऊच शकत नाही, असे सांगून परसवाळे यांनी साहित्यक्षेत्रातल्या वाईट आणि असभ्य प्रथांवर यावेळी सणसणीत ताशेरे ओढले.

प्रास्ताविकात प्रसाद वैद्यकीय प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. अच्युत बन म्हणाले की, 'साहित्यसेवेचा गौरव करण्याचं भाग्य मला लाभलं हा माझ्या आई-वडिलांचा आशीर्वादच आहे. मनस्वी वाचकातून लेखकाचा जन्म होत असतो.'

कार्यक्रमास बन परिवार, प्रसाद बन वैद्यकीय प्रतिष्ठानचे सर्व सदस्य, साहित्यिक आणि साहित्यप्रेमी रसिकांची मोठी उपस्थिती होती.

**– प्रतिनिधी**


॥ग्रंथाली॥✲॥




### रानवीचा माळ – अभिजित हेगशेट्ये

एकविसाव्या दशकाच्या अखेरीला जागतिकीकरणाचे भव्यदिव्य स्वप्न देशाला पडले. देशाच्या विविध प्रांतातील जमिनी शासनाच्या माध्यमातून काबीज करू लागल्या आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांचे विकासक रोजगाराची स्वप्ने दाखवू लागले. बहुराष्ट्रीय कंपन्या सर्वसामान्य जनतेचा तारणहारच आहे, असे वाटू लागले. पण बहुराष्ट्रीय कंपन्याचे आगमन हे फक्त आणि फक्त कमावण्यासाठी आणि त्यासाठी विविध मार्गाने भूमिपुत्रांच्या जमिनी हडप करायच्या. बलाढ्य मल्टिनॅशनल कंपन्यांसमोर आपल्या पिढ्यान्‌पिढ्या जमिनीच्या तुकड्याच्या अस्तित्वासाठी चिवटपणे लढणाऱ्या भूमिपुत्रांची कथा म्हणजे रानवीचा माळ ही कादंबरी.

**मूळ किंमत ४०० रुपये   सवलतीत २५० रुपये**

# अरविंद जगताप लिखित 'पत्रास कारण की'च्या निमित्ताने...




मूल्य १५० रुपये
सवलतीत ९० रुपये

प्रिय ग्रंथालीस,

स.न.वि.वि.

पत्र लिहिण्यास कारण की, सर्वप्रथम मी आपले व्यक्तिश: आभार मानते. यासाठी की, अरविंद जगताप यांची 'चला हवा येऊ द्या' या मालिकेतील पत्रे पुस्तकाच्या रूपाने संग्रहित करून कोणे एके काळी नातेवाईक, मैत्रिणींना पत्र लिहिण्याचा छंद असलेल्या मला, आपणास पत्र लिहिण्यास उद्युक्त केले.

दि. २८/०१/२०१८ रोजी, रात्री ८ वाजता अमरावती येथील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन येथे 'प्रविण खोडके मेमोरियल ट्रस्ट व शोध प्रतिष्ठान' द्वारा आयोजित सांस्कृतिक महोत्सव २०१८ मध्ये अरविंद जगताप यांच्याशी संवाद साधला गेला व आपण प्रकाशित केलेल्या त्यांच्या 'पत्रास कारण की...' या 'चला हवा येऊ द्या' या मालिकेतील पत्रांच्या संग्रहातील पत्रांचे वाचन केले गेले.

वरील पुस्तकातील पत्रांचे निमित्त उलगडताना त्यांनी सांगितले की, शाळकरी असताना त्यांनी लिहिलेल्या निबंधाचे कौतुक व्हायचे.तेव्हा त्यांना लक्षात आले की, आपण चांगले लिहू शकतो. कॉलेजजीवनात मित्रांचा आग्रह असायचा की, 'मैत्रिणीसाठी असे काही पत्र लिहून दे की, ती 'हो' म्हणाली पाहिजे.' अशा तऱ्हेने पत्र लिहिण्यास सुरुवात झाली.

'सोशिक स्त्रियांनो' या पत्राची पार्श्वभूमी उलगडताना ते म्हणाले की, घराघरात कुटुंबासाठी, त्यातील प्रत्येक घटकासाठी राबणारी स्त्रीच असते. कित्येकदा तिला मनातील गोष्टी मनातच राहू द्याव्या लागतात, मनाला मोठी मुरड घालावी लागते. शंभर टक्के कोणाचीच बायको खूष नसते. तिला काय आवडते, हे पीएच्.डी. करण्यापेक्षाही कठीण असते परंतु असे असूनसुद्धा जिचे सगळे स्पेशल असते ती म्हणजे बायको म्हणून त्यांनी सर्व पुरुषांना आवाहन केले की, बायकोशी प्रामाणिक राहावे. खोटे बोलू नये. घरातल्या व बाहेरच्या स्त्रियांशी आदराने वागावे.

'गावातील मुली' या पत्राची पार्श्वभूमी सांगताना ते म्हणाले की, बीडच्या आसपास तांड्यावर दोन मुलींनी ठरविले की, लग्न करायचे नाही व ८-१० मुलींनी ठरविले की, 'हुंडा' हा प्रकार असेल तर आम्ही लग्नच करणार नाही. इतर गोष्टींचे लोण खूप लवकर पसरते, तर मग ही चांगली गोष्ट का पसरू नये म्हणून त्यांना हे पत्र लिहावेसे वाटले. हुंडाबळी, स्त्रियांवरील अत्याचार याबाबतीत ते म्हणाले की, ज्येष्ठ पिढीने, स्त्रियांनी समजून-उमजून विचारपूर्वक वागावे. बायकाच बायकांना त्रास देतात. बायकांनी बायकांना समजून घेणे हेच महत्त्वाचे होय. मुलगा वाईट वागत असेल तर पोलिसांपेक्षा आईनेच आधी ॲक्शन घ्यावी म्हणजे पुढील अनिष्ट प्रकार टळतील.

तसेच फेसबुक, व्हॉट्सअपचा वापर कमी करावा. प्रत्यक्ष संवादामध्ये जी मजा आहे ती मोबाईलमधील चिन्हांमध्ये नाही. त्यामुळे त्याचा वापर कमी करून एकमेकांमध्ये संवाद वाढवावा, हे आवर्जून सांगितले.

अमरावतीच्या आदरातिथ्याचे, प्रेमळपणाचे त्यांनी कौतुक केले. त्यामुळे आमचाही ऊर अभिमानाने भरून आला.

एकंदरीत मानाने व मनाने मोठ्या असलेल्या या महाराष्ट्रातील लेखकाशी संवाद व त्यानिमित्ताने त्यांच्या 'पत्रास कारण की...' हे पुस्तक अनुभवयाला मिळणे म्हणजे एक मोठी पर्वणीच होती. कळावे, लोभ असावा.

'पत्रास कारण की...' या दर्जेदार पुस्तकाच्या निमित्ताने तो वृद्धिंगत झाला व आपण अशाच दर्जेदार पुस्तकांचे प्रकाशन करून तो कायम ठेवावा या विनंतीवजा अपेक्षेने.

एक वाचक
**माधुरी योगेश नेरकर**

ग्रंथाली





मूल्य ६०० रुपये
सवलतीत ३६० रुपये

## धर्मधुरीण – डॉ. प्रकाश लोथे

वऱ्हाडातील कर्मठ सनातनी कुटुंबातील धर्मपरायण आबासाहेबांचा मुलगा श्याम ख्रिश्चन मिशनऱ्याच्या प्रभावाखाली येऊन वडिलांशी टक्कर घेऊ पाहतो, तेव्हा त्यांच्यात निर्माण होणारा जीवघेणा संघर्ष चितारणारी ही कादंबरी एकदा वाचावयास घेतली तर खाली ठेववत नाही. भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली ही हृदयद्रावक कहाणी बंगाली लेखक शरदचंद्रांच्या कादंबऱ्यांची आठवण करून देते.

स्त्री शिक्षण, विधवा विवाह, स्वातंत्र्यपूर्व राजकारण व देशाची फाळणी असल्या अनेक तत्कालीन समस्यांमुळे निर्माण झालेला प्रखर वैचारिक लढा चितारत, अनेक कौटुंबिक समस्यांचे पदर सहज उलगडत जाणारी संयत भाषाशैलीतली ही कादंबरी मनाला चटका लावून जाते.

– दिनकर गांगल




मूल्य ६०० रुपये
सवलतीत ४०० रुपये

## कारवारी माती – वसंत नरहर फेणे

ही कादंबरी सुरू होते १९०१ मध्ये आणि संपते १९४७ साली. उत्तर कन्नडामधील, अंकोला तालुक्यातील, होन्नेकेरी या खेड्यातील एका वाड्यात राहणारा, गणपतराय हिचकड आणि त्याचा मुलगा विद्याधर हे दोघे केंद्रवर्ती असणाऱ्या ह्या कादंबरीत, त्या दोघांच्या अवास्तव बौद्धिक तसेच भावनिक अहंकारामुळे, त्या कुटुंबातील व्यक्तींची आणि त्यांच्या नातेवाइकांची होत गेलेली फरफट, त्या साऱ्यांच्या स्वभावांचे विलक्षण कंगोरे, त्यातून त्यांचं घडणं, मोडणं आणि पुन्हा नव्याने घडणं या सगळ्यांचा कादंबरीकाराने सूक्ष्म निरीक्षण पद्धतीने जो वेध घेतला आहे; तो मनोवेधक आणि विलक्षण आहे. ह्या साऱ्या कथेला स्वातंत्र्यपूर्व काळाची पार्श्वभूमी असल्याने, त्या काळातील सामाजिक अवकाशाच्या प्रभावपरिणामातून जे काही रचित निर्माण होतं, त्या रचितातून ही चित्रमय शैलीतील कादंबरी साकार होत जाते. ह्यातील प्रत्येक व्यक्तिरेखेची त्या काळातील जीवनरीती, मूल्यसरणी, समूहभाव, प्रेमभाव यांमध्ये, स्थळ–काळानुसार बदल होत जाण्याने, त्यांच्या परस्पर नात्यात आणि व्यवहारात निर्माण झालेला टकराव, घुसमट ह्यांना प्रवाही गद्यशैलीमुळे वाचनीयता प्राप्त झाली आहे.




मूल्य ३५० रुपये
सवलतीत २५० रुपये

## हुंकार – डॉ. अनंत पां. लाभसेटवार

...जीवनात कुठेही संघर्ष दिसला की माझ्यातला कथालेखक जागृत होतो आणि तो शब्दबद्ध करण्यास माझी लेखणी सरसारते. जगात सुखापेक्षा दु:ख, त्यागापेक्षा भोग आणि सौहादापेक्षा कलह जास्त सापडत असल्यामुळे विषयांना तोट नाही. पाहिजे ती चिकित्सक बुद्धी आणि लिहिण्याची ओढ. देश व वेष वेगळे म्हणून माणसाच्या भावना व मनोवृत्ती बदलत नाही. सगळ्यांच्या डोळ्यांत तीच आसवं उभी राहतात आणि छातीत तेच काळीज धडधडत असतं. त्यामुळे घटना वेगळ्या असल्या तरी प्रतिक्रिया कशी होते हा कथेचा सार ...लघुकथा म्हणजे एक प्रकारचं शीघ्र साहित्यच. मॅकडोनल्डच्या शीघ्र अन्नाप्रमाणे (फास्ट फूड) ...लघुकथांचे दोन प्रकार म्हणता येतील– मनोविश्वलेषणात्मक व घटनात्मक. मनाचे विविध पापुद्रे उलगडून कथा लिहिल्यामुळे मराठीच्या साहित्याच्या मुशीत फ्रॉईड केव्हाच फ्राईड (तळलेला) झाला आहे... रोजच्या जीवनात जगभर जो कलह सापडतो, तो कलात्मकरीतीने गुंफला तर लालित्यपूर्ण कथा निर्माण होऊ शकते. त्यासाठी मनोविकारतज्ज्ञाची जरुरी नसते. अनुभवांचं भांडवल आपण कृतीतून व वाचनातून मिळवू शकतो. म्हणजे लेखक होण्यासाठी प्रथम वाचक होणं आवश्यक असतं.

॥ग्रंथाली॥

# ग्रंथपान

चांगदेव काळे

संपर्क : ९८६९२०७४०३

## आठवणींचे असेच असते

संपादन : अरुण शेवते



### अंतरंगात सांडलेल्या स्मृतिगंधाचे प्रतिबिंब

'आठवणींचे असेच असते' हे लेखांचे पुस्तक वाचायला घेतले आणि वाचतच सुटलो. झपाटून टाकल्यासारखा! अनुभवांचे, आठवणींचे एकेक दालन जणू पार करीत असल्यासारखा तो प्रवास होता वाचनाचा. गुलजार, अरुण साधू, कुमार केतकर, दया पवार, शिरीष पै, उषा मेहता, दिलीप चित्रे, गिरीश कुबेर, डॉ. सदानंद मोरे, यशवंतराव गडाख, नाना पाटेकर, निळू फुले...अशा कितीतरी माणसांनी या पुस्तकात आपल्या आठवणींना उजाळा दिला आहे.

दिल्ली आणि राजकारण ही मोक्षगृहाची रूपे आहेत. येथे वैभवाचे वारू उधळत असतात, तेव्हा सन्मानाचे सर्व दीप पावलोपावली उजळत असतात. मात्र पदभ्रष्ट झालात की पाय मोडलेल्या वारूसह लाक्षागृहात कोंडल्याचा अनुभव असतो. पत्रकारिता करताना राजीव खांडेकर यांना दिल्लीने हे अनुभव दिले परंतु या ज्योत आणि अंधार यांची खरी रूपे कशी असतात, यांचा अनुभव सुशीलकुमार करून देतात, तेव्हा खांडेकरांनाही हा अनुभव शिकण्यासाठी नवीन असतो.

'बलुतं'ने सगळे मराठीविश्व हालवून टाकले. त्यात आलेले विश्व मराठी वाचकांसाठी वेगळे होते. परंतु त्यात दगडूचे सगळेच विश्व सामावलेले होते असे नाही. त्यात नसलेले एक प्रकरण होते, मैलाचा दगड ठरलेल्या हिरा कसबे नावाचे. त्याविषयी लिहिण्याचा पैस इथे सापडलेला आहे. त्याविषयी दया पवार लिहितात, 'माझ्याही नावात दगड. या दगडाला पैलू पाडणारा मला हिरा मिळतो आहे.'

रशियातील जनता प्रचार आणि सत्य यातील मधल्या अस्वस्थ पट्ट्यात जीवन कंठत आहे. या अस्वस्थतेचा स्फोट कधीही होऊ शकतो, हे निरीक्षण कुमार केतकर यांनी मास्को भेटी दरम्यान नोंदवले होते. सुरक्षा व्यवस्था, राजकारण आणि अर्थव्यवस्था यांचे पत्रकाराच्या नजरेतून केलेले निरीक्षण व त्यावरचे भाष्य किती तंतोतंत होते, हे आज रशियाकडे पाहताना सांगण्याची आवश्यकता उरलेली नाही.

मंत्रालयातील पत्रकार कक्ष हा स्वतःचे वैशिष्ट्य असलेला कक्ष आहे, परंतु एक स्वतंत्र लेखाचा तो विषय होऊ शकतो, पत्रकार आणि मुखमंत्री यांच्यातले सौहार्द जे दिसते त्यातले औचित्य कसे असते, याचा सविस्तर आढावा 'चावडी'या लेखात बाळ देशपांडे यांनी घेतला आहे.

गायिका गंगूबाई हनगल वयाच्या ८८व्या वर्षीही गाण्यांची संध्याकाळ अजून झालेली नाही, असे ठामपणे सांगतात. कुठलेही आमंत्रण नाकारत नाहीत कारण संगीत हेच त्या जीवन मानतात. या गायिकेच्या हृद्य आठवणींना त्यांनी उजाळा दिला आहे. एका मैफलीच्या दरम्यान पतीचा मृत्यू झाल्याची तार आली होती, ही आठवण तर हेलावून टाकणारी आहे.

कवीचे स्वप्नाळू असणे आणि त्यातून कविता जन्माला येणे, हे अनुभव प्रत्यक्ष पडणाऱ्या स्वप्नांहून निराळे आहे. 'कालस्वर' आणि 'दर्शन' या संग्रहातील कविता सुरस आणि स्वप्नानुभवी आहेत. त्याविषयीचे सुंदर विवेचन शंकर वैद्य यांनी केलेले आहे. कविता जगणाऱ्यांसाठी हा एक रम्य प्रवास आहे. राम देशपांडे यांना स्वामीकार रणजित देसाई यांचा सहवास लाभला तो त्यांचे लेखन सहाय्यक म्हणून. रणजित देसाई यांच्या आठवणींविषयी त्यांनी खूप मनापासून लिहिले आहे, जितके त्यांनी त्यांच्या लेखनावर प्रेम केले, त्यांच्याकडे ज्या आदराने पाहिले. थोर साहित्यिक असूनही किती नम्रपणा त्यांच्याठायी होता, याचे नितांत सुंदर चित्रण इथे वाचायाला मिळते.

निळू फुले हे सर्वज्ञात व्यक्तिमत्त्व. खूप वेगवेगळ्या भूमिका साकार केलेले उत्तम अभिनेते. परंतु तितकेच कौटुंबिक जिव्हाळ्याचे, पती-पिता ही भूमिका तितकीच लीलया पार पाडणारे कुटुंबवत्सल गृहस्थ. आपली कारकीर्द, पत्नी रजनी, कन्या गार्गी यांच्याविषयी त्यांनी आपले मन मोकळे केले आहे. नरेंद्र चपळगावकर यांनी त्यांच्या शिक्षण कालखंडात अनुभवलेले औरंगाबाद आणि डॉ. बाबासाहेब यांच्याविषयी लिहिले आहे. उर्मिला शर्मा यांचे संकेत आणि प्रेरणा यावर आधारलेले ग्रहताऱ्यांचे अवकाश अमृता प्रीतम यांच्यासाठी 'अजब दुनिया'चे ठरले; ते त्यांच्या तरल प्रतिभेचे दर्शन घडवते. इतर अनेक वाचनीय लेख या पुस्तकात आहेत, 'आठवणी' हाच गाभा असलेले.

दिवाळी अंकातील लेखांनी पुस्तक रूपात जन्माला येणे हा सुवर्णयोग आगळावेगळाच म्हणावा लागेल. तो योग 'आठवणींचे असेच असते' या पुस्तकाने सिद्ध केलेला आहे. प्रत्येक लेख स्वतंत्र आहे, वेगळा आहे, त्याचा आवाका पाहता आत्मचरित्राचा सारांश म्हणता येईल असा. लिहिणाऱ्या व्यक्ती सर्वच मान्यवर आणि तोलामालाच्या आहेत. राजकारण, चित्रपट, संगीत, पत्रकारिता, साहित्य, संपादन, अशा विविध क्षेत्रात लौकिक असलेल्या. कालखंड, क्षेत्र, भोवतीचे इष्ट आप्त यांच्याविषयीचे चित्रण करताना त्यांनी जणू आपल्या अंतरंगाच्या मोहरबंद थैलीचे बंद मोकळे केले आहेत. कुपीत जपून ठेवावेत असे हे अनुभव मनमोकळेपणाने व्यक्त केलेले आहेत. या मोकळेपणात त्यांच्या स्वभावांच्या छटांची झळाळी उतरलेली आहे. ही झळाळी प्रत्येक लेख वाचून झाल्यानंतर मनाला उजळून टाकते, वेगळे काही अनुभवल्याचा मोहरून टाकणारा प्रत्यय देते. या सगळ्या लेखांना संकलित करून पुस्तक रूपात एक अमूल्य असा अक्षरठेवाच वाचकांच्या हाती सुपूर्द करण्याचे मोठे काम संपादकांनी केलेले आहे.

आठवणी म्हणजे मनाच्या तळाशी सांडलेले सुंदर माणिकमोती, दिवसा आकाशाच्या तळाशी दडून राहिलेल्या नक्षत्रांसारखे. संधी मिळताच उजळून येणारे, ही कल्पना साकार करणारे उत्तम मुखपृष्ठ सजवले आहे सतीश भावसार यांनी!

**मूल्य ३५० रुपये ● सवलतीत २५० रुपये**

# ग्रंथपान

## '...परी जीनरूपे उरावे'

**डॉ. विश्राम मेहता**



**आपणच तपासून घ्यावे आपणाला...**

मानव जन्माला आला कसा? जन्म म्हणजे काय, मृत्यू होतो म्हणजे काय? तो उत्क्रांत होत गेला कसा? पूर्वी तो कसा होता, आज कसा आहे? त्याचे आचरण, त्याची मानसिकता, त्याचा वर्ण, स्वभाव, यांच्यावर परिणाम करणारे घटक कोणते? धर्म, संस्कार, संस्कृती, शिक्षण, नातेसंबंध, आजारपण, समाज यांचा त्याच्यावर कोणते परिणाम होतात की होत नाहीत? नर-मादी यांना असणारे परस्परांचे आकर्षण आणि लैंगिकता यातील भावनांचे जाळे कसे असते? दैनंदिन दिसणारे आजारांचे स्वरूप आणि उपाय यांचे संबंध? जीन्स म्हणजे काय, त्यांचे सूत्र आणि परिणाम काय? असे अनेक प्रश्न प्रत्येकाला जाणवत असतात. त्यांची उत्तरे विज्ञानाधारित आहेत की नाहीत, याचीही जिज्ञासा असतेच. अशा व यासारख्या अनेक प्रश्नांचा व विषयांचा अंतर्भाव ज्यात आहे, असे पुस्तक म्हणजे डॉ. विश्राम मेहता यांचे '...परी जीनरूपे उरावे!'

प्लेग आणि मलेरिया या दोन आजारांसंबधीची माहिती पुस्तकाच्या पहिल्या भागात दिलेली आहे. आजारांचा इतिहास, त्यांची कारणे, यात मानवी शारीरिक कारणे, बाह्य कारणे, प्रतिबंधात्मक उपायांचे संशोधन, आदींचा समावेश आहे. त्याचवेळी त्यावेळची सामाजिक व राजकीय परिस्थिती कशी होती,याचेही चित्र यातून रेखाटलेले आहे. प्लेगच्या आजारात मानवी शरीरातील लोह नावाचा घटक कसा कार्य करतो हे स्पष्ट होते. तसे मलेरिया या आजारात जंतूसाठी मानवी रक्तातील तांबड्या पेशी आणि डासांचे शरीर आवश्यक असल्याचे दिसून येते. अलीकडच्या काळात रक्तदाब, मधुमेह व कोलेस्टरॉल या आजारांची नावे वारंवार कानांवर येत असतात. त्यांच्या रुग्णांची संख्याही लक्षणीय म्हणावी अशी आहे. या आजारांची कारणमीमांसा ही मानवाच्या जीवनशैलीशी निगडित असल्याची दिसून येते. तरीसुद्धा त्यांची शास्त्रीय कारणेसुद्धा तितकीच महत्त्वाची आहेत, यांची निरीक्षणे नोंदविताना लेखकाने दोन उदाहरणे दिलेली आहेत. आफ्रिकन काळ्या लोकांमध्ये कोलेस्टरॉल वाढवणारा जीन असतो. उत्तर युरोपियन लोकांमध्ये लोहभार आणि मधुमेहाचे जीन्स असतात. थोडक्यात या सगळ्या प्रक्रियेत जीन नावाचा घटक महत्त्वाची भूमिका बजावीत असतो.

स्त्री-पुरुष यांच्यातील आकर्षण विषयाचे स्वरूप आणि वास्तव लेखकाने अनेक अंगांनी तपासलेले आहे. मुळातच दोन परस्पर भिन्न प्रकृतींची माहिती, त्यांची शारीरिक ठेवण आणि गुणवैशिष्ट्ये या विषयीचा हा सखोल असा अभ्यास आहे. हे आकर्षण कशावर अवलंबून असते, त्यामागची प्रेरणा काय असते. प्रेरणा, भावना, लैंगिकता, सुरक्षितता, प्रजनन, संततिवृद्धी, समाजभान, समूहभान, नैसर्गिकता, शारीर गरज, ताणतणाव आणि मानसिक समाधान, असे अनेक स्तर या विषयाला आहेत. यातला प्रजनन हा विषय महत्त्वाचा समजला जातो. त्यासाठीची मानसिकता, भावना, सुरक्षितता, समाज, समूह हे पुन्हा त्यात अपेक्षित राहतात. शारीरिक ठेवण, त्यात असणारे प्रभावी घटक, सुरक्षित पोहोचविण्याची आणि सुरक्षितपणे जतन करण्याची क्षमता यांची नैसर्गिक परिणामकता. आकर्षण हे परस्पर भिन्न लिंगी आहे तसे समलिंगीही असते. त्वचेचा रंग, सामजिक स्तर, बुद्धी, हुशारी, शारीरिक बांधा, हे घटक आकर्षणात किती महत्त्वाची भमिका बजावतात की आणखी काही कारणे असतात. त्यामागची कारणमीमांसा काय असते. एकाच कुटुंबातील, एकाच नात्यातील, एकाच समाजातील, आणि दुसऱ्या नात्यातील, दुसऱ्या स्तरातील प्रजनन कसे असेल, याचाही अभ्यास इथे केलेला आहे आणि या सगळ्यात जीन्सचा प्रभाव कसा राहतो याचे विश्लेषण येते शिवाय लोकसंख्या नियंत्रण, जीन्सची सुरक्षितता व डीएनए हे विषय आहेत, जे पूर्वीच्या काळापासून अस्तित्वात होते.

पुस्तकाचा आधार आहे कुतूहलाला प्रेरणा देणे, मनातल्या अनेक प्रश्नांची त्यांच्या मुळाशी जाऊन उकल करणे. म्हटले तर हे शरीरशास्त्र आहे, म्हटले तर मानसशास्त्र आहे, म्हटले तर विज्ञानाच्या विविध शाखांच्या आधारे मानव आणि त्यांची उत्क्रांती यांचा घेतलेला शोध आहे. हा शोध विज्ञानाच्या कसोटीवर पारखून घेतलेला आहे, अनेक शास्त्रज्ञांच्या, संशोधकांच्या निरीक्षणातून सिद्ध झालेल्या प्रयोगांचा आधार त्याला आहे. त्यामुळे त्यांच्या शब्दांचा बोजडपणा अंगावर येण्याची शक्यता नाकारता येत नाही, परंतु अशा शब्दांची सूची अर्थासह स्वतंत्रपणे दिली आहे. वाचक म्हणून आपण सलगपणे हा वाचनाचा अनुभव घेतो, तेव्हा लक्षात येते, यात प्रवाहीपणा आहे. वाक्यांचा सुटसुटीतपणा ठेवलेला आहे. विषयाला सहजपणे फुलवण्यासाठी जी ललितशैली आवश्यक असावी लागते, ती अंगभूतपणे आलेली आहे. विषयाचा आवाका लक्षात घेऊन वाचकाला तो सहजपणे आकलन होईल, कुठल्याही वाचकाला तो विषय आपला वाटेल, त्याची जिज्ञासा कायम राहील, याची काळजी लेखकाने घेतलेली आहे. त्यासाठी वेळोवळी परिष्करण केलेले आहे. इतकेच नव्हे तर, उदाहरणे, निरीक्षणे, प्रयोग, आकडेवारी, यांचा जागोजागी उचित असा उपयोग करून विषयाची उत्तमपणे उकल केली आहे. वाचकांच्या सोयीसाठी संदर्भग्रंथांची यादी शेवटी दिलेली आहे. काही रेखाटने दिली आहेत. त्यामुळे विषयाला अधिक सुस्पष्टता आली आहे.

विषय विज्ञानाशी संबंधित असूनही दैनंदिन जगण्याशी त्याचे नाते आहे. त्यामुळे प्रत्येकाला आपले प्रतिबिंब त्यात न्याहाळता येईल. आपले जगणे, वागणे, शरीरधर्म, गुणसूत्र यांचा शोध अनुभवांच्या अंगाने स्वतः घेता येईल.

विद्याधर पाटील आणि सतीश भावसार यांनी मुखपृष्ठ साकारले आहे. पुस्तकाचे संपूर्ण सार म्हणजे हे मुखपृष्ठ आहे.

**मूल्य ४०० रुपये • सवलतीत ३५० रुपये**

## ग्रंथपान

### भग्न आस्थेचे तुकडे

**चंद्रशेखर सानेकर**



**अंतर्मनाचा ओला गाभा**

'तुमचा फैसला काय व्हायचा तो होवो, आपल्या युद्धनीतीत शक्य झाल्यास एक बदल करा. शब्दांना द्या दगडाचे टणकपण आणि दगडांना द्या शब्दांचे द्रष्टे ओठ!' असे आशावादी द्रष्टेपण व्यक्त करीत आहेत कवी चंद्रशेखर सानेकर. वर्तमानातील असह्य होणारी अस्वस्थता नुसती व्यक्त करून चालणार नाही. तिच्या चांगुलपणावर समर्थनाचे लेप चढवून स्वतःचे आंधळे समाधान मानून चालणार नाही. तर येणाऱ्या भविष्याला सुदृढता बहाल करावी लागेल. त्यासाठी आहारी जाणाऱ्या भावनेला आवर घालून परखडतेची कास धरायला हवी. प्रसंगी कठोरपणे सामोरे जावे लागेल, ही जाणीव कवी या कवितांमधून व्यक्त करीत आहेत.

चंद्रशेखर सानेकर यांची ओळख आहे ती उत्तम गझलकार म्हणून. आजच्या गझलकारांमध्ये आवर्जून ज्यांच्या नावाचा उल्लेख केला जातो त्यापैकी सानेकर एक, वरच्या श्रेणीतले! आतापर्यंत त्यांचे प्रकाशित झालेले गझलसंग्रह आहेत, 'एका उन्हाची कैफियत', 'एका शहराच्या खुंटीवर', 'नभाशी बोलण्यासाठीच', 'माझ्या काळाचा अनुवाद', 'एक अजब कोलाहल'. त्यांच्या गझलांना नामांकित गायकांच्या स्वरसाजाचे देणे लाभले. गीतांच्या रूपात त्या रसिकांच्या भेटीला आलेल्या आहेत आणि त्यांचे स्वागतही उत्साहाने झालेले आहे. काही चित्रपट, मालिका यांचे गीतलेखनही त्यांनी केलेले आहे. या गझलांच्या सोबतच त्यांचे कविता लेखनही सुरू आहे. त्यापैकी काही निवडक कवितांचा संग्रह आता प्रकाशित झाला आहे, त्याचे नाव आहे 'भग्न आस्थेचे तुकडे.' त्याविषयी ते लिहितात, ''आजवर प्रकाशित झालेल्या गझला या माझ्या मुक्तछंदातील कवितेच्या स्वभावाचीच रूपे वाटत आल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या रूपाने माझ्या मुक्तछंदातील कविता प्रकट होत आहेत असं मी अनुभवत आलोय. म्हणूनच या कविता मला माझ्या गझलांच्या वाटचालीतली एक वाट आहे, असं मला वाटतं.''

या संग्रहातील कविता वेगवेगळ्या विषयांना कवेत घेऊन आलेल्या आहेत. आपल्याभोवतीचे वातावरण प्रदूषित असूनही ते प्रदूषणमुक्त असल्याचे भासविले जात आहे. समाज एकमेकांपासून दूरदूर असा विखुरला जात आहे, नव्हे तो तोडला जात आहे. त्यात विषाच्या बिया पेरल्या जात आहेत परंतु वरून बेगडी शाल पांघरून आतली दुखरी जखम तशीच ठसठशीत झाकून ठेवली जात आहे. माणसांचे वागणे दुटप्पी, वरवरचे, स्वार्थी, तिऱ्हाईतासारखे होत आहे. आपुलकी, आत्मीयता, आस्था, माया, प्रेम, यांना पायदळी तुडवले जात आहे. संस्कारमूल्ये, नीतीनियम यांना अडगळीत टाकून नवे स्वतःच्या फायद्याचे, स्वार्थाचे, सोयीचे नियम तयार होत आहेत. यातून सुरू झाला आहे तो ऱ्हासाचा प्रवास. जो तो आपल्याच कोशात. आपल्याच आत्ममग्नतेत. काही भलत्याच कल्पनांना उराशी बाळगून जगणे सुरू आहे. या सगळ्यात राहूनही प्रत्येकजण डोळ्यांवर मौनाची गांधारीची पट्टी बांधून वावरतो आहे. एक अस्वस्थ करणारे वातावरण मिट्ट काळोखासारखे भोवती दाटले आहे. ज्यामुळे कवी अस्वस्थ आहे. त्यामुळेच ते म्हणताहेत, 'मानवतावादी सगळं मुसळ केरात घालतायत. यातनांची नवनवीन लाक्षागृह बांधतायत.' 'कुरतडून कुरतडून आज, उद्या, कधीतरी अजगर पूर्ण नष्ट होईल, हे तसं क्रमप्राप्तच.' 'कदाचित हे फार कमी जणांना ठाऊक असेल की ही पोकळी एक सर्वभक्षक सैतान आहे.' 'याचा अर्थच असा, ज्याला आपल्या माथ्यावरचे असीम आभाळ दिसतही नाही आणि समजतही नाही, तोच कीटक.'

आपल्या भावना किती बोथट झाल्या आहेत, त्याविषयी ते लिहितात, 'शब्दच ते, ऋषी-मुनींसारखे आपापली धुनी पेटवून आपल्याच तंद्रीत ध्यानस्थ बसलेले.'

सानेकर कविता लिहितात तेव्हा ती एखाद्या कथानकासारखी आकार घेते. आपल्याला जे सांगायचे आहे, तिथपर्यंत ती कविता येते, पूर्णपणे. ती भोवतालचे वर्णन सोबत घेऊन येते. माणूस, समाज यांचे मानसशास्त्र उलगडून दाखवते परंतु ती केवळ निराशेचा, अस्वस्थतेचाच सूर लावत नाही. ती दांभिक, ढोंगी, उपहास, उपरोध, यांच्या मर्मावर बोट ठेवते. 'अंधाराला मिळेल तिथे चूड लावून भस्मसात करण्याची वेळ आलेली असताना तुम्ही हातात तडतड वाजणाऱ्या फुलबाज्या घेऊन काय नाचताय?' ती एक आशावाद त्यातून सायीसारखा दाखवून देते. 'एकेदिवशी एकमेकांच्या ताला-सुरांशी सुसंगत अशी लय पकडता येईल सगळ्यांनाच.' 'तुमच्या चिवट, अपराजेय जिजिविषेनं मीच माझ्या भेगा लिंपून घेईन.'

या संग्रहातील कविता या मुक्तछंदातील आहेत. परंतु त्यांना लय आहे, नाद आहे. त्यामुळे त्या गझलचा मुक्त आविष्कार परिधान करून आलेल्या आहेत, असे वाचताना वाटत राहते. त्यांचा कल आहे तो संवाद साधण्याकडे . वाचकांशी, घटनेशी, संवादातील सहभाग धरलेल्या दुसऱ्या व्यक्तीशी, वर्तमानाशी, तर कधी स्वतःशी. त्यामुळे या कवितांशी आपले नाते आपोआप जुळत जाते. कवितांमध्ये असलेला आशय हा थेट भिडणारा आहे. एक परिपूर्ण आशय घेऊन आलेली प्रत्येक कविता ही स्वतंत्र आहे. जे व्यक्त करायचे आहे ते स्पष्टपणे परंतु तितकेच कलात्मकपणे व्यक्त केलेले आहे. ही कलात्मकता अनेक ओळींतून प्रत्ययाला येते, जिथे थबकायला होते, थक्क व्हायला होते. विचारांची, चिंतनाची, निरीक्षणाची आणि अनुभवांची जोड कल्पक प्रतिभेसोबत असेल तर अशी दर्जेदार निर्मिती साकारणारच, याचा प्रत्यय हा संग्रह देतो.

'भग्न आस्थेचे तुकडे' या नावाशी समर्पक ठरावे असे मुखपृष्ठ साकारले आहे विद्याधर पाटील यांनी! असलेल्या आस्थेला भग्नतेचे रूप यावे आणि तिचा भगभगीत देखावा पाहताना नजरेलाच तडा गेल्याचा भास होत राहावा, असे हे मुखपृष्ठ. आशयाचे प्रतिबिंब वाटावे असे!

**मूल्य १५० रुपये ● सवलतीत ९० रुपये**

ग्रंथाली

# ग्रंथपान

**हुंकार**

**डॉ. अनंत पां. लाभसेटवार**



## माणसांच्या मनातले हुंकार टिपणाऱ्या कथा

'ग्रंथाली'ने प्रकाशित केलेला डॉ. अनंत लाभसेटवार यांचा नवा कथासंग्रह हातात आला. त्यांचा हा तिसरा कथासंग्रह आणि एकूण साहित्यसंपदेतली एकोणतिसावी साहित्यकृती. वैद्यकीय आणि उद्योग–वित्तीय क्षेत्रात उत्तम यश संपादन केलेल्या डॉ. लाभसेटवारांचा लौकिक सर्वज्ञात आहे. समांतरपणे साहित्यक्षेत्रावरही त्यांची नाममुद्रा ठळकपणे उमटलेली आहे, सर्वांचे लक्ष वेधून घ्यावे. इतकी विपुल ग्रंथसंपदा, तीही कादंबरी, प्रवास, चरित्र, कथा, लेख, संपादन, अशा साहित्याच्या सर्व ललितशाखांना गवसणी घालणारी; नक्कीच कौतुकास्पद लौकिकास साजेशी अशी आहे. मराठी साहित्यविश्वात पुरस्कारांच्या यादीत सन्मानाचा समजला जाणारा 'लाभसेटवार फाऊंडेशन साहित्य पुरस्कार' हा तर प्रत्येक साहित्यिकासाठी जिव्हाळ्याचा आणि प्रतिष्ठेचा पुरस्कार आहे. या पुरस्काराने त्यांचे साहित्यावरील प्रेम आणि आस्था अधोरेखित केलेली आहे. अनिवासी असूनही निवासी असावे इतक्या उत्कटपणे त्यांचे मराठी भाषेवरील प्रेम त्यांच्या साहित्यातून, साहित्य पुरस्कारातून पदोपदी जाणवत आले आहे. 'हुंकार' या कथासंग्रहात एकूण २५ कथा आहेत. त्यापैकी काही यापूर्वी नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या आहेत. या कथांमधील वैविध्यता नजरेत भरावी अशी आहे. गरिबी, पोटापाण्याचा संघर्ष, त्यातून दिसणारी नीतिमूल्यांची विविध रूपे यांच्या कथा सुन्न करणाऱ्या आहेत. फरिदा पैशासाठी आपली मुलगी रेहाना हिचा शरीरसहवास देण्यास राजी होते. आणि त्याचवेळी नवऱ्याने दुसरी बायको आणू नये म्हणून त्याच पैशात प्रसाधने विकत आणून स्वतःला सजवू पाहते, हा दोन भिन्न टोकांचा संघर्ष टोकाचा म्हणावा लागेल. दिवसभर मालाची विक्री झाली नाही तर रात्री सगळ्यांना उपाशी झोपावे लागते. अशा वेळी किंमती हिऱ्याची अंगठी मिळाली, ती ठेवून घेण्याऐवजी संबंधित व्यक्तीला परत करण्याचा आग्रह छोटूची आई धरते आणि छोटू ती परत करतो. हे नीतिमूल्य गरिबीला लाजवणारे म्हणावे लागेल. तीच गोष्ट सरप्लस म्हणून बेकार झालेल्या अद्वैत नावाच्या विदेशी आयटी तरुणाची. अकाउंट हॅक करून पैसे काढणारा. पैसे मिळविण्यासाठी अनारकलीला पळवणारा, विकणारा सोहराब. अशी काही स्वभावाची माणसे वेगवेगळ्या रूपात कथांमधून भेटायला येतात, परंतु त्याचवेळी आंतरराष्ट्रीय स्तरावरील विषय देखील कथेचा भाग होऊ शकतात, त्या कथा या संग्रहात आहेत. पाकिस्तान कितीही आगळीक करीत असला तरी अमेरिकेने त्याला हाताशी धरताना कशी अगतिकता स्वीकारली आहे, आणि दहशतीला आश्रय देताना पाकिस्तानची अगतिकता कशी निर्माण झाली आहे. पर्यायी मातृत्व आणि त्यातून येणारी आर्थिक सुबत्ता, अमेरिकेत राहताना करावी लागलेली तडजोड, लेहमन कंपनींतला अंतर्गत संघर्ष आणि तिच्या माथी येणारा दिवाळखोरीचा कलंक, व्हिसा नसताना अमेरिकेत टिकून राहणाऱ्या सौरभ आणि केतन यांची धडपड आणि तडजोड, एकत्र येण्यासाठी केमिस्ट्री जुळणे महत्त्वाचे हे सूत्र सांगणारी पंकज आणि संपदाची कथा, सौदी अरेबियात असलेला कडक शिस्तीचा बडगा आणि अडकलेली नाडिया, तिला मदत करणारा झियाद, अशा आशयाच्या इतर कथा आहेत. या कथा विविध व्यक्तिरेखा, घटना, परिस्थिती, संघर्ष, ताणतणाव, यांच्यासह लेखकाने वाचकांच्या समोर सादर केलेल्या आहेत.

डॉ. लाभसेटवार यांचे बरेचसे लेखन यापूर्वी मी वाचले आहे. विषयाचे कुतूहल समोर ठेवून ते लेखन करतात, त्यातले नावीन्य, संघर्ष टिपण्याचा प्रयत्न करतात. परंतु ज्या ठिकाणी विषयाला अधिक तपशीलाची आवश्यकता असते, तेव्हा ते त्या विषयाच्या तळाशी जातात. त्याचे सर्व संदर्भ शोधून काढतात. त्यामुळे त्या लेखनातली विश्वासार्हता तर वाढतेच परंतु आपल्याला जे सांगायचे आहे, ते परिपूर्ण दिल्याचे , विषयाला न्याय दिल्याचे समाधान मिळते. विशेष म्हणजे वाचक या तपशीलाने नुसता परिपूर्ण होत नाही तर काही नवीन व समाधान देणारे हाती आले, याने तो समाधान पावतो. कथा लेखनाला काही मर्यादा असतात. तरी डॉ. लाभसेटवार आहे त्या चौकटीचा पूर्ण वापर करतात. त्यांची भाषा प्रवाही तर आहेच परंतु मोठमोठी वाक्ये देण्यापेक्षा सुटसुटीत लहान वाक्ये देण्यावर त्यांचा विशेष भर असतो. अनिवासी असल्याने इंग्रजी शब्द येणे अपरिहार्य समजले जाते, नव्हे तो अधिकार समजला जातो. परंतु इथे लेखक हा अपवाद मान्य करायला तयार नाहीत. अतिशय चपखल आणि आशयसंपन्न अशी पर्यायी शब्दरचना करून इंग्रजीचा मागमूस दिसणार नाही याची काळजी घेताना दिसतात. चिंतनाची, निरीक्षणाची जोड तर आहेच त्यामुळे या कथा वाचनीय झाल्या आहेतच, परंतु त्या वाचकाचे कुतूहल कायम ठेवण्यातही यशस्वी झालेल्या आहेत. या कथालेखनाविषयी मनोगत व्यक्त करताना त्यांनी प्रस्तावनेत लिहिले आहे की, ' जीवनात कुठेही संघर्ष दिसला की माझ्यातला कथालेखक जागृत होतो आणि तो शब्दबद्ध करण्यास माझी लेखणी सरसावते. जगात सुखापेक्षा दुःख, त्यागापेक्षा भोग सौहार्दापेक्षा कलह जास्त सापडत असल्यामुळे विषयांना तोटा नाही. पाहिजे ती चिकित्सक बुद्धी आणि लिहिण्याची ओढ.'

या संग्रहाचे मुखपृष्ठ अनिल दाभाडे यांनी सजवलेले आहे. कथालेखन करताना लेखकाने केवळ व्यक्ती, घटना यांचे विश्लेषण केलेले नाही, त्यासोबत आपली नजर भिंगासारखी ठेवून त्यांच्या अंतर्मनाचा, तपशिलाच्या तळाचा शोध घेतलेला आहे. त्याचे प्रतिबिंब त्यांनी मुखपृष्ठावर सजीव केलेले आहे. लेखणी आणि चिकित्सक नजर हीचतर लेखकाची खरे अस्त्रे आहेत, ती या मुखपृष्ठावर अधोरेखित होतात.

**मूल्य ३५० रुपये ● सवलतीत २५० रुपये**

## पुस्तकप्रकाशन क्षणचित्रे




माया परांजपे लिखित 'सौंदर्ययात्री' या पुस्तकप्रकाशनसमयी सुदेश हिंगलासपूरकर, कुमार नवाथे, लेखिका माया परांजपे, गिरिजा बापट, वंदना गुप्ते आणि अन्य कर्तृत्वशालिनी.




'हे प्रवासी गीत माझे' या पुस्तकप्रकाशनसमयी लेखक नरेंद्र प्रभू, अच्युत पालव, रेणू गावस्कर, प्रसाद लाड, डॉ. प्रेमानंद रामाणी, अँग्लोराजेश अथायडे, आत्माराम परब आणि सुदेश हिंगलासपूरकर




सचिन जगदाळे लिखित 'परीघ' या पुस्तकप्रकाशनसमयी डॉ. लतिका भानुशाली, मंगेश आमले, नरेंद्र वाबळे, लेखक सचिन जगदाळे, गणेश नाईक, डॉ. गिरीश वालावलकर, डॉ. गिरीश महाजन आणि धनश्री धारप

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2016 -2018
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.

सारस्वत बँक | 100 Years Young

मिले यहाँ, दोनो जहाँ

म्युच्युअल फंड्चे अधिकृत वितरक

RELIANCE MUTUAL FUND
Wealth Sets You Free

L&T Financial Services
Mutual Fund



*अटी लागू

HDFC MUTUAL FUND
BHAROSA APNO KA

LIC MUTUAL FUND
Khushiyaan, Zindagi Ki...

अधिक माहितीसाठी आमच्या नजीकच्या शाखेला भेट द्या.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि. (शेड्युल्ड बँक)

देशातील सर्वात मोठी सहकारी बँक

म्युच्युअल फंड्समधील गुंतवणूक हा मार्केटमधील जोखमीचा विषय आहे. सर्व योजनांसंदर्भातील दस्तऐवज काळजीपूर्वक वाचा.

www.saraswatbank.com

मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.